म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ........ चरित्र .......
क्र. ३५

चरि०
३५

त्यागराज

BVBK-0400035

रूपलता : : : ५

# त्यागराज

लेखक

पं. महादेवशास्त्री जोशी

३५

किशोर ... १४...

BVBK-0400035

जोशी ब्रदर्स बुकसेलर्स अॅण्ड पब्लिशर्स

अप्पा बळवंत चौक, पुणे २

पाच रुपये

प्रकाशक :

केशव वामन जोशी
जोशी ब्रदर्स
२५ बुधवार पेठ,
अप्पा बळवंत चौक, पुणे २

अंतर्गत सजावट
भय्यासाहेब ओंकार

मुखपृष्ठ
दीनानाथ दलाल

मुद्रक :
सु. प. बर्वे
परशुराम प्रोसेस
१६ अ, शिवाजीनगर
पुणे ५

# परिचय

या पुस्तकांत एकूण पांच कथा दिलेल्या आहेत. या पांचहि कथा भारतांतल्या सुप्रसिद्ध कवींच्या जीवनचरित्राविषयींच्या आहेत. त्यांच्या वाङ्मयीन कार्याचें महत्त्वहि प्रथम परिचयांत आणि कथेच्या संदर्भात दिग्दर्शित केलेलें आहे. यांतले पहिला आणि शेवटचा हे कवी दक्षिणेचे आहेत. गुणाढ्य हा महाराष्ट्राचा आहे. जयदेव पूर्व भारतांत येतो. आणि मातृगुप्त काश्मीरच्या राजमंडलांत बसतो. यांतली प्रत्येक व्यक्ति कुठल्या ना कुठल्यातरी गुणांत असामान्य आहे. हा भारतांतल्या पंचरत्नांचा गुच्छच आहे, असें समजायला हरकत नाहीं. या विशाल भरतखंडाच्या भूमीवर अशीं शेंकडों कविरत्नें चमकून गेलीं आहेत. भारतांतल्या विविध भाषांच्या समृद्धींत आणि सौंदर्यांत त्यांनीं भर घातलेली आहे. विद्यार्थ्यांना अशा महापुरुषांची तोंडओळख तरी अवश्य हवी. त्या दृष्टीनेंच या पुस्तकाची रचना केलेली आहे. पुढचेंहि पुस्तक याच प्रकारचें लिहावें, असा संकल्प आहे.

या कथाकल्पकतेला सदभिरुचीचे वाचक, शिक्षणखातें आणि विद्यार्थि-वर्ग यांजकडून जें प्रोत्साहन मिळत गेलें, त्यामुळेंच हीं पांच पुस्तकें लागोपाठ प्रकाशित होऊं शकलीं. वरील सर्वांचाच मी कृतज्ञ आहें.

१ फेब्रुवारी १९५६

— महादेवशास्त्री जोशी

—x—

# कथानुक्रम


१ त्यागराज ... १
२ जयदेव ... १८
३ गुणाढ्य ... ३२
४ मातृगुप्त ... ६७
५ नाम्बि अंदर नाम्बि ... ८४

# त्यागराज

त्यागराज हा दक्षिणेंतला महान् संगीताचार्य मानला जातो. याचा जन्म १९ व्या शतकाच्या प्रारंभीं मद्रास प्रांतांतल्या तंजावर जिल्ह्यांत तिरुवाल्लूर येथें झाला. त्यागराज हा महान् रामभक्त होता. उत्तरेंत जें स्थान तुलसीदास, सूरदास यांचें, तेंच स्थान दक्षिणेंत त्यागराजाचें. तो केवळ भक्तीसाठींच प्रसिद्ध नाहीं; तर संगीतविद्येंतला एक युगप्रवर्तक पुरुष म्हणून त्याची ख्याति आहे. कर्नाटकसंगीतावर सर्वात प्रमुख छाप त्यागराजाची आहे. त्यागराजाचें नांव ठाऊक नाहीं, असा माणूस दक्षिणेंत विरळाच सांपडेल. त्यानें सहस्रावधि कीर्तनें (पदें) रचलीं आणि ताडपत्रावर लिहून ठेवलीं. त्यानें अनेक नव्या रागरागिणींना जन्म दिला. त्या पदांत त्यानें प्रेमाचें दिव्य संगीत ओतलें. राग आणि लय यांची जोड देऊन त्यानें आपलीं कीर्तनें शास्त्रशुद्ध बनवलीं. त्याचा भर केवळ पद्यरचनेवर नव्हता; तर संगीतविद्येच्या पुनरुत्थानावर होता. त्याच्या पूर्वी कर्नाटकसंगीतांत केवळ शैली आणि शब्द यांचेंच प्राधान्य होतें. या गोष्टी केवळ संगीताचें बहिरंग असून राग आणि लय यांचा मधुर संगम हा त्याचा आत्मा आहे, हें त्यानें स्वतःच्या गायकीनें तत्कालीन संगीततज्ञांना पटवून दिलें. अद्यापहि दक्षिणेंत त्याचीं कीर्तनें सर्वत्र आदरानें गायिलीं जातात.

* * *

सर्वजित नांवाचें संवत्सर होतें. वैशाख शुक्लपक्षांतील षष्ठी होती. त्या दिवशीं सोमवार असून पुनर्वसु नक्षत्र पडलें होतें. अशा या दिनशुद्धीवर मध्यान्हकाळीं, कर्कलग्न असतां शांता नांवाच्या एका स्त्रीनें तिरुवाल्लूर या गांवांत एका पुत्ररत्नाला जन्म दिला. शांता सुखरूप प्रसूत झाली आणि तिला मुलगा झाला, या गोष्टीमुळें घरांतला आनंद द्विगुणित झाला. रामब्रह्मम् गांवांतल्या त्यागराजाच्या देवळांत गेला आणि आनंदाश्रूंनीं

ओला होऊन, त्यानें त्यागराजाला दंडप्रणाम केला. ‘ देवा ! तुझी कृपा,’ असें म्हणतांना त्याचा कंठ दाटून आला.

रामब्रह्मम् हा एक विद्वान् पण गरीब ब्राह्मण होता. सदाचारी माणसांशीं बहुधा लक्ष्मीचें वांकडें असतें, तसेंच तें रामब्रह्मम्च्या बाबतींतहि होतें. तो ईश्वरभक्त होता आणि प्रपंचांतल्या कष्टांची विशेषशी काळजी करीत नव्हता. शांता ही त्याची धर्मपत्नी. ती नांवाप्रमाणें शांत होती आणि स्वभावानें कोमल होती. कोणत्याहि प्रकारें कुरकुर न करतां नवरा जें काय मिळवून आणील, तेवढ्यांत ती कोंड्याचा मांडा करीत होती. दोघेंहि समजूतदार असल्यामुळें त्या घरांत समाधान नांदत होतें. रामब्रह्मम्च्या भक्तीचा वांटा तिलाहि मिळाला होता. रामब्रह्मम्प्रमाणेंच तीहि मंदिरांत जाऊन त्यागराजाची पूजा आणि सेवा करीत होती.

रामब्रह्मम्ला आधींचे दोन मुलगे होते. थोरल्याचें नांव जपेश आणि धाकट्याचें रामनाथ. दोन्ही मुलें चांगलीं होतीं, हुशार होतीं. त्यांच्या बाललीला पाहून रामब्रह्मम्ला सुख होई; पण समाधान मात्र वाटत नसे. आपल्याला ध्रुव-प्रल्हादासारखा भक्तशिरोमणि पुत्र व्हावा, अशी त्याची तीव्र आकांक्षा होती. पण या दोन्ही मुलांत त्याला भक्तीचें बीजसुद्धां दिसत नव्हतें. हीं मुलें व्यवहारी होतील; पण भक्त कांहीं होणार नाहींत, असें त्याला वाटे. म्हणून तो रोज त्यागराजापुढें नाक घांसून त्याची प्रार्थना करी.

“ देवा, मला आणखी एक पुत्र दे आणि तो तुझा परमभक्त होईल असं कर. ”

त्यासाठीं त्यानें शांतेलाहि त्यागराजाच्या सेवेला लावलें होतें. तिलाहि तशा अलौकिक पुत्राची अपेक्षा होतीच. ती मंदिरांत जाई, प्रार्थना करी आणि घटका घटका ध्यान धरून बसे. कांहीं दिवस गेले आणि मग एका रात्रीं तिला स्वप्नसाक्षात्कार झाला. एका दिव्य पुरुषानें तिच्यापुढें प्रकट होऊन तिला वरदान दिलें.

“ शांते, तुझी सेवा मला पावली. मी प्रसन्न आहें. तुझ्या उदरीं एक महान् गायक आणि अनन्य भक्त असा पुत्र जन्म घेईल ! ”

शांता जागी झाली. तिनें आपल्या पतीला हा दृष्टान्त सांगितला. उभयतांनीं त्या स्वप्नांतल्या वरदानावर पूर्ण श्रद्धा ठेवली. कांहीं दिवसांनीं शांतेला गर्भसंभव झाला. नवमास पूर्ण होतांच ती सुखरूपपणें प्रसूत झाली. पुत्रदर्शनानें रामब्रह्मम्‌चा आनंदसागर उचंबळला. त्यागराजाच्या वरानें झालेला पुत्र, म्हणून त्यानें ‘ त्यागराज ’ असेंच मुलाचें नांव ठेवलें. इतके दिवस त्यागराज मंदिरांत होता, तो आतां बालरूप घेऊन त्याच्या घरांत खेळूं लागला. आईच्या उबेंत आणि बापाच्या छायेंत तो दिशीं-माशीं वाढूं लागला. तो चलाख आहे, कुठलीहि गोष्ट चटकन् ग्रहण करणारा आहे, हें लवकरच रामब्रह्मम्‌च्या निदर्शनास आलें.

पांच वर्षांचा होतांच रामब्रह्मम्‌नें मुलाच्या शिक्षणाचा ‘ ओनामा ’ केला. त्यागराज बापाच्या हाताखालींच शिकूं लागला. प्रथम तो तेलगु ही आपली मातृभाषा शिकला. नदीच्या मुखानें समुद्रांत शिरावें त्याप्रमाणें मग त्यानें मातृभाषेच्या द्वारें संस्कृत वाङ्मयात प्रवेश करून घेतला. संस्कृत भाषेचें त्यानें खोल आणि विस्तृत असें अध्ययन केलें. पण रामब्रह्मम्‌ला दिसून आलें कीं, भाषा आणि शास्त्र यांपेक्षां मुलाचा ओढा संगीताकडेच विशेष आहे. कुठूनहि संगीताचा स्वर आला कीं तो हरणा-सारखा लुब्ध होतो आणि नकळत त्याच्या मुद्रेवर विजेसारखा कसला तरी भाव तरळून जातो. त्यावरून त्याला देवाच्या साक्षात्काराचें स्मरण झालें. ‘ तुझा पुत्र महान् गायक होईल, ’ असा देवानें शांतेला दृष्टान्त दिला होता आणि त्याच भवितव्याचीं लक्षणें त्यागराज आपल्या बाल-वयांतच दाखवूं लागला होता.

रामब्रह्मम्‌नें मग ताबडतोब त्याच्या संगीतशिक्षणाची सोय लावून दिली. तंजावरच्या राजदरबारांत शोंठी व्यंकटरमणय्या नांवाचा एक मोठा गवई होता. त्या भागांत त्याच्या गायनाची मोठी ख्याति होती.

संगीतविद्येचा महान् आचार्य म्हणून लोक त्याला ओळखीत होते. रामब्रह्मनें त्यागराजाला नेऊन त्याच्या पायांवर घातलें. 'याला संगीतकला शिकवून कृतार्थ करा,' असें त्या आचार्याला विनवलें. आपल्या लाडक्या मुलाला विद्येसाठीं दूरदेशीं ठेवून रामब्रह्म् जड अंतःकरणानें घरीं आला.

व्यंकटरमणय्यानें आपल्या नव्या शिष्याला थोड्याच दिवसांत पारखलें. आपली विद्या आणि कला या मुलाच्या हृदयांत घातल्यानें ती चिरंतन सफल होईल, असें त्याला वाटलें. म्हणून त्यानें पान्हा न चोरतां आपली गानविद्या रहस्यासह त्यागराजाला शिकवली. गुरूनें जें जें शिकवलें, तें तें त्यागराजानें आपल्या प्रतिभेच्या बळावर अधिक सूक्ष्म केलें, अधिक विकसित केलें. तो वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षीं संगीतशास्त्रांत पारंगत झाला. रागदारी, आलाप, मूर्च्छना, विविध ताल, इत्यादि संगीताच्या सर्व अंगांवर प्रभुत्व मिळवलें. गुरूनें दिलेल्या संगीतकलेला त्यानें आपल्या अंतरांतल्या भक्तीची जोड दिली. दोन्हींचा दूधसाखरेसारखा मधुर मिलाप झाला. त्यामुळें त्याच्या गायनांत श्रोत्यांना एक अननुभूत असा दिव्य आनंद लाभूं लागला. विद्या पूर्ण झाल्यावर गुरूचा आशीर्वाद घेऊन त्यागराज आपल्या घरीं परत आला.

उत्तरोत्तर त्याची भक्ति वाढूं लागली. तो बापाला घरकामांत योग्य ती मदत करी आणि उरलेला वेळ रामरायाच्या भजनपूजनांत सार्थकीं लावी. त्यानें आपली संगीतकला रामाच्या सेवेचें साधन बनवली. तो आपलें संगीतांतलें प्रावीण्य रामाच्या भजनांत ओतूं लागला. आपली कला चरितार्थासाठीं राबवावी, ही कल्पना त्याला स्वप्नांतसुद्धा शिवली नाहीं. तो सदैव निजानंदांत मग्न राहिला.

त्यागराज असा भक्तीच्या मार्गाला लागलेला पाहून त्याच्या आई-बापांना परम संतोष झाला. देवानें दाखला दिला त्याप्रमाणें आपला मुलगा पुढच्या काळांत भक्तशिरोमणि म्हणून प्रसिद्ध होणार आणि आपलें कुळ उद्धरणार, याबद्दल त्यांना शंका उरली नाहीं.

त्यागराज असा विद्वान् आणि भक्त, तर त्याचे जपेश आणि रामनाथ हे मोठे बंधु अगदींच वेगळे. स्वार्थी पण पराक्रमशून्य. त्यामुळें संसाराचा गाडा एकट्या रामब्रह्मलाच ओढावा लागे. कुटुंबांतला परिवार वाढत चालला, तसतशी त्याची गरिबीहि वाढूं लागली. तिरुवारूरमध्यें सर्वांचा



त्यागराजाची संगीताराधना

योगक्षेम चालवणें त्याला दिवसेंदिवस कठीण होऊं लागलें. एखाद्या गांवीं मानानें दिवस काढणें कठीण होऊं लागलें कीं स्वाभिमानी गृहस्थ बहुधा स्थानत्याग करतो. रामब्रह्मनेंहि तसेंच केलें. तिरुवारूर सोडून तो तंजावरजवळच्या पंचनदक्षेत्रांत रहायला आला. तिथें मात्र त्याचा जम चांगला बसला. तिथें त्याच्या संसारांतलें दैन्य हटलें आणि त्याला सुखवस्तुपणा प्राप्त झाला.

ओला होऊन, त्यानें त्यागराजाला दंडप्रणाम केला. ' देवा ! तुझी कृपा,' असें म्हणतांना त्याचा कंठ दाटून आला.

रामब्रह्म् हा एक विद्वान् पण गरीब ब्राह्मण होता. सदाचारी माणसांशीं बहुधा लक्ष्मीचें वांकडें असतें, तसेंच तें रामब्रह्म्च्या बाबतींतहि होतें. तो ईश्वरभक्त होता आणि प्रपंचांतल्या कष्टांची विशेषशी काळजी करीत नव्हता. शांता ही त्याची धर्मपत्नी. ती नांवाप्रमाणें शांत होती आणि स्वभावानें कोमल होती. कोणत्याहि प्रकारें कुरकुर न करतां नवरा जें काय मिळवून आणील, तेवढ्यांत ती कोंड्याचा मांडा करीत होती. दोघेंहि समजूतदार असल्यामुळें त्या घरांत समाधान नांदत होतें. रामब्रह्म्च्या भक्तीचा वांटा तिलाहि मिळाला होता. रामब्रह्म्प्रमाणेंच तीहि मंदिरांत जाऊन त्यागराजाची पूजा आणि सेवा करीत होती.

रामब्रह्म्ला आधींचे दोन मुलगे होते. थोरल्याचें नांव जपेश आणि धाकट्याचें रामनाथ. दोन्ही मुलें चांगलीं होतीं, हुशार होतीं. त्यांच्या बाललीला पाहून रामब्रह्म्ला सुख होई; पण समाधान मात्र वाटत नसे. आपल्याला ध्रुव-प्रल्हादासारखा भक्तशिरोमणि पुत्र व्हावा, अशी त्याची तीव्र आकांक्षा होती. पण या दोन्ही मुलांत त्याला भक्तीचें बीजसुद्धां दिसत नव्हतें. हीं मुलें व्यवहारी होतील; पण भक्त कांहीं होणार नाहींत, असें त्याला वाटे. म्हणून तो रोज त्यागराजापुढें नाक घांसून त्याची प्रार्थना करी.

" देवा, मला आणखी एक पुत्र दे आणि तो तुझा परमभक्त होईल असं कर. "

त्यासाठीं त्यानें शांतेलाहि त्यागराजाच्या सेवेला लावलें होतें. तिलाहि तशा अलौकिक पुत्राची अपेक्षा होतीच. ती मंदिरांत जाई, प्रार्थना करी आणि घटका घटका ध्यान धरून बसे. कांहीं दिवस गेले आणि मग एका रात्रीं तिला स्वप्नसाक्षात्कार झाला. एका दिव्य पुरुषानें तिच्यापुढें प्रकट होऊन तिला वरदान दिलें.

" शांते, तुझी सेवा मला पावली. मी प्रसन्न आहें. तुझ्या उदरीं एक महान् गायक आणि अनन्य भक्त असा पुत्र जन्म घेईल ! "

शांता जागी झाली. तिनें आपल्या पतीला हा दृष्टान्त सांगितला. उभयतांनीं त्या स्वप्नांतल्या वरदानावर पूर्ण श्रद्धा ठेवली. कांहीं दिवसांनीं शांतेला गर्भसंभव झाला. नवमास पूर्ण होतांच ती सुखरूपपणें प्रसूत झाली. पुत्रदर्शनानें रामब्रह्मम्‌चा आनंदसागर उचंबळला. त्यागराजाच्या वरानें झालेला पुत्र, म्हणून त्यानें 'त्यागराज' असेंच मुलाचें नांव ठेवलें. इतके दिवस त्यागराज मंदिरांत होता, तो आतां बालरूप घेऊन त्याच्या घरांत खेळूं लागला. आईच्या उबेंत आणि बापाच्या छायेंत तो दिशीं-माशीं वाढूं लागला. तो चलाख आहे, कुठलीहि गोष्ट चटकन् ग्रहण करणारा आहे, हें लवकरच रामब्रह्मम्‌च्या निदर्शनास आलें.

पांच वर्षांचा होतांच रामब्रह्मम्‌नें मुलाच्या शिक्षणाचा 'ओनामा' केला. त्यागराज बापाच्या हाताखालींच शिकूं लागला. प्रथम तो तेलगु ही आपली मातृभाषा शिकला. नदीच्या मुखानें समुद्रांत शिरावें त्याप्रमाणें मग त्यानें मातृभाषेच्या द्वारें संस्कृत वाङ्मयात प्रवेश करून घेतला. संस्कृत भाषेचें त्यानें खोल आणि विस्तृत असें अध्ययन केलें. पण रामब्रह्मम्‌ला दिसून आलें कीं, भाषा आणि शास्त्र यांपेक्षां मुलाचा ओढा संगीताकडेच विशेष आहे. कुठूनहि संगीताचा स्वर आला कीं तो हरणा-सारखा लुब्ध होतो आणि नकळत त्याच्या मुद्रेवर विजेसारखा कसला तरी भाव तरळून जातो. त्यावरून त्याला देवाच्या साक्षात्काराचें स्मरण झालें. 'तुझा पुत्र महान् गायक होईल,' असा देवानें शांतेला दृष्टान्त दिला होता आणि त्याच भवितव्याचीं लक्षणें त्यागराज आपल्या बाल-वयांतच दाखवूं लागला होता.

रामब्रह्मम्‌नें मग ताबडतोब त्याच्या संगीतशिक्षणाची सोय लावून दिली. तंजावरच्या राजदरबारांत शोंडी व्यंकटरमणय्या नांवाचा एक मोठा गवई होता. त्या भागांत त्याच्या गायनाची मोठी ख्याति होती.

ओला होऊन, त्यानें त्यागराजाला दंडप्रणाम केला. 'देवा! तुझी कृपा,' असें म्हणतांना त्याचा कंठ दाटून आला.

रामब्रह्मम् हा एक विद्वान् पण गरीब ब्राह्मण होता. सदाचारी माणसांशीं बहुधा लक्ष्मीचें वांकडें असतें, तसेंच तें रामब्रह्मम्च्या बाबतींतहि होतें. तो ईश्वरभक्त होता आणि प्रपंचांतल्या कष्टांची विशेषशी काळजी करीत नव्हता. शांता ही त्याची धर्मपत्नी. ती नांवाप्रमाणें शांत होती आणि स्वभावानें कोमल होती. कोणत्याहि प्रकारें कुरकुर न करतां नवरा जें काय मिळवून आणील, तेवढ्यांत ती कोंड्याचा मांडा करीत होती. दोघेंहि समजूतदार असल्यामुळें त्या घरांत समाधान नांदत होतें. रामब्रह्मम्च्या भक्तीचा वांटा तिलाहि मिळाला होता. रामब्रह्मम्प्रमाणेंच तीहि मंदिरांत जाऊन त्यागराजाची पूजा आणि सेवा करीत होती.

रामब्रह्मम्ला आधींचे दोन मुलगे होते. थोरल्याचें नांव जपेश आणि धाकट्याचें रामनाथ. दोन्ही मुलें चांगलीं होतीं, हुशार होतीं. त्यांच्या बाललीला पाहून रामब्रह्मम्ला सुख होई; पण समाधान मात्र वाटत नसे. आपल्याला ध्रुव-प्रल्हादासारखा भक्तशिरोमणि पुत्र व्हावा, अशी त्याची तीव्र आकांक्षा होती. पण या दोन्ही मुलांत त्याला भक्तीचें बीजसुद्धां दिसत नव्हतें. हीं मुलें व्यवहारी होतील; पण भक्त कांहीं होणार नाहींत, असें त्याला वाटे. म्हणून तो रोज त्यागराजापुढें नाक घांसून त्याची प्रार्थना करी.

"देवा, मला आणखी एक पुत्र दे आणि तो तुझा परमभक्त होईल असं कर."

त्यासाठीं त्यानें शांतेलाहि त्यागराजाच्या सेवेला लावलें होतें. तिलाहि तशा अलौकिक पुत्राची अपेक्षा होतीच. ती मंदिरांत जाई, प्रार्थना करी आणि घटका घटका ध्यान धरून बसे. कांहीं दिवस गेले आणि मग एका रात्रीं तिला स्वप्नसाक्षात्कार झाला. एका दिव्य पुरुषानें तिच्यापुढें प्रकट होऊन तिला वरदान दिलें.

" शांते, तुझी सेवा मला पावली. मी प्रसन्न आहें. तुझ्या उदरीं एक महान् गायक आणि अनन्य भक्त असा पुत्र जन्म घेईल ! "

शांता जागी झाली. तिनें आपल्या पतीला हा दृष्टान्त सांगितला. उभयतांनीं त्या स्वप्नांतल्या वरदानावर पूर्ण श्रद्धा ठेवली. कांहीं दिवसांनीं शांतेला गर्भसंभव झाला. नवमास पूर्ण होतांच ती सुखरूपपणें प्रसूत झाली. पुत्रदर्शनानें रामब्रह्मम्चा **आनंदसागर** उचंबळला. त्यागराजाच्या वरानें झालेला पुत्र, म्हणून त्यानें '**त्यागराज**' असेंच मुलाचें नांव ठेवलें. इतके दिवस त्यागराज मंदिरांत होता, तो आतां बालरूप घेऊन त्याच्या घरांत खेळूं लागला. आईच्या उबेंत आणि बापाच्या छायेंत तो दिशीं-माशीं वाढूं लागला. तो चलाख आहे, कुठलीहि गोष्ट चटकन् ग्रहण करणारा आहे, हें लवकरच रामब्रह्मम्च्या निदर्शनास आलें.

पांच वर्षांचा होतांच रामब्रह्मम्नें मुलाच्या शिक्षणाचा ' ओनामा ' केला. त्यागराज बापाच्या हाताखालींच शिकूं लागला. प्रथम तो तेलगु ही आपली मातृभाषा शिकला. नदीच्या मुखानें समुद्रांत शिरावें त्याप्रमाणें मग त्यानें मातृभाषेच्या द्वारें संस्कृत वाङ्मयात प्रवेश करून घेतला. संस्कृत भाषेचें त्यानें खोल आणि विस्तृत असें अध्ययन केलें. पण रामब्रह्मम्ला दिसून आलें कीं, भाषा आणि शास्त्र यांपेक्षां मुलाचा ओढा संगीताकडेच विशेष आहे. कुठूनहि संगीताचा स्वर आला कीं तो हरणा-सारखा लुब्ध होतो आणि नकळत त्याच्या मुद्रेवर विजेसारखा कसला तरी भाव तरळून जातो. त्यावरून त्याला देवाच्या साक्षात्काराचें स्मरण झालें. ' तुझा पुत्र महान् गायक होईल, ' असा देवानें शांतेला दृष्टान्त दिला होता आणि त्याच भवितव्याचीं लक्षणें त्यागराज आपल्या बाल-वयांतच दाखवूं लागला होता.

रामब्रह्मम्नें मग ताबडतोब त्याच्या संगीतशिक्षणाची सोय लावून दिली. तंजावरच्या राजदरबारांत शोंडी व्यंकटरमणय्या नांवाचा एक मोठा गवई होता. त्या भागांत त्याच्या गायनाची मोठी ख्याति होती.

संगीतविद्येचा महान् आचार्य म्हणून लोक त्याला ओळखीत होते. रामब्रह्मनें त्यागराजाला नेऊन त्याच्या पायांवर घातलें. 'याला संगीतकला शिकवून कृतार्थ करा,' असें त्या आचार्याला विनवलें. आपल्या लाडक्या मुलाला विद्येसाठीं दूरदेशीं ठेवून रामब्रह्म् जड अंतःकरणानें घरीं आला.

व्यंकटरमणय्यानें आपल्या नव्या शिष्याला थोड्याच दिवसांत पारखलें. आपली विद्या आणि कला या मुलाच्या हृदयांत घातल्यानें ती चिरंतन सफल होईल, असें त्याला वाटलें. म्हणून त्यानें पान्हा न चोरतां आपली गानविद्या रहस्यासह त्यागराजाला शिकवली. गुरूनें जें जें शिकवलें, तें तें त्यागराजानें आपल्या प्रतिभेच्या बळावर अधिक सूक्ष्म केलें, अधिक विकसित केलें. तो वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी संगीतशास्त्रांत पारंगत झाला. रागदारी, आलाप, मूर्च्छना, विविध ताल, इत्यादि संगीताच्या सर्व अंगांवर प्रभुत्व मिळवलें. गुरूनें दिलेल्या संगीतकलेला त्यानें आपल्या अंतरांतल्या भक्तीची जोड दिली. दोन्हींचा दूधसाखरेसारखा मधुर मिलाप झाला. त्यामुळें त्याच्या गायनांत श्रोत्यांना एक अननुभूत असा दिव्य आनंद लाभूं लागला. विद्या पूर्ण झाल्यावर गुरूचा आशीर्वाद घेऊन त्यागराज आपल्या घरीं परत आला.

उत्तरोत्तर त्याची भक्ति वाढूं लागली. तो बापाला घरकामांत योग्य ती मदत करी आणि उरलेला वेळ रामरायाच्या भजनपूजनांत सार्थकीं लावी. त्यानें आपली संगीतकला रामाच्या सेवेचें साधन बनवली. तो आपलें संगीतांतलें प्रावीण्य रामाच्या भजनांत ओतूं लागला. आपली कला चरितार्थासाठीं राबवावी, ही कल्पना त्याला स्वप्नांतसुद्धा शिवली नाहीं. तो सदैव निजानंदांत मग्न राहिला.

त्यागराज असा भक्तीच्या मार्गाला लागलेला पाहून त्याच्या आई-बापांना परम संतोष झाला. देवानें दाखला दिला त्याप्रमाणें आपला मुलगा पुढच्या काळांत भक्तशिरोमणि म्हणून प्रसिद्ध होणार आणि आपलें कुळ उद्धरणार, याबद्दल त्यांना शंका उरली नाहीं.

त्यागराज असा विद्वान् आणि भक्त, तर त्याचे जपेश आणि रामनाथ हे मोठे बंधु अगदींच वेगळे. स्वार्थी पण पराक्रमशून्य. त्यामुळें संसाराचा गाडा एकट्या रामब्रह्मलाच ओढावा लागे. कुटुंबांतला परिवार वाढत चालला, तसतशी त्याची गरिबीहि वाढूं लागली. तिरुवाल्लूरमध्यें सर्वांचा



त्यागराजाची संगीताराधना

योगक्षेम चालवणें त्याला दिवसेंदिवस कठीण होऊं लागलें. एखाद्या गांवीं मानानें दिवस काढणें कठीण होऊं लागलें कीं स्वाभिमानी गृहस्थ बहुधा स्थानत्याग करतो. रामब्रह्मनेंहि तसेंच केलें. तिरुवाल्लूर सोडून तो तंजावरजवळच्या पंचनदक्षेत्रांत रहायला आला. तिथें मात्र त्याचा जम चांगला बसला. तिथें त्याच्या संसारांतलें दैन्य हटलें आणि त्याला सुखवस्तुपणा प्राप्त झाला.

त्यागराजाच्या अठराव्या वर्षी रामब्रह्मन्‌नें त्याचें लग्न केलें. पार्वती नांवाची नवी सून घरांत आणली. त्यागराजाच्या बाबतींतलें आपलें सर्व कर्तव्य आपण पार पाडलें, या समाधानांत थोड्याच कालानें रामब्रह्मन् स्वर्गवासी झाला. त्यागराजाची आईहि फार दिवस मागें राहिली नाहीं. त्याच्या मस्तकावरचें माता-पित्यांचें छत्र असें एकाएकीं फाटलें. जिच्या सोबतीनें पुढचें सर्व आयुष्य घालवायचें, ती त्याची पत्नीहि अवघ्या चारच वर्षांत त्याला सोडून गेली. त्यागराज ऐन तारुण्यांत विधुर झाला, सर्व बाजूंनीं उघडा पडला. पार्वतीच्या मृत्यूनें त्याच्या हृदयावर कठोर वज्राघात झाला. जवळच्या लोकांनीं त्यागराजाचें मन वळवून त्याला पुन्हा बोहल्यावर चढवलें. कमलांबा नांवाची पार्वतीला दुसरी एक बहीण होती. तिच्याशींच त्याचें दुसरें लग्न झालें.

अशा रीतीनें नातेवाइकांनीं त्याला संसारी बनवलें खरें; पण त्याचें मन कांहीं संसारांत रमेना. दिवसेंदिवस तो संसारापासून दूर दूर जाऊं लागला. वैराग्यानें त्यांच्या हृदयांत कायमचें ठाणें बसवलें. दिवसाचे प्रहरन् प्रहर तो अध्यात्मचिंतनांत घालवूं लागला. रामभक्ति ही त्याची खरी सहधर्मचारिणी बनली. जागृतींत आणि झोंपेंतहि तीच त्याला रमवूं लागली. स्वतःचा आणि पत्नीचा उदरनिर्वाह चालण्याची जबाबदारी आपल्यावर आहे, हेंहि तो विसरूनच गेला.

बापाच्या पश्चात् रामनाथ नांवाचा त्याचा भाऊ होता तो एकाएकीं मृत्युमुखीं पडला. संसारांतलें सगळें कर्तेपण जपेशाकडे आलें. त्यागराज संसाराला कांहीं हातभार लावीत नाहीं हें त्याला खपेना. त्यागराजाच्या भक्तीची त्याला किंमत नव्हती. तो जाणत होता तो रोकडा व्यवहार. एक दिवस त्यानें त्यागराजाला सरळ धारेवर धरलें.

"मोठा आला आहे देवाचा भक्त! भजन-पूजनानें कांहीं पोट भरत नाहीं, समजलं! उद्योग कर कांहीं तरी. आधीं पोटाची चिंता कर अन् मग आत्मज्ञानाची. तुला अन् तुझ्या बायकोला मी काय म्हणून पोसूं?

हे ढोंग-धत्तुरे तात्रडतोब सोडून दे आणि उद्योगाला लाग. नाहींतर घरांतून वेगळा हो. ”

त्यागराजानें भावाचा भडिमार शांत चित्तानें ऐकला. त्याला राग आला नाहीं. तो नुसता हसला अन् म्हणाला,

“ दादा, वडिलांच्या संपत्तींतला मी वांटा मागेन, म्हणून तूं मला दूर करूं पाहतो आहेस. ठीक आहे. मला संपत्तीची हांव नाहीं. जें काय असेल, त्या सगळ्याचा उपभोग तूंच घे. मला राहण्यासाठीं एक लहानशी झोंपडी बस्स आहे. माझं धन, माझं सर्वस्व म्हणजे ही सीतारामाची मूर्ति. भवसागरांतून पार व्हायला तंबोरा ही माझी नौका आणि रामनाम हाच माझा मोक्ष. ”

त्यावर जपेश म्हणाला,

“ ठीक आहे. मला तुझा मोक्षबिक्ष कांहीं कळत नाहीं. मी आपला व्यवहारी माणूस आहें. मी तुझ्या मोक्षाच्या आड येत नाहीं. ”

आणि त्यानें त्यागराजाच्या मनाप्रमाणें केलें. बापाची एक फाटकी चटई, एक पोंचे आलेला लोटा, तंबोरा, जुन्या हस्तलिखित पोथ्या, रुद्राक्षांची माळ आणि सीतारामाची मूर्ति, एवढ्या वस्तू पित्रार्जित उत्पन्नाची वांटणी म्हणून जपेशानें त्याला दिल्या. रहातें घर आपण घेतलें आणि त्यागराजाला दूर एका पडळींत ताडपत्रांनीं शाकारलेली एक झोंपडी बांधून दिली. त्यागराज तेवढ्यावरच खुष झाला. भावाची कटकट मिटली, म्हणून जपेशहि आनंदित झाला. कमलांबेसह त्यागराजाची घरभरणी त्या झोंपडींत गेली. त्यानें झोंपडींत राममूर्ति मांडली आणि तिच्या पायांशीं हस्तलिखित पोथ्या ठेवून दिल्या. पण कमलांबेला मांडामांडी करायला काय होतें ? ती आपली नवऱ्याचें भजन ऐकत स्वस्थ बसून राहिली. थोड्या वेळानें दोन प्रहरची वेळ आली. दोघांनाहि भूक लागली. कमलांबा म्हणाली, ‘ आतां काय करायचं ? ’ त्यागराज बोलला, ‘ तूं कांहीं काळजी

करूं नको. मी माधुकरी मागून आणतों. मिळेल तें दोघं मिळून जेवूं अन् भजन करीत बसूं.'

आणि मग तोच रोजचा क्रम ठरला. रामाच्या कृपेनें त्याला कांहीं कमी पडलें नाहीं. मागणेंच अधिक नव्हतें; तर कमी काय पडायचें आहे! त्यागराजाच्या हृदयांत दुसऱ्या कोणत्याहि वासनेला जागा नव्हती. कमलांबाहि हळूहळू तशीच बनत चालली होती. भजनाच्या निमित्तानें तिला त्यागराजाचें अमृतमय संगीत ऐकायला मिळे आणि तिची तहानभूक हरे. तिनें खूणगांठ बांधली कीं, आपला नवरा व्यवहारी जगांतला नाहीं. तेव्हां उगीच तक्रारी अन् कुरबुरी करून त्याच्या सुखांत मिठाचा खडा टाकणें बरें नव्हे.

एक दिवस त्याच्या झोंपडींत एका योग्याचें आगमन झालें. त्याचें नांव कृष्णानंद असें होतें. त्यागराजानें त्याचा भक्तिभावानें स्वागतसत्कार केला. कृष्णानंद त्याच्यावर प्रसन्न झाला. वर दिला तर तो खरा होईल, असें त्याचें सामर्थ्य होतें. तो त्यागराजाला म्हणाला, 'तुला काय हवें तें माग.' त्यावर त्यागराजानें हात जोडून प्रेमळ वाणीनें मागितलें,

"महाराज, देणार असाल तर भवसागरांतून सुखेनैव पार पडतां येईल, असा एखादा तारकमंत्र द्या. त्यावांचून दुसरं कांहीं नको."

कृष्णानंदानें त्याला रामाचाच मंत्र दिला. 'जो तुझा उपास्य आहे तोच तुला तारील. तोच जन्ममरणांतून मुक्त करील. तूं रामनामाचा दहा कोटी जप कर. त्यायोगें तूं रामरायाच्या कृपेला पूर्ण पात्र होशील.' कृष्णानंद म्हणाला.

त्यागराजानें कृष्णानंदाचे सद्गुरु म्हणून पाय धरले. त्याच्या आज्ञेप्रमाणें तो लगेच अनुष्ठानाला लागला. रोज सव्वा लाख ही जपसंख्या त्यानें ठरवून घेतली. दिवसांमागून दिवस, महिन्यांमागून महिने जाऊं लागले. त्यागराजाच्या हृदयांत आनंदाचें कमळ पाकळी-पाकळीनें उमलूं लागलें. मुद्रेवर कांति चढूं लागली. मुखांतूनच नव्हे, तर त्याच्या रोमरोमांतून

' राम राम ' हा मंत्र बाहेर उमटूं लागला. कमलांबेनें या त्याच्या उपासनेंत त्याला जीवेंभावें साहाय्य केलें. त्याच्या परमार्थमार्गांतले कांटे-खुंटे तिनें आपल्या पदरानें झाडून काढले. ती त्याला बाधक न होतां साधक ठरली.

वयाच्या अडतिसाव्या वर्षी एका शुभदिनीं त्यागराजाचा दहा कोटी जप पुरा झाला. एक घनघोर जपयज्ञ त्यानें एकट्यानें पार पाडला. त्याक्षणींच त्याला मंत्रसिद्धि प्राप्त झाली. जें बोलेल तें घडेल, असें सामर्थ्य त्याला मिळालें. वर देऊन एखाद्याला सुखाच्या राशीवर बसवावें अथवा शाप देऊन एखाद्या दुष्टाला जाळून दग्ध करावें, अशी एखाद्या महर्षींची वाचाशक्ति त्याला मिळाली. त्यानंतर एका महापर्वणीच्या दिवशीं त्यानें जपाची सांगता करावयाचें ठरवलें. त्यासाठीं अनेक ब्राह्मण बोलावले. त्यांच्याकरवीं जपाचें उद्यापन केलें. आणि त्याप्रसंगीं स्वतःला मिळालेली मंत्रसिद्धि रामरायाच्या चरणीं अर्पण करून तो मोकळा झाला! सिद्धि मिळायला त्याला वर्षांच्या वर्षें लागलीं. पण तिचा त्याग करायला एक क्षणहि लागला नाहीं. त्यागराज हें आपलें नांव त्यानें अशा रीतीनें सार्थ ठरवलें.

आणि त्याच क्षणीं एक महान् चमत्कार घडला. कोणीं तरी त्यागराजाच्या झोपडीचें कवाड बाहेरून हालवलें. कोणी तरी पाहुणा असावा म्हणून त्यागराजानें मोठ्या आतुरतेनें कवाड खोललें. होय; पाहुणाच आला होता त्याच्या दारीं. पण तो अन्नाचा भुकेला माणूस नव्हे; तर भावाचा भुकेला साक्षात् श्रीरामचंद्र! तो एकटाच नव्हता, तर त्याच्यासंगें बंधु लक्ष्मण होता आणि मागच्या बाजूला तपोधन विश्वामित्रहि होता. दोन्ही किशोरवयाच्या मूर्ती! विश्वामित्राच्या यज्ञरक्षणार्थ अयोध्येंतून निघाल्या वेळीं जो होता तोच वेष! खांद्याला धनुष्य, पाठीला भाता, मुद्रेवर प्रसन्नता आणि डोळ्यांत करुणेचा घनसांद्र भाव!

त्यागराजानें पाहिलें आणि तो पाहातच राहिला. पाहतां पाहतां पाहणेंहि संपून गेलें. तो मुळीं देहभानावर उरलाच नाहीं. कुठलें स्वागत

अन् कुठला सत्कार ! प्रभूच्या सांवळ्या रूपांत तल्लीन झाल्यावर कोण कोणाला 'या' म्हणणार आणि कोण कोणाला आसन देणार! त्याग-



राम-लक्ष्मण त्यागराजाच्या दारांत

राजाच्या जीवनांतला तो महन्मंगल क्षण होता. रामाची करुणा त्याच्याच डोळ्यांतून पाझरत होती. रामाचें तेज त्याच्याच मुद्रेवर ओसंडत होतें.

कांहीं वेळानें तो भानावर आला. पण पाहतो तर समोर राम नाहीं, कीं लक्ष्मण नाहीं. तो सगळा साक्षात्कार केवळ स्वप्नासारखा झाला होता. त्याचा देव पायीं चालत आला होता. पण त्याच्या पायाची धूळ मस्तकीं लावण्याचें भाग्य त्याला मिळालें नव्हतें. त्यामुळें त्यागराज विव्हल झाला, विलाप करूं लागला.

'देवा, माझी ही चंद्रमौळी झोंपडी पाहून निघून गेलास ना ? बरोबर आहे तुझं. रत्नजडित सिंहासनावर बसणारा तूं. माझ्या झोंपडींतल्या फाटक्या चटईवर बसणं तुला कसं बरं वाटलं असतं ! रोजच्या महा-नैवेद्याला पंचपक्वान्नांची चव घेणारा तूं. तुला माझ्या बायकोच्या हातची खिचडी कशी आवडली असती ? मीं तुझा कांहींहि आदरसत्कार

केला नाहीं अन् करूं शकलों नसतों. तूं मला दर्शन दिलंस; पण आनंदाऐवजीं शोकसागरांत मात्र बुडवलंस. देवा, या भिकाऱ्यावर तूं रुसून गेलास ....... '

आणि त्या दिवसापासून त्यागराजाच्या कवनांना विलक्षण आर्द्रता निर्माण झाली. नवीं नवीं कवनें, नव्या नव्या चिजा तो रचूं लागला आणि रागदारींत घोळवून गाऊं लागला. त्याच्या भावनांचा जणुं बांधच फुटला. या त्याच्या रामोपासनेंत संगीताचीहि आपोआपच उपासना झाली. त्यानें कित्येक नव्या राग-रागिण्यांना जन्म दिला. त्यांना ताल आणि लय यांची जोड आपोआपच मिळाली. कित्येक रागिण्या त्याच्या कीर्तनाच्या द्वारें लोकांच्या हृदयांत ठसल्या आणि अमर झाल्या.

दिवसेंदिवस त्याच्या भक्तीचा महिमा चौफेर दरवळूं लागला. त्यागराज म्हणजे संगीताचा सम्राट्, अशी सर्वत्र त्याची वाहवा होऊं लागली. त्याच्या दर्शनासाठीं, निरनिराळ्या भागांतून रसिक, भक्त आणि संगीत-प्रेमी जन पंचनदक्षेत्रांत जमूं लागले. जनतेंत अशी भावना निर्माण झाली कीं, त्यागराज म्हणजे नारदाचा अवतार आहे.

त्यानंतर एका दिवसाची गोष्ट. त्यागराजाच्या घरीं एक अतिथि प्राप्त झाला. तो म्हातारा होता आणि काठी टेकीत टेकीत आला होता. त्यागराजानें त्याला विचारलें,

" आजोबा, काय हवं तुम्हांला ? "

" मला होय ? तुझं गाणं हवं. मी तुझी कीर्ति ऐकून आलों आहें. तूं गा. मी ऐकतों. माझे म्हाताऱ्याचे कान तृप्त कर. "

त्यागराजानें लगेच तंबोरा लावला. स्वरांत स्वर मिळवून तो गाऊं लागला. सहजसुंदर, शास्त्रशुद्ध, भक्तिपूर्ण असें तें गाणें होतें. ऐकतां ऐकतां म्हाताऱ्याचे डोळे झरझरूं लागले. त्याच्या मुखावरच्या साऱ्या सुरकुत्या जणुं नाहींशा झाल्या. तो प्रसन्न झाला, तृप्त झाला. ' स्नान करून येतो हं,' असें सांगून तो तिथून बाहेर पडला; पण परत मात्र आला नाहीं

त्यागराजानें त्याची खूप वाट पाहिली. तो त्याच्यासाठीं दिवसभर उपाशी राहिला. पाणवठ्यावर जाऊन त्याला शोधूनहि आला. पण म्हातारा कुठें अदृश्य झाला देव जाणे !

त्याच रात्रीं स्वप्नांत त्याला एका दिव्य पुरुषाचें दर्शन झालें. त्यानें त्यागराजाला म्हटलें,

"त्यागराज, मला ओळखलंस? मी नारद आहें. सकाळीं वृद्धाच्या रूपानें मीच तुझ्या घरीं आलों होतों. तुझा संगीत पाहुणचार मीं मनसोक्त उपभोगला. मला इतर पाहुणचाराची गरज नव्हती, म्हणून निघून गेलों. मी आज तुला 'स्वरार्णव' नांवाचा ग्रंथ देत आहें. त्याचं तूं अध्ययन कर आणि त्याच्या आधारें शास्त्रीय संगीताचा पुनरुद्धार कर."

त्यागराज जागा होऊन पाहतो, तर उशागतीं स्वरार्णवाची पोथी. त्यानें ती उचलली आणि मस्तकीं लावली. ती वाचतां वाचतां त्याला वाटलें कीं, आज स्वरशास्त्राचा दिव्य निधिच आपल्या हातीं लागला. आपली झोपडी जणुं कुबेराचा राजवाडा ठरली. गुरूकडून त्याला संगीत विद्या परिपूर्ण मिळाली होती. या ग्रंथाच्या अध्ययनानें तिच्यांतलीं किती तरी रहस्यें त्याच्यापुढें उघडीं झालीं. त्यापुढचीं त्याचीं सारीं कवनें स्वरार्णवाच्या नियमांना धरून बनूं लागलीं. त्याच्या गाण्याच्या पद्धतींत विलक्षण क्रांति झाली. तो कर्नाटकसंगीताचा प्रणेता ठरला.

त्यागराजाची प्रसिद्धि तंजावरच्या राजवाड्यापर्यंत पोंचायला वेळ लागला नाहीं. त्या काळीं शरभोज नांवाचा राजा तिथें राज्य करीत होता. त्याला गुणिजनांचें अपार प्रेम होतें. त्या कामीं तो उदार होता. आपल्या राजवाड्यांत बोलावून त्यागराजाचा थाटानें सत्कार करावा आणि त्या निमित्तानें त्याच्या गायनाचा लाभ घ्यावा, असें त्यानें ठरवलें. त्यागराजाला कायमचा राजाश्रय देण्याचीहि त्याची तयारी होती. त्यानें त्याला बोलावणें करण्यासाठीं दूत पाठवले. दूतांनीं राजाची इच्छा त्याच्या कानीं घातली. त्यागराज क्षणभर व्यग्र झाला, विवंचनेंत पडला. त्या

त्याच्या संभ्रांत अवस्थेंतून एक कवन आपोआपच बाहेर पडलें. त्या कवनाचा आशय असा होता—

'हे मना, खरं खरं बोल. तुला खाण्यापिण्याचीं, गादीवर लोळण्याचीं सुखं हवींत, का रामरायाची सेवा? दह्यादुधाचा स्वाद अधिक, का ध्यान-भजनाचा? दोहोंपैकीं कोणतं निवडशील? गंगास्नान प्रिय आहे का विहिरींत बुड्या मारणार आहेस? रागलोभादि विकारांनीं भरलेल्या माणसाचीं स्तुतिस्तोत्रं गाण्यांत अभिमान मिरवशील, का आनंदघन रामरायाच्या गुणगानांत? सांग. खरंखुरं सांग... ' आणि त्याच्या मनानें खरेंखुरें काय तें सांगितलें आणि तेंच त्यानें राजदूताच्या द्वारें शरभोज राजाला कळवलें.

" राजा, माझी जिव्हा एक रामनामच जाणते. तिच्याकडून राजस्तुति कधींहि होणार नाहीं. जे हात एकदां रामरायापुढें जोडले गेले,' ते आतां राजाच्या नमस्कारासाठीं जुळणार नाहींत. मीं माझें तन-मन रामरायाच्या चरणीं वाहिलें आहे. तें आतां दुसऱ्याच्या सेवेंत रस घेणार नाहीं. मी एकच राजदरबार जाणतों आणि तो प्रभु रामचंद्राचा दरबार! भाग्य असेल तर त्या दरबारांत जाईन! अन्यत्र नाहीं."

राजदूतांनीं त्यागराजाचा हा संदेश जेव्हां शरभोज राजाला सांगितला, तेव्हां राजा एकदम प्रसन्न झाला. त्याला वाटलें कीं, हें नाणें अस्सल आहे. इथें द्रव्याची मात्रा चालायची नाहीं. त्याला वश करायचें असेल, तर राजवैभवाचा दिमाख सोडून विनीत भावानेंच त्याच्यासमोर गेलें पाहिजे. धन्य त्यागराज!

पण ज्या कारणासाठीं राजा त्याच्यावर संतुष्ट झाला, त्याच कारणा-साठीं त्यागराजाचा मोठा भाऊ जपेश त्याच्यावर संतापला. त्यागराजा-कडे जाऊन त्यानें त्याला ताड्ताड् बोलायला सुरुवात केली.

" राजानं एवढं सन्मानानं पाचारण केलं आणि तूं मात्र त्याचा अपमान केलास. असशील तूं मोठा गायक. पण एवढा गर्व? करंटा कुठला! अरे, तूं

राजदरबारांत गेला असतास, तर तुझ्यावर सन्मान आणि संपत्ति यांचा वर्षाव झाला असता. मलाहि एखादी चांगली नोकरी मिळाली असती. तूं माझ्या आशेवर पाणी ओतलंस. खा आतां जन्मभर माधुकरीचे तुकडे. रात्रंदिवस या मूर्तीपुढें भजन करीत बसतोस, म्हणून तूं असा वेडा झालास. थांब, मी तुझी ती मूर्तिच फेकून देतों."

असें म्हणून जपेशानें त्यागराजाची ती राममूर्ति उचलली आणि निर्दयपणें कावेरी नदीच्या प्रवाहांत फेंकून दिली. त्यानें आपल्या आयुष्यांतलें तें सर्वांत मोठें दुष्कर्म केलें. ती मूर्ति म्हणजे त्यागराजाचा देवच नव्हता; तर जीवप्राण होता. त्यागराजाला अतोनात दुःख झालें. धावत धावत जाऊन त्यानें कावेरीच्या प्रवाहांत उडी घेतली. तो आत्महत्या करायला गेला नव्हता; तर ती मूर्ति शोधून हस्तगत करण्यासाठीं गेला होता. घांटावरच्या लोकांनीं तें पाहिलें. 'त्यागराज बुडाला, मेला,' म्हणून सर्वांनीं एकच हलकल्लोळ केला. पण त्यागराजांचें भावबळ विलक्षण होतें. तो त्या वेगवान् प्रवाहांत बुडाला. अगदीं तळापर्यंत गेला. तिथें त्याला रामप्रभु तेजानें लखलखत असलेला दिसला. तो ती मूर्ति उचलून घेऊन वर आला. पोहत पोहत कांठाला लागला. मूर्तीच्या रूपानें त्याचा प्राण त्याला परत मिळाला होता. त्याचें हृदय आनंदानें उचंबळून गेलें होतें.



त्यागराज कावेरींतून मूर्ति काढतो

तें दृश्य पाहून तीरावरच्या लोकांना परम आश्चर्य वाटलें. त्यागराजाच्या भक्तीची तीरावरच्या लोकांना साक्ष पटली. त्यांनीं त्या भक्तराजाचा

जयजयकार केला. त्याचबरोबर लोकांनीं जपेशाची निर्भर्त्सना करायलाहि कमी केलें नाहीं. जपेशाला आपली चूक त्या वेळीं कळली. तो आपला दुष्टपणा टाकून त्यागराजाला शरण गेला. 'पुष्पसंगें मातीस वास लागे' तसें त्यागराजाच्या संगतीनें त्याचेंहि अंतःकरण हळूहळू शुद्ध आणि निर्मळ झालें. नंतरच्या काळांत त्यानें कधींहि त्यागराजाशी वैर केलें नाहीं.

कांहीं काळानंतर त्यागराजाला वाटलें कीं, आपण एकदां भारतांतल्या तीर्थयात्रा कराव्या. तो आपल्या गांवाहून निघाला आणि प्रथम तिरुपतीला आला. त्याला तिरुपतीच्या दर्शनाची किती तरी दिवसांपासून तळमळ होती. पण मंदिरांत जातो, तर देवासमोर पडदा. पुजाऱ्यांनीं सांगितलें कीं, ही दर्शनाची वेळ नाहीं. त्यागराज त्यांची विनवणी करूं लागला; पण पुजाऱ्यांनीं ती मानली नाहीं. त्यांना काय, सब घोडे बारा टक्के! ते देवाजवळ रहात होते; पण त्यांना भक्तीची पुसटसुद्धा ओळख नव्हती. पण त्यागराजासारखा भक्त, पुजाऱ्यांनीं दर्शन नाकारलें म्हणून तिथून थोडाच दूर होणार होता! तो तिथेंच बसला आणि डोळ्यांत पाणी आणून देवाची प्रार्थना करूं लागला.

"भगवन्, मी तुझ्या दर्शनासाठीं फार दूरवरून आलों आहें. आता एक क्षणाचाहि विलंब मला सहन होत नाहीं. मला तुझ्यापाशीं कसलाहि वर मागायचा नाहीं. मी केवळ तुझा दास आहें आणि दासच राहूं इच्छित आहें. देवा, तूं करुणेचा सागर ना! मग माझे डोळे अन् तुझे चरण यांच्यामधें हा पडदा कां ठेवला आहेस?......"

आणि त्याच क्षणीं तो मधला पडदा एकाएकीं गळून पडला. तिरुपति व्यंकटेश त्यागराजापुढे घवघवीत उभा राहिला. त्यागराजाच्या डोळ्यांना टक लागले. प्रार्थना करायची, स्तोत्र म्हणायचें, तर त्याच्या कंठांतून शब्दच उमटेना. तो जणुं ईश्वरी कृपेच्या त्या प्रवाहांत मिठाच्या बाहुली-सारखा बुडून विरघळून गेला.

त्यागराज तिथून पुढें कांचीला गेला, श्रीरंगमला गेला. तो अनेक

तीर्थक्षेत्रें हिंडला. एकाच रामाचीं विविध रूपें त्यानें निरनिराळ्या क्षेत्रांत पाहिलीं. सर्वत्र रामच भरून राहिला आहे, असा त्याला प्रत्यय आला. त्याची भक्ति सर्वांगीं पुष्ट झाली, प्रफुल्ल झाली. साऱ्या यात्रा संपवून तो सुस्वरूपपणें आपल्या गांवी परत आला. पुनश्च भजन-पूजनाचें कार्य सुरू झालें. संगीताची आराधना आणि रामाची आराधना हीं दोन्ही त्यानें एकच करून टाकलीं. त्याच्या प्रत्येक स्वरांतून राम प्रकटूं लागला आणि रामाच्या प्रत्येक लीलेंतून संगीत स्रवूं लागलें.

त्यानंतर एक दिवस अय्यर आडनांवाचा एक गृहस्थ आपली नाटक-मंडळी घेऊन त्यागराजाच्या गांवीं आला. तोहि चांगला गायक होता. त्यानें आपला खेळ त्या गांवांत लावला आणि तो पाहायला येण्यासाठीं त्यागराजाला आग्रहाची विनंति केली. त्यागराजानें ती विनंति मानली. तो नाटक पाहायला गेला. अय्यरनें त्या नाटकांत एका प्रसंगीं 'आनंद-भैरवी' या रागांत एक पद म्हटलें. त्यागराजाला तें खूप आवडलें. देह-भान विसरून त्यानें तें ऐकलें. त्याबद्दल अय्यरची मुक्तकंठानें प्रशंसाहि केली. त्या वेळीं अय्यर त्याला हात जोडून म्हणाला,

" महाराज, ही चीज मीं बांधली आहे. माझी ही आनंदभैरवी रागिणी आपण संसारांत अमर करावी आणि या रागिणींत आपण पद्यरचना करूं नये आणि गाऊं नये, अशी माझी आपणांला कळकळीची विनंति आहे. आपण कृपा केलीत, तर माझ्या रागिणीचें नांव अमर होईल. मी कृतार्थ होईन."

त्यागराजानें ती विनंति मान्य केली आणि आयुष्यांत कधींहि त्या रागिणींत चीज बनवली नाही.

त्यागराजाला म्हातारपण आलें आणि एक दिवस त्याची पत्नी कमलांबा अचानकपणें त्याला सोडून गेली. तिच्या मृत्यूनें त्यागराज अगदींच उघडा पडला. कमलांबेनें त्याला जिवाआगळें संभाळलें होतें. त्याच्या आपत्तीत तिनें आपल्या शिरावर झेलल्या होत्या. त्याच्या चंद्रमौळी

संसारांतच सुख मानून तिनें त्याची मनोभावें सेवा केली होती. तो रामाचा भक्त, तशी ती त्यागराजाची भक्त बनली होती. तिच्या अभावीं आतां त्याची आबाळ होऊं लागली. तिला सांगातीं घेऊनच त्यानें आजवर परमार्थाचा मार्ग आक्रमला होता. पण आतां तो एकटा पडला. कसे तरी दिवस घालवूं लागला. त्याच्या संगीतांतून अधिक कारुण्य, अधिक आर्तता ओसंडूं लागली. इहलोकांतलें वास्तव्य आतां त्याला कष्टमय वाटूं लागलें.

अखेर एके दिवशीं रामरायानें स्वप्नांत येऊन त्याला सांगितलें,

" माझ्या भक्ता, तुझी सेवा मीं मानून घेतली. मी आतां लवकरच तुला माझ्या चरणांशीं ठाव देईन."

त्यागराज जागा झाला. त्याचा आनंद हृदयांत सामावेना. जें त्याला हवें होतें, त्याचेंच आश्वासन रामाकडून मिळालें. त्यासाठींच तर त्यानें आजवर एवढा अट्टाहास केला होता. त्यामुळें दुसऱ्याच दिवशीं त्यानें विधिपूर्वक संन्यास घेतला. नंतरहि त्यानें रामाचीं पदें रचलीं आणि गाइलीं. पण तीं केवळ कृतज्ञतेनें भरलेलीं होतीं. असे कांहीं दिवस गेले आणि त्याला अठ्यांशीवें वर्ष पूर्ण झालें. पुढें पराभव संवत्सर लागलें. पौष कृष्ण पंचमी उगवली आणि त्याच दिवशीं त्यागराजाच्या आयुष्याचा अस्त झाला. परम समाधानानें आणि कृतार्थतेच्या आनंदांत त्याचा आत्मा शरीराच्या पिंजऱ्यांतून बाहेर पडला आणि रामरूपीं विलीन झाला.



# जयदेव

संस्कृत काव्यवाङ्मयाच्या इतिहासांत जयदेवकवीला मानाचें स्थान आहे. हा ११ व्या शतकाच्या सुमारास उत्कलमधल्या किंदुबिल्व या गांवीं जन्मला. यानें 'गीतगोविंद' या नांवाचें काव्य रचलें. प्रबंध व श्लोक अशी या काव्याची रचना असून त्याचे १२ सर्ग आहेत. यांत राधाकृष्णांच्या मधुर भक्तीचें वर्णन आहे. हें काव्य अत्यंत नादमय असून त्यांत शब्दालंकार आणि अर्थालंकार विपुल आहेत. जर्मन महाकवि गटे यानें या काव्याची कालिदासाच्या शाकुंतल आणि मेघदूत या काव्यांशीं तुलना केली आहे. विश्वकवि रवींद्रनाथ ठाकूर यांच्या मनावर तर गीतगोविंदाची एवढी मोहिनी पडली कीं, त्यांनीं त्या काव्याची एक प्रत स्वतःसाठीं स्वहस्तें लिहून घेतली. एकाच काव्यकृतीनें अजरामर झालेल्या कवींत जयदेवाची गणना होते. हा जसा कवि होता, तसाच परम भक्तहि होता. बंगालचा राजा लक्ष्मणसेन याच्या पदरीं हा होता, असा एक शिलालेख आढळला आहे. अद्यापि याच्या गांवीं दरवर्षी याच्या स्मरणार्थ मोठी यात्रा भरते.

* * *

ज्या मुलांचे आईबाप लहानपणींच मृत्यु पावतात, त्यांचें भवितव्य केवळ दैवाधीन होतें. अशीं पोरकीं मुलें कित्येकदां बिघडतात, वाईट मार्गाला लागतात आणि कसें तरी आयुष्य काढतात. कित्येकदां त्यांची वाऱ्यावर वावडी होते. वडील माणसांच्या मायाममतेचा लाभ न झाल्यामुळें त्यांच्याहि अंतरांत कधीं कुणाबद्दल मायाममता निर्माण होत नाहीं. तीं उच्छृंखल होतात आणि विधिनिषेधांची पर्वा न करतां वागतात.

पण सुदैवानें जयदेवाच्या बाबतींत तसें कांहीं घडलें नाहीं. बंगालमध्यें किंदुबिल्व नांवाच्या एका लहानशा गांवांत त्याचें लहानसें घर होतें.

त्याचा पिता भोजदेव सात्त्विक होता आणि त्याची माता रमादेवी प्रेमळ होती. जयदेव हें त्यांच्या उदरीं जन्मलेलें पहिलेंवहिलें पुत्ररत्न. अपार कौतुकानें त्यांनीं त्याला वाढवलें होतें. पण जयदेवाला पुरती समज येण्यापूर्वींच त्या दोघांचें देहावसान झालें. बाहेर जावें तर बाप नाहीं, आंत जावें तर आई नाहीं. जयदेव एकाएकीं पोरका झाला. सर्वांच्या करुणेचा विषय बनला. शेजाऱ्यापाजाऱ्यांनीं त्याला चार दिवस जेवूंखाऊं घातलें. चार दिवस त्याची काळजीहि वाहिली. पण 'रोज मरे त्यास कोण रडे' अशी म्हण आहे ना! जयदेवाचें पोरकेपण आतां सदाचेंच झालें होतें. यापुढें त्याची चिंता त्यालाच वहायला हवी होती.

जयदेवाला तें कळलें. तो आपल्या बालबुद्धीप्रमाणें आपल्या पुढील आयुष्याचा विचार करूं लागला. श्रीहर्ष या महाकवीच्या वंशांत तो जन्मला होता. त्या वंशाचें शहाणपण त्याला उपजत मिळालें होतें. त्याला धनाचा वारसा नव्हता; पण ज्ञानाचा होता. त्यानें ठरवलें कीं, आपण शिकलें पाहिजे, खूप अध्ययन केलें पाहिजे. विद्वान् झाल्यावांचून आपल्याला कोणी मान देणार नाहीं. विद्येवांचून आपलें दैन्य फिटणार नाहीं.

आणि तो नियमितपणें गांवांतल्या पाठशाळेंत जाऊं लागला. आईच्या प्रेमाला आंचवलेलें त्याचें मन विद्येंत रमूं लागलें. एक वेळ माधुकरी मागून आणावी, दोन वेळ ती खावी आणि उरलेल्या वेळांत अभ्यासाचा धोशा लावावा, असा त्याचा दिनक्रम बसून गेला. त्याची पाठशक्ति विलक्षण होती. लहानपणींच कित्येक ग्रंथ तो घडाघडा पाठ म्हणूं लागला. सरस्वती प्रथम त्याच्या जिभेवर आली, आणि जसजसा पाठ केलेल्या ग्रंथांचा अर्थ समजूं लागला, तसतशी ती त्याच्या हृदयांत जाऊन बसली. त्यानें सरस्वतीवर प्रेम केलें म्हणण्यापेक्षां सरस्वतीनेंच त्याच्यावर प्रेम केलें. त्यामुळें तो गुरुजनांनाहि प्रिय झाला. तारांगणांत चंद्र आणि देवसभेंत इंद्र, तसा तो त्या पाठशाळेंत शोभूं लागला. त्याचें वक्तृत्व झांकतां झांकेना. त्याचें मार्मिकपण लपवावें म्हटलें तरी लपेना.

बरोबरीच्या विद्यार्थ्यांना वाटलें कीं हा आतां दिग्विजय करणार आणि पालखींत बसून हिंडणार. पण बरेच दिवस झाले, तरी तसें कांहींच चिन्ह दिसेना. तो विद्वान् झाला, त्याच क्षणीं विरक्तहि झाला. त्यानें व्यास-महर्षींचें भागवत वाचलें आणि त्यांतल्या कृष्णचरित्रानें त्याचें मन वेधून घेतलें. कृष्णचरित्राबरोबरच त्यांतलीं भक्तचरित्रेंहि त्याला आवडूं लागलीं. जी कृष्णभक्ति उद्धवाच्या, नारदाच्या आणि शुकाच्या अंतरांत शिरली तीच जयदेवाच्याहि हृदयांत येऊन विराजमान झाली. त्या भक्तीनें त्याच्या अंतरांत सुखाचीं कारंजीं उत्पन्न झालीं. धन-मन-ऐश्वर्य हें सगळें त्या भक्तीच्या प्रकाशांत त्याला फिकें वाटूं लागलें. तो श्रीहरीच्या लीलांचें चिंतन करीत, त्याच्या भजनाची गोडी चाखीत, निरिच्छ, निःसंग वृत्तीनें जगूं लागला. घर त्याचें वडिलार्जित होतें, म्हणजे बसायला निवारा होता आणि गांवांत माधुकरी पुरेशी मिळत असल्यामुळें निर्वाहाची चिंता नव्हती. मग आणखी काय हवें !

पण त्याच गांवांतल्या एका सावकाराचा जयदेवाच्या घरावर डोळा गेला. निरंजन असें त्या सावकाराचें नांव होतें. लोकांच्या टाळूवर मिरीं वाटून त्यानें गडगंज संपत्ति जमा केली होती आणि मोठा इमलाहि उभारला होता. जयदेवाचा बाप त्याचें कांहीं देणें लागत होता. किती तें त्यालाच माहीत ! पण आपल्या सावकारी वृत्तीनें त्यानें तें देणें घराएवढें फुगवलें होतें. त्याला वाटलें कीं, जयदेवाशीं कुरापत काढली तर तो हिशेबहि मागणार नाहीं आणि घराचाहि लोभ धरणार नाहीं. त्यानें मग एक खोटा दस्तऐवज तयार केला आणि एक दिवस तो चोरपावलांनीं जयदेवाकडे दाखल झाला. इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर त्यानें लगेच मूळ मुद्द्याला हात घातला.

“ हें पाहा जयदेव, तुझ्या वडिलांनीं माझ्याकडून बरंचसं कर्ज घेतलं होतं. तें न फेडतां ते मरून गेले. तुझंहि कांहीं लक्षण ठीक दिसत नाहीं. तुझ्या हातून तें फिटणं अशक्य आहे. तूं भक्तीच्या नादांत गुंग होऊन

३५
किशोर ९४

पडला आहेस. मला भक्ति-बिक्ति कांही कळत नाहीं. मी आहे व्यवहारी माणूस. माझं देणं व्याजासह परत कर, नाहीं तर हें तुझं राहतं घर माझ्या हवालीं कर. हा पाहा मीं दस्तऐवज तयार करून आणला आहे. फक्त सही केलीस कीं काम भागलं."

जयदेवानें सावकाराचें बोलणें शांतपणें ऐकलें. त्याला आश्चर्यहि वाटलें नाहीं आणि रागहि आला नाहीं. त्याला घर हवें होतें; पण नसलें म्हणूनहि कांहीं बिघडत नव्हतें. त्याची आसक्ति ऐहिक वस्तूंत कुठें नव्हतीच. मुद्रेवर कसलाहि कटुभाव न दाखवतां तो सावकाराला म्हणाला,

"आणा तो दस्तऐवज इकडे. मी सही करतों. तुमच्या ऋणांतून माझ्या वडिलांना मुक्त होऊं दे. त्याशिवाय त्यांना सद्गति मिळणार नाहीं."

सावकारानें पुढें केलेल्या कागदावर जयदेवानें सही केली. सावकार घराचा कबजा घेण्याच्या तयारीनेंच आला होता. त्यासाठीं लोकहि त्यानें बरोबर आणले होते. 'तूं आतां घरांतून बाहेर हो,' असें त्यानें तावडतोब जयदेवाला सांगितलें. 'ठीक आहे' म्हणून जयदेव आपलीं पोथ्यापुस्तकें कवळूं लागला.

आणि एवढ्यांत भक्तवत्सल श्रीहरीनें एक अगम्य लीला दाखवली. निरंजन सावकाराचा एक नोकर 'आग आग' म्हणून आरडत ओरडत तिथें आला. सावकारानें विचारलें, 'अरे कुठें आग लागली?' नोकर म्हणाला, 'आपल्या घराला.' सावकार धावत रस्त्यावर येतो, तर त्याच्यां घराच्या बाजूनें आगीचे लोळ उठत असलेले त्याला दिसले. सावकार ऊर पिटीत धावत सुटला.

पण त्याच्याहि आधीं तीरासारखा धावला तो जयदेव. जयदेवाच्या पाठोपाठ आळींतले लोकहि तिथें पोंचले. जयदेवानें जिवाची शर्थ करून ती आग आटोक्यांत आणली आणि विझवली. फारसें नुकसान न होतां सावकाराचें घर आणि आंतली धनदौलत वांचली. श्रमानें लालबुंद झालेला

चेहरा आणि अंगांतून निथळत्या घामाच्या धारा, अशा अवस्थेंत जयदेव तिथून परत फिरला.

पण सावकारानें त्याला पांच पावलेंहि पुढें जाऊं दिलें नाहीं. त्याच्या कसाबकरणीचें फळ देवानें हातोहात त्याला दिलें होतें. त्याला वाटलें कीं, जयदेवाच्या घराचा कबजा घेतल्यानें जर एवढें प्रायश्चित्त मिळालें, तर त्याला निर्वासित केल्यानें केवढें मिळेल! त्यानें एकदम पुढें होऊन जयदेवाचे पायच धरले. तो डोळ्यांत आंसवें आणून म्हणाला,

" जयदेव, माझा अपराध क्षमा कर. आज तूं नसतास तर मी राखेंत बसलों असतों. माझ्या लोभाचं प्रायश्चित्त मला मिळालं. भगवद्‌भक्ताचं माहात्म्यहि कळलं. तुझ्या सहीचा कागद हा पाहा मी फाडून टाकतों. "

पण तो कागद फाडला न फाडला, दोन्ही गोष्टी जयदेवाच्या दृष्टीनें सारख्याच होत्या. त्याच्या वांट्याला तें घर आतां घर उरलेंच नव्हतें. तो म्हणाला, 'बरं झालं. उरलासुरला एक पाश तुटला.' त्यानें तिथून सरळ जगन्नाथपुरीचा मार्ग धरला. पुरीला जाऊन भगवंताच्या सेवेंत आयुष्य सार्थकीं लावावें असें त्यानें ठरवलें. तो श्रीहरीचें भजन करीत करीत मार्ग क्रमीत होता. वाटेंत त्याला तहान लागली. बराच वेळ रस्त्याच्या दोही बाजूंस कुठेंहि पाणी आढळेना. तहानेनें त्याचा घसा कोरडा पडला. आणि तो जिथें बसला तिथेंच मूर्च्छित झाला.

पण देवाला भक्ताची काळजी होतीच. तो गोपबालकाचें रूप घेऊन तिथें प्रकटला. त्यानें जयदेवाला सावध केलें आणि झारीभर पाणी पाजलें. जयदेव ताजातवाना झाला अन् त्या बालकाचे आभार मानून पुढें चालूं लागला. मुखानें श्रीहरीचें भजन आणि मनानें त्याचेंच चिंतन. होतां होतां त्याची भावना हरिप्रेमानें उचंबळून आली. त्याला वाटलें कीं, आपण पुरीच्या वाटेला नसून यमुनेच्या तटावरच आलों आहों. सभोंवतीं निळी पर्वतराजी उभी आहे, त्यांच्यामधून मार्ग काढीत यमुना नदी खळाळत

आहे. तीरावरच्या कळंबाखालीं गोपाळकृष्ण देहुडाचरणीं उभा आहे. त्याच्या हातांत मुरली आणि ओठावर मंदस्मित आहे. सायंकाळची वेळ आहे.



राधा-कृष्ण

आकाश ढगांनीं काळवंडलें आहे. आतां पाऊस पडेल का ? श्रीकृष्ण एकटाच इथें आहे तो भिजेल का ? याला हाताला धरून घरीं पोंचवलं पाहिजे. यशोदेच्या स्वाधीन केलं पाहिजे. पण कोण करणार हें ? कोण म्हणजे ? याला सदैव जपणारी, त्याचीं कोडकौतुकं पुरवणारी आणि त्याच्या प्रेमांत स्वतःला विसरून जाणारी राधा...

आणि याच क्षणीं त्याच्या हृदयांत आजवर झोंपून असलेली प्रतिभा एकाएकीं जागी झाली. तिला एकदम विजेचें स्फुरण आलें. नकळत त्याच्या ओठांतून एक श्लोक बाहेर पडला—

“ मेघैर्मेदुरमम्बरं वनभुवःश्यामास्तमालद्रुमै
नक्तं भीरुरयं त्वमेव तदिमं राधे गृहं प्रापय
इत्थं नन्दनिदेशतश्चलितयोः प्रत्यध्वकुञ्जद्रुमं
राधामाधवयोर्जयन्ति यमुनाकूले रहःकेलयः ”

या श्लोकांत, नंदगोप श्रीकृष्णाला घरीं पोंचवण्याबद्दल राधेला आज्ञा करीत आहे अन् राधा-माधव दोघेंहि यमुनातटावरच्या लताकुंजांतून लपंडाव खेळत एकमेकांना हुलकावण्या दाखवीत गोकुळाकडे जात आहेत, असा अर्थ आहे. हाच ‘ गीतगोविंद ’ काव्याचा प्रारंभ.

पुढें एकेक मजल मारीत जयदेव पुरीला पोंचला. जगन्नाथाचें दर्शन होतांच त्याचें हृदय आनंदानें कांठोकांठ भरलें. प्रवासाचा सारा शीण

एकाएकीं नाहींसा झाला. एखाद्या विरक्त साधूसारखा तो पुरी क्षेत्रांत राहूं लागला. 'करतलभिक्षातरुतलवासः' अशीच त्याची स्थिति होती. देहाला विसरून तो देवाला भजत होता. एकेका श्लोकानें, एकेका प्रबंधानें त्याचें तें काव्य थोड्याच काळांत पुरें झालें. देवापुढें बसून तो तें मुक्तकंठानें गाऊं लागला. लोक ऐकायला जमूं लागले. ऐकतां ऐकतां तल्लीन होऊं लागले. त्या काव्याच्या रूपानें जणूं भक्तिरस आटून-आळून लोकांना मिळत होता. जयदेवाचें भावपूर्ण हृदय आणि श्रीहरीच्या मनमोहक लीला या दोन वस्तू एकत्र होऊन तें काव्य निर्माण झालें होतें. लोकांनीं तें मोठ्याप्रेमानें पाठ केलें. घरोघर तें गाइलें जाऊं लागलें. त्यांतूनच राधा-कृष्ण भक्तीचा संप्रदाय परिपुष्ट झाला.

तिथल्या राजाच्या कानावर ही गोष्ट गेली. त्यालाहि काव्य रचण्याचा छंद होता. तोहि मोठ्या प्रयत्नानें चरणाला चरण जुळवीत होता. त्यानेंहि असेंच जगन्नाथाच्या दैवी लीलांचें वर्णन करणारें एक काव्य लिहून पुरें केलें होतें. आपलें काव्य लोकांनीं वाचावें, गीतगोविंदासारखें पाठ करावें, कवि म्हणून आपल्याला गौरवावें, अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती. लेखकांकरवीं आपल्या काव्याच्या प्रती करवून त्या तो लोकांस वांटीत होता. एका अकिंचन माणसाशीं त्या वैभवशाली राजाची अशी स्पर्धा चालली होती.

पण राज्यांतल्या पंडितांना तें आवडलें नाहीं. त्यांत कोणी जे स्पष्टवक्ते होते त्यांनीं राजाला सांगितलें,

" तुझा ग्रंथ गीतगोविंदाच्या तोडीला उतरणार नाहीं. विद्या आणि हरिकीर्तन, गुरुमंत्र आणि ब्रह्मज्ञान, कन्या आणि मोतीं, ह्या घ्या म्हणून पुढें केलं कीं त्याचं मोल तुटतं. उत्तम कवितेची स्वमुखानें प्रसिद्धि करावी लागत नाहीं. रसिकजन आपण होऊन तिचा स्वीकार करतात. "

पण राजा अहंकारानें भरला होता. त्याला पंडितांचा उपदेश रुचला नाहीं. त्यानें म्हटलें,

" जयदेवाप्रमाणेंच मींहि माझ्या काव्यांत जगन्नाथाचेच गुण वर्णिले आहेत. तेव्हां कोणतं काव्य श्रेष्ठ याचा आपण देवाकडूनच निकाल लावून घेऊं. माझ्या काव्याची पोथी आणि गीतगोविंद अशा दोन्ही पोथ्या रात्रीं जगन्नाथाच्या पुढें ठेवूं. उद्यां सकाळीं जगन्नाथ जो कौल देईल तो मी मान्य करीन."

पंडितांना ती कल्पना आवडली. त्या रात्रीं शेजारती झाल्यावर दोन्ही पोथ्या देवाच्या पायांशीं ठेवण्यांत आल्या. गाभाऱ्याला कुलूप लावलें गेलें. किल्ली राजानें पंचांच्या स्वाधीन केली. राजा महालांत आला. त्याला रात्रीं झोंप लागली नाहीं. जयदेव मात्र या सगळ्या प्रकरणापासून अलिप्त होता. त्याच्या पाठीमागेंच या सगळ्या गोष्टी घडल्या होत्या. त्याच्या मनांत स्पर्धाहि नव्हती आणि अहंकारहि नव्हता. आपण हरीच्या लीला गाइल्या, स्वतःला अपूर्व आणि अतूट असें समाधान मिळवलें, याच आनंदांत तो मस्त होता.

दुसऱ्या दिवशीं पहांटे काकडआरतीच्या वेळीं राजा पंचमंडळींसह मंदिरांत आला. पण कुलूप उघडण्यापूर्वींच देवाचा निर्णय त्याला कळला. राजाचें काव्य गाभाऱ्याच्या बाहेर येऊन पडलें होतें अन् गीतगोविंद तेवढें देवाच्या चरणांशीं राहिलें होतें.

एवढा मोठा राजा. कर्तुम् अकर्तुम् सत्ताधीश. पण त्या प्रकारानें बहुत हिंपुटी झाला. अनन्यभावें देवापुढें मस्तक नमवून त्यानें आपलें दुःख देवाला सांगितलें :

" प्रभो जगन्नाथा ! गाय आणि वाघ यांना पाणी जसं सारखं, माशी आणि गरुड यांना आकाश जसं सारखं, राजा आणि रंक यांना चांदणं जसं सारखं, तसा तूं सर्वभूतीं समान आहेस. जयदेवानें तुझे गुण गाइले तसेच मींहि तुझेच गुण गाइले आहेत. त्याला प्रेरणा देणारा जसा तूं, तसाच माझाहि प्रेरक तूंच आहेस; मग माझं तेवढं काव्य बाहेर कां

टाकलंस ? तूं जर माझ्या काव्याचा असा अनादर करणार असशील, तर मी तुझ्यासमोर माझे प्राण देईन. ”

राजाचें हें करुण वचन ऐकून जगन्नाथाला त्याची दया आली. त्यानें दृष्टान्त देऊन त्याला सांगितलें कीं, ‘ तुझ्या काव्यांतले निवडक चोवीस श्लोक मीं जयदेवाच्या पोथींत लिहून ठेवले आहेत. तेवढ्यावर तूं समाधान मान. ”

आणि राजानें तेवढ्यांत समाधान मानलें. त्या प्रकारानें पुरीक्षेत्रांत जयदेवाचें माहात्म्य खूपच वाढलें. जयदेव सर्वांना प्रिय आणि आदरणीय झाला. राजाहि स्पर्धेचा भाव टाकून त्याच्या काव्यांतला रस चाखूं लागला. जयदेव पुरीक्षेत्राचा अलंकार ठरला.

त्याच गांवांत एक अग्निहोत्री ब्राह्मण होता. त्याला पद्मावती नांवाची एक मुलगी होती. रूपाची खाण अन् गुणाची राशि. बापाची अत्यंत लाडकी. ती वाढली अन् लग्नाला योग्य झाली, तरीहि बाप तिच्या लग्नाचा विचार करीना. अनेक स्थळांनीं तिला मागणी घातली. पण बापाचें एक उत्तर– ‘ मुलगी कृष्णार्पण केली आहे. ’

पण एक दिवस जगन्नाथानें स्वप्नदृष्टान्त देऊन ब्राह्मणाला सांगितलें कीं, ‘ क्षेत्रांत जयदेव नांवाचा एक भक्त कवि आला आहे. त्याला तूं तुझी कन्या अर्पण कर. तोच तिला अनुरूप वर आहे. ’ ब्राह्मण जागा झाला. जगन्नाथाचा आदेश त्यानें शिरसामान्य केला. मग जयदेवाला पाचारून आणलें. दृष्टान्ताची हकीकत त्याला सांगितली. पद्मावतीला पाहतांच जयदेवाला वाटलें कीं हिच्याबरोबर संसार मांडायला कांहीं हरकत नाहीं. ही आपली प्रतिभा ठरेल आणि प्रेरक शक्ति होईल. त्यानें ब्राह्मणाला रुकार दिला.

ज्योतिष्यांनीं पत्रिका जुळवून घटित पाहिलें. उभयतांचे छत्तीस गुण जमले. दोन्ही पक्षांकडचें साहित्य पद्मावतीच्या बापानेंच केलें. शुभ मुहूर्तीं

पद्मावती जयदेवाची पत्नी झाली. चार दिवस सोहळा झाला. जयदेव भटक्या होता तो गृहस्थाश्रमी बनला. मग तो आपल्या नवोढा वधूला घेऊन परत आपल्या जन्मगांवीं आला. स्वतःच्या घरांत त्यांची घरभरणी लागली. स्वतःच्या रहात्या घरांतच राधा-माधवांची जोडमूर्ति स्थापन करून दोघेंहि ईश्वरभजनांत रमूं लागलीं.

कांहीं दिवसांनंतर जयदेवाला वाटलें कीं आपण प्रवासाला जावें. पद्मावतीला घरीं ठेवून तो एकटाच एक दिवस घराबाहेर पडला. वाटेंत त्याला एक सावकार भेटला. जयदेवाची प्रसन्न मुद्रा आणि रसाळ, लाघवी वाणी ऐकून सावकाराला वाटलें कीं या सज्जनाचा कांहीं दिवस तरी सहवास जोडावा. कमालीचा आग्रह करून त्यानें जयदेवाला आपल्या घरीं आणलें. जयदेव थोडे दिवस तिथें राहिला. सावकारानें राजासारखी त्याची बडदास्त ठेवली होती. पण यात्रा आणि देवदर्शन यासाठीं उत्कंठित झालेलें त्याचें मन आंतून चुळबुळ करूं लागलें. त्यानें मग एके दिवशीं सावकाराचा निरोप मागितला. सावकारानें मोठ्या कष्टानेंच तो दिला. जातांना सावकारानें भरपूर द्रव्य त्याच्या गांठीं बांधलें. पण तो तें बोचकें उचलीचना. धनाचा विटाळ झाला कीं माझ्या अंतरांतली भक्ति पसार होईल, असें त्यानें सावकाराला सांगितलें. पण सावकारहि आपला आग्रह सोडीना. तो म्हणाला,

"मीं तुम्हांला गुरु मानलं आहे. हें द्रव्य मी गुरुदक्षिणा म्हणून देत आहें. तुम्हांला नको असलं तर ही दक्षिणा तुम्ही माझ्या गुरुपत्नीला नेऊन द्या. हें तिचं धन आहे असं समजा."

जयदेवाला निरुपायानें ती गोष्ट मान्य करावी लागली. तो तें धनाचें गांठोडें घेऊन पुढच्या मार्गाला लागला. सावकारानें कांहीं माणसें त्याच्या सोबतीला दिलीं. त्याचा रस्ता दुर्गम होता. वाटेंत घनदाट जंगल होतें. आणि जंगलांत चोरलुटारूहि होते. त्यांनीं नेमकें जयदेवाला गांठलें. सोबतीचे लोक चोरांना पाहून पळून गेले. जयदेव [redacted]

तावडींत सांपडला. चोरांनीं प्रथम जयदेवाच्या हातां-पायांवर शस्त्राचे घाव घातले, त्याची गठडी आवळून त्याला जवळच्या एका पडक्या विहिरींत फेंकून दिलें आणि ते त्याचें डबोलें घेऊन पसार झाले.

विहीर खोल होती पण तिच्यांत पाणी नव्हतें. तिच्या भिंतीस झुडपें उगवून वाढलीं होतीं. जयदेव त्या झुडपांच्या फांद्यांवर आपटला आणि वरच्या फांदीवरून खालच्या फांदीवर असें करीत तळाशीं आला. तिथल्या एका शिळेवर त्याच्या देहाचें मोटळें अलगद पडलें. त्याला विशेषशी दुखापत झाली नाहीं. दुःख काय असेल तें हातापायांवर बसलेल्या घावांचें. त्यांतून रक्त वाहत होतें आणि क्षणाक्षणाला त्याची शक्ति क्षीण होत होती. आपण कुठें येऊन पडलों हें त्याला कळलें; पण तिथून वर येण्याची मात्र ताकद राहिली नाहीं. बसवेना म्हणून तो तिथेंच आडवा पडला आणि असाहाय्यपणें कण्हत राहिला.

तें कण्हणें ऐकलें तें राजा लक्ष्मणसेनानें. तो गौडदेशाधिपति शिकारी-साठीं आपल्या लवाजम्यासह त्या रानांत आला होता. खोल कुठून तरी माणसाचा आर्त शब्द ऐकूं येत आहे हें जाणून त्यानें विहीर शोधण्या-बद्दल आपल्या नोकरांना आज्ञा दिली. भराभरा चार-पांच तगडे नोकर आंत उतरले. अर्ध्या घटकेंत त्यांनीं जयदेवाला वर आणलें.

एक सुंदर तरुण. चेहऱ्यावर ज्ञानाचें तेज. हातापायांवर घाव. घावांतून रक्तस्राव. डोळे वर गेलेले. अर्धवट मूर्च्छा आणि ओठांत 'राधा-कृष्ण, राधा-कृष्ण' अशी पुटपूट. असें एकंदर दृश्य लक्ष्मणसेनाला दिसलें. तो हळहळला. त्यानें प्रथम जयदेवाला शुद्धीवर आणलें. मग त्याचें नांव विचारलें. जयदेवानें क्षीण आवाजांत आपलें नांव सांगितलें. राजा म्हणाला, 'मीं हें नांव ऐकलं आहे.' तो म्हणाला,

"गीतगोविंदकर्ते जयदेव तुम्हीच काय?"

जयदेवानें होकारार्थी मान हालवली.

राजा त्याला घेऊन राजवाड्यांत आला. त्यानें उत्तम वैद्यांकरवीं त्याच्या जखमा बांधल्या. शहाणे सेवक त्याच्या शुश्रूषेला ठेवले. राजा स्वतः रोजच्या रोज त्याची भेट घेऊन चौकशी करूं लागला. जयदेवाला त्यानें कांहींहि उणें पडूं दिलें नाहीं. जयदेव लवकरच बरा झाला. त्याच्या जखमाहि भरून आल्या. त्याची रसवंती पुन्हा जागृत झाली. कृष्णभक्ति हृदयांत जिवंत होतीच. तिला नवे पल्लव फुटले. भक्तवत्सल श्रीकृष्णानें आपल्याला प्राणसंकटांतून वांचवलें, म्हणून तो सर्वभावें त्याला शरण गेला.

जयदेवाच्या सहवासांत राजाचें चित्त रमूं लागलें. त्याच्या काव्यगंगेंत राजाला नित्यस्नान घडूं लागलें. त्याच्या कृष्णभक्तीचें बीज राजाच्याहि पदरांत पडलें. त्याच्या मुखानें कृष्णलीला ऐकतां ऐकतां त्यालाहि राज्याच्या कटकटींचा घटकाभर विसर पडूं लागला. त्यानें ठरवलें कीं, जयदेवाला आपल्या पदरीं ठेवून घ्यायचें. आश्रित म्हणून नव्हे; तर पंचरत्नसभेचा प्रमुख पंडित म्हणून. एक दिवस जयदेवाला दरबारांत नेऊन त्यानें तशी घोषणा केली. त्याला राहण्यासाठीं स्वतंत्र महालहि बनवून दिला.

त्याची पत्नी पद्मावती. तिला किंदुबिल्व गांवाहून आणण्यासाठीं राजानें लवाजम्यासह मेणा पाठवला. पद्मावती घरच्या राधाकृष्णांच्या मूर्ति हृदयाशीं धरून मेण्यांत बसली आणि थोड्याच दिवसांत पतीच्या चरणांशीं रुजू झाली. जयदेवाच्या उपभोगासाठीं आणि प्रसन्नतेसाठीं लक्ष्मणसेन राजानें त्याच्याभोंवतीं वैभवाचें मखर बांधलें. त्याच्या नित्यखर्चासाठीं हात सढळ सोडला. पण निर्वाहापुरतें अन्न आणि आच्छादन यांशिवाय जयदेव कशालाहि शिवला नाहीं. तो भक्तीनें समृद्ध होता आणि नवरसांचा राजा होता. तो कशाला त्या ऐहिक भोगविलासांची कदर करील !

एक दिवस राजवाड्यांत कसला तरी महोत्सव होता. रमण्यांत जेवण्यासाठीं आणि देकार मिळवण्यासाठीं हजारों लोक तिथें आले होते. त्यांत भिकारी होते, बैरागी होते, भिक्षुक होते, गोसावी होते, आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे चोर-दरोडेखोर हि होते. ते भिकाऱ्याचा वेष करून आले होते. आपण अगदीं साव आहों, कंगाल आहीं आणि राजानें कांही तरी समजून उमजून दिलें तरच आपल्या पोराबाळांचा जीव जगणार आहे, असा दैन्यवाणा भाव चेहऱ्यावर दर्शवीत ते राजाच्या पुढें आले.



पद्मावतीची उपासना

पण तिथें राजाच्या शेजारीं बसला होता जयदेव. हात-पायांवरच्या घावांवरून त्या चोरांनी ओळखलें कीं, आपण कांहीं महिन्यांपूर्वीं ज्याला लुबाडलें, तेंच हें कूळ. त्यांचा चेहरा एका क्षणांत पडला. ते गर्दींतून मागच्या पावलीं मागें सरकूं लागले. एवढ्यांत जयदेवाची नजर त्यांच्यावर पडली. एकमेकांना ओळख पटली. चोर अधिकच अस्वस्थ झाले. पण जयदेवाच्या मनांत त्यांच्याविषयीं कुढा भाव नव्हता. त्याला वाटलें कीं, हे लोक दारिद्र्यानें गांजलेले असल्यामुळें चोरीमारीच्या मार्गाला लागले असतील. त्यांची योगक्षेमाची चिंता दूर झाली तर हेहि सन्मार्गानेंच जातील. जयदेवानें प्रसन्न हास्य करून त्यांना ‘ उभे रहा ’ म्हटलें आणि राजाला विनंती केली,

“ महाराज, हे लोक माझे जुने दोस्त आहेत. आपण जर यांना कांहीं धन दिलंत तर यांचं दैन्य फिटेल. ”

राजानें जयदेवाचा शब्द झेलला. तो तर दान द्यायलाच बसला होता. त्यानें त्या लुटारूंना जवळ बोलावलें. त्यांची आस्थेवाईकपणें चौकशी केली. द्रव्य अन् वस्त्रें देऊन त्यांची बोळवण केली आणि त्यांना कोणीं लुबाडूं नये, म्हणून त्यांच्याबरोबर चार सशस्त्र शिपाईहि दिले.

शिपायांना आश्चर्य वाटण्याजोगीच ती गोष्ट होती. कोण कुठले कळिंद्रे लोक अन् जयदेवासारख्या दरबारी कवीशीं त्यांची एवढी घसट! काय संबंध यांचा अन् त्याचा? त्यांनीं जिज्ञासेनें त्या चोरांना तसा प्रश्न केला. त्यावर त्या चोरांच्या मुख्यानें एक आख्यान रचून त्या शिपायांना सुनावलें.

"तुमचा राजा उदार म्हणून त्यानं जयदेवाला एवढ्या पदवीवर चढवलं. त्याला कुठं माहिती आहे या माणसाचं पूर्वचरित्र! अहो, हा वाघ्याचा पाग्या झाला आहे. पलीकडच्या राज्यांत हा एक साधा कारकून होता. खाऊनपिऊन मजेंत होता. पण बेट्याला झाली कीं एक दिवस दुर्बुद्धि. राजाच्या धनावर यानं डल्ला मारला आणि स्वारी त्या प्रकरणांत मुद्देमालासह सांपडली. राजानं त्याला तत्काळ शिरच्छेदाची शिक्षा फर्मावली. ह्या शिक्षेची अंमलबजावणी करणारे आम्हीच होतों. आम्हांला याची दया आली आणि आम्हीं याला सोडून दिलं. त्या कारणानें पुढं आम्हांलाहि चाकरी गमवावी लागली. आज आम्ही दिसलों तेव्हां तो घाबरला. त्याला वाटलं कीं, आम्ही हें सगळं मागचं प्रकरण राजाच्या कानांवर घालूं. म्हणून त्यानं आमचं तोंड बंद करण्यासाठीं आम्हांला राजाकडून हें द्रव्य..."

आणि काय आश्चर्य! त्या चोरांचं वाक्य कांहीं पुरं झालं नाहीं. एकाएकीं तिथें भूकंप झाला. जमिनीला मोठी थोरली भेग पडली आणि ते चोर तिच्यांत गडप झाले. वरून मातीचे ढिगारे कोसळून त्यांचीं प्रेतेंसुद्धां आच्छादून गेलीं.

शिपायांनीं परत येऊन राजाला ही अद्‌भुत घटना सांगितली. जयदेवहि तिथेंच होता. त्याच्या डोळ्यांतून अश्रूंची धार सुरू झाली. राजानं विस्मित होऊन त्याला विचारलं, 'कविराज, कसलं दुःख झालं तुम्हांला ?'

त्यावर जयदेवानें सारा वृत्तान्त राजाला कथन केला. ज्यांनीं हाता-पायांवर घाव घालून पडक्या विहिरींत फेंकून दिलें, त्या क्रूर लुटारूंविषयींहि जयदेवाच्या अंतरांत दयेचा पाझर वाहतो आहे हें पाहून राजाला जयदेवाच्या मोठ्या मनाची पूर्ण कल्पना आली. जयदेव वृक्षासारखा होता. जी सावली गाईला तीच वाघाला. जी पाणी घालून वाढविणाऱ्याला तीच कुऱ्हाडीचा घाव घालणाऱ्याला. त्या दिवसापासून लक्ष्मणसेन राजा जयदेवाला संत म्हणून ओळखूं लागला आणि भजूं लागला.

जयदेवाची पत्नी पद्मावती म्हणजे पातिव्रत्याचा आदर्श होती. कृष्णभक्ति आणि पतिभक्ति या दोनच गोष्टी ती जाणत होती. कृष्णभक्ति कां ? तर आपल्या पतीची ती उपास्यदेवता म्हणून. राणीवशांत तिलाहि बराच मान होता. सुगंधांत कस्तुरी किंवा अलंकारांत गळसरी, तशी ती त्या स्त्रीसमाजांत शोभत होती. राजाची राणी तिच्याकडून पुष्कळ चांगल्या गोष्टी ऐकत होती. रोज तिसऱ्या प्रहरीं त्यांच्या चर्चा अन् गप्पा चालायच्या. राजघराण्यांतल्या इतर स्त्रियाहि त्यांत भाग घ्यायच्या.

अशाच एका प्रसंगीं राजसेवकांनीं येऊन राणीला एक दुःखद वार्ता सांगितली. तिचा बंधु मरण पावला आहे आणि भावजय त्याच्याबरोबर सती जायला निघाली आहे, अशी ती वार्ता होती. वार्तेनें राणीचें काळीज गलबललें. तिला एकदम हुंदका आला. इतर स्त्रियांनींहि आपले नाकडोळे तांबडे केले. सगळ्याजणी परोपरींनीं हळहळल्या. सगळ्यांनींच सती जाणाऱ्या राणीच्या भावजयीचें स्तुतिस्तोत्र गाइलें. गंभीर होती ती फक्त पद्मावती. ती कांहींच बोलत नाहीं असें पाहून राणीला नवल वाटलें.

"माझी भावजय सती जाते याबद्दल तुम्हांला कांहींच वाटत नाहीं काय? तुम्ही नेहमीं सतीधर्मावर आम्हांला प्रवचनं ऐकवतां अन् या वेळींच मात्र मुग्ध अन् स्तब्ध! तुमच्या तोंडून तिच्याविषयीं धन्यतेचा एकहि शब्द बाहेर पडला नाहीं, याचं मला नवल वाटतं..."

यावर पद्मावती स्पष्ट पण गंभीर शब्दांत म्हणाली,

"सती जाणं ही गौण गोष्ट आहे. खरं म्हणजे पतीचा श्वासोच्छ्वास संपला असं समजतांच पतिव्रतेचा प्राणपक्षी तिथल्या तिथें आपोआप उडून गेला पाहिजे. सूर्य अस्तमला कीं त्याच क्षणीं किरणहि नाहींसे होतात, तसं झालं पाहिजे. तें खरं सहगमन!"

पद्मावतीचें हें बोलणें राणीला गर्वाचें वाटलें. ती मनांत म्हणाली, 'प्रसंग आला नाहीं तोंवर बोलणं ठीक असतं. या बाईचा आपण एक दिवस नक्षा उतरवला पाहिजे. तुझं तरी पातिव्रत्य कितपत जहाल आहे तें बघीन म्हणावं.'

राणी तो डंख मनांत धरून राहिली. ती ज्या विशिष्ट प्रसंगाची वाट पाहात होती तो प्रसंग एके दिवशीं प्राप्त झाला. राजानें शिकारीचा बेत ठरवून जयदेवाला म्हटलें,

"चला कविराज. आज आमची शिकार पाहा."

जयदेव तयार झाला. दोघेहि रथांत बसून नगराबाहेर पडले आणि याच संधीचा राणीनें नेमका फायदा घेतला. प्रधानाला बोलावून आणून तिनें त्याच्याशीं कांहीं वेळ खलबत केलें. प्रधान निघून गेला आणि त्यानंतर दोन घटकांनीं एक सेवक घामाघूम होऊन घाबऱ्याघुबऱ्या राणीकडे आला. त्याच्या हातांत एक उपरणें होतें आणि तें रक्तानें भिजलेलें होतें. राणीनें त्याला विचारलें,

"हा काय प्रकार आहे?"

" महाराणी ! काय सांगू अन् कसं सांगू ! घात झाला हो !"

" अरे कसला घात ? नीट सांग कीं काय तें ! "

" आपले कविराज जयदेव—"

" काय झालं त्यांना ? "

" त्यांचा अंत झाला. वाघानं झडप घातली त्यांच्यावर. केंव्हां घळींतून आला अन् केंव्हां टिपण साधलं कळलंच नाहीं. छातींत नखं खुपसलीं अन् कविराजांचा प्राण घेतला त्यानं. "

पद्मावती तिथेंच बसली होती. राणीनें जें ऐकलें तेंच तिनेंहि ऐकलें. राणी तिच्याकडे पाहूं लागली. किंचित् असूयेनें, किंचित् त्वेषानें. पण पद्मावती तिचा अभिप्राय समजायला या जगांत होती कुठें ? एक क्षणच सर्रर्र दिशीं तिचें अंग शहारलें आणि दुसऱ्याच क्षणाला तिचें कलेवर धरणीवर कोसळलें. डोळे शून्यांत अन् श्वासोच्छ्वास बंद ! सगळेंच एकाएकीं खलास ! चंद्रासवें प्रभा लोपली. वृक्षासवें वेलहि उन्मळून पडली. तिचे शब्द प्रचीतीचे ठरले. तिचें पातिव्रत्य बावन्नकशी उतरलें. ती मागें बोलली होती तो दंभ नव्हता; तर जिवाचा करार होता.

राणीचे हातपाय लटपटूं लागले. तिला वाटलें, केलें काय अन् झालें काय ! असली भलतीच परीक्षा आपण घ्यायला नको होती. मस्करीची कुस्करी झाली. पद्मावतीचे गेलेले प्राण आतां परत येणार नाहींत. तिच्या थंड पडलेल्या शरीरांत आतां हालचाल होणार नाहीं. छेः ! हें भलतंच झालं. आतां राजा आपल्याला रागें भरेल. कदाचित् कडक शिक्षाहि देईल. कदाचित् आपला त्यागहि करील. माझ्या सूडबुद्धीनं मला अधःपाताच्या दरींत लोटलं. देवा...देवा...काय करूं रे मी आतां...

धावत जाऊन तिनें पद्मावतीचें निश्चेष्ट शरीर घट्ट कवटाळलें. तो मृतदेह गदगद हालवला. ' पद्मावती, ऊठ ग ! मी चुकलें. क्षमा कर मला.

तुझा पति जिवंत आहे. मीं केलं तें सगळं नाटक. अगदीं खलनाटक. तूं ऊठ ! ऊठ, पद्मावती ऊठ...'

केवढा आक्रांत उठला त्या राणीवशांत ! राजा शिकारीहून परत येतो, तर राजवाड्यांत सगळाच हलकल्लोळ ! राणीचें नाटक त्याला कळलें. त्याचा परिणाम म्हणजे पद्मावतीचा मृत्यु. राजाचे डोळे इंगळा-सारखे लाल झाले. त्याला राणीचा भयंकर क्रोध आला. राणी कसली; ती एक खुनी स्त्री होती. तिचा शिरच्छेद करण्यासाठीं राजानें सर्रदिशीं म्यानांतून खड्ग उपसलें. पण दुसऱ्याच क्षणीं त्यानें तें परत म्यान केलें. आपल्या हातून स्त्रीहत्येचें पातक घडायला नको, असें त्याला वाटलें. राणीची हत्या करावी तर पाप; तिला घालवून द्यावें तर बेअब्रू. घरांत ठेवून घ्यावी तर अन्याय. एकूण कांहीं केलें तरी आपल्या कुळाला कलंकच. असलें जिणें जगण्यापेक्षां आपण आपलाच शेवट करून घेतला तर काय वाईट !

त्यानें सेवकांना बोलावून नगराबाहेर एक चिता रचायला सांगितली. स्वतःसाठीं, स्वतःला जिवंत जाळून घेण्यासाठीं. बिचारे नोकर ! केवढा प्रसंग आला होता त्यांच्यावर ! राजाची आज्ञा मानावी तरी कठीण अन् मोडावी तरी कठीण !

राजा तिथून सरळ जयदेवाच्या घरीं गेला. त्यानें जयदेवाचे पाय धरून झाला वृत्तान्त त्याला निवेदन केला. तो सांगून शेवटीं राजा कळवळून म्हणाला,

"कविराज, मला क्षमा करा. माझ्या राणीनं तुमचा गृहस्थाश्रम बुडवला. याचं प्रायश्चित मी स्वतःचे प्राण देऊन घेणार आहें."

जयदेवहि मोठ्या संकटांत पडला. बायको तर गेलीच; अन् आतां आपला मित्र झालेला राजाहि अग्निकाष्ठें खायला निघाला. त्याच्या कुसुम-कोमल हृदयाला कसें सहन व्हावें हें ! पण त्याचा राधाकृष्णावर भरंवसा होता. कर्ता करविता तो, अशी श्रद्धा होती. त्यानें आपल्या देवालाच

सांकडें घातलें. कांहीं क्षण मनोमन श्रीहरीला आळवून तो राजाला म्हणाला,

"महाराज ! थांबा. पद्मावती कुठें पडली आहे तें मला दाखवा. मी पाहतों एकदां!"



जयदेव मृत पत्नीला उचलतो

राजा आणि जयदेव पद्मावतीजवळ आले. आपल्या पत्नीची ती अवस्था पाहून जयदेवाचें हृदय विदीर्ण झालें. त्याची बायकोच गेली नव्हती; तर जिवाभावाची प्रेमळ सखी जगांतून पसार झाली होती. तो तिच्याजवळ बसला. तिच्या निस्तेज मुखाकडे टक लावून पाहात असतां त्याच्या अश्रूंचा बांध फुटला. 'पद्मावती ऽऽ' अशी त्यानें आर्त हांक मारली. तिचे केस मागें सारले. तिच्या मुखावरून हळुवारपणें हात फिरवला. तिचे हातपाय जवळ केले. पुन्हा एकदां हांक मारली. पण...

तिचे ओंठ हालले नाहींत. डोळ्यांचीं कवाडें किलकिलीं झालीं नाहींत.

कुठेंच कांहीं चैतन्याचा अंश दिसला नाहीं. तरी तो तिच्याकडे पाहातच राहिला. जवळपास पांचपन्नास माणसें होतीं. मेलेल्या पद्मावतीपेक्षां त्या जित्या जिवाचें दुःख त्यांना अधिक असह्य झालें. सगळेच जणूं गोठलेले गोळे बनले. राणीचें तोंड काळेंठिक्कर पडलें होतें. राजाच्या मुद्रेवर अपराधी भाव दाटून आला होता. जाणतीं माणसें एकमेकांना खुणावूं लागलीं होतीं. ‘ चला, आतां पुढल्या तयारीला लागायचं. ’ असा त्या खुणावणीचा अर्थ होता.

पण जयदेवाला काय वाटलें कोण जाणे ! तो बाहेर गेला आणि आपली तंबोरी घेऊन लगेच परत आला. ‘ अनाथनाथा रुक्मिणीवरा ! भक्तवत्सला जगजीवना ! ’ अशा त्यानें प्रभूला हांका मारल्या आणि तंबोऱ्याच्या तारांवरून हळूच बोट फिरविलें. त्या वीणेंतून मधुर झंकार उमटला. लगोलग जयदेवाचा सुस्वर, भक्तिरसपूर्ण असा आवाज त्या स्वरांत मिसळला. त्यानें आपल्या गीतगोविंदांतली अष्टपदी सुरू केली. एकेक श्लोक तो विलापिकेच्या धाटणींत गाऊं लागला. त्यांतले शब्द आज त्याच्या कंठांतून कांहीं निराळ्याच प्रकारें बाहेर पडत होते. त्यांत एक आगळीच कणव भरून राहिली होती. हरिप्रेम आणि पत्नीप्रेम हीं दोन्ही त्या स्वरगंगेंत एकजीव होऊन मिसळलीं होतीं. पद्मावतीच्या आत्म्याला परत भूलोकांत उतरविण्यासाठीं तो जणूं त्या अष्टपद्यांच्या पायऱ्याच बांधीत होता. मृदु, मुलायम अन् घाटदार !

गीतगोविंदाच्या रूपानें कवि जयदेव राधाकृष्णाशीं तन्मय झाला आणि त्याच क्षणीं इकडे अंतराळांत भटकणाऱ्या त्या पद्मावतीच्या प्राणांनीं तिच्या कुडीशीं पुनश्च संयोग केला. कुडी-आत्मराज एक झाले. तात्रडतोब पद्मावतीचा मुखवर्ण पालटला. तिथें कमलकांति विलसूं लागली. डोळ्यांच्या कवड्या खालीं आल्या. शरीरांत ऊब संचरली. हृदयाचें स्पंदन सुरू झालें. नाकपुड्या हालूं लागल्या. पद्मावती सजीव झाली. आळोखे पिळोखे देऊन उठून बसली. पाहते तों समोर तिचा प्राणेश्वर जिवंत आहे आणि गात

बसला आहे. ती लगेच उठली. 'नाथ ऽ ऽ !' असें म्हणून तिनें जयदेवाचे पाय घट्ट धरले. घळघळ गळणाऱ्या अश्रूंनीं ते धुऊनहि काढले.

तो स्पर्श अन् ते अश्रू ! त्यांनींच जयदेवाला भानावर आणलें. तोंवर त्याला कांहीं ठाऊक नव्हतें. तोहि या जगांत नव्हताच. आपली पत्नी उठली आहे, आपल्याकडे कमलनेत्रांनीं पाहते आहे, आपल्याशीं बोलायला ओठांच्या पाकळ्या हालवते आहे, हें पाहून त्याला प्रेमाचा गहिंवर आला. मघाशीं गळत होते ते दुःखाश्रू अन् आतां गळत होते ते आनंदाश्रू. कुठल्यातरी खोल अंधाऱ्या दरींतून तो गिरिशिखरावरच्या मोकळ्या सुगंधी वातावरणांत येऊन दाखल झाला होता. राधाकृष्णाची कृपा पद्मावतीच्या रूपानें जयदेवाला परत मिळाली होती.

आणि राजाला काय मिळालें ! जणूं स्वर्गाचें साम्राज्य ! राणीनें केलेल्या अन्यायानें परिमार्जन झालें. तो एका महापातकांतून मुक्त झाला. त्याच क्षणीं दूर कोपऱ्यांत बसून राहिलेली राणी उठली आणि राजाच्या चरणाला लागली. 'पुनश्च असलें खोटें कर्म कधींहि करणार नाहीं,' अशी तिनें राजाच्या पायांवर हात ठेवून शपथ घेतली. राजानें तिला क्षमा केली. या आनंदानिमित्त त्यानें नगरांत मोठा उत्सव केला. त्या प्रसंगानें जयदेवाची भक्ति आणि पद्मावतीचें पातिव्रत्य यांचा परिमल चहूं दिशांना पसरला.

त्यानंतर जयदेव त्या राज्यांत राहिला नाहीं. तो राजाची अनुज्ञा घेऊन पद्मावतीसह पुनश्च आपल्या गांवीं आला. गांवचें रत्न परत गांवाला मिळालें, म्हणून तिथल्या लोकांनीं त्याचें सहर्ष स्वागत केलें. पण जयदेव आतां स्वागत आणि सत्कार यांच्या पलीकडे गेला होता. श्रीहरीचा अगाध महिमा त्याला आतां पूर्णपणें कळला होता. भक्ति हीच त्याची आतां खरी सोबतीण होती. याच हरिप्रेमांत शेवटपर्यंत तो डुंबून राहिला. रसिकांना त्याचें 'गीतगोविंद' मिळालें. त्याला त्या काव्याचा नायक राधाकृष्ण मिळाला. जयदेवाचें जीवन सफल झालें, कृतार्थ झालें !

# गुणाढ्य

गुणाढ्य हा एक मोठा प्राकृत ग्रंथकार आहे. यानें पैशाची नांवाच्या भाषेंत एक फार मोठा ग्रंथ निर्माण केला, त्याचें नांव बृहत्कथा. हा इ. स. च्या चवथ्या शतकांत पैठण येथें जन्मला असें संशोधक म्हणतात. याची जन्मकथा रहस्यमय आहे. सातवाहन राजाचा तो प्रधान होता अशी दंतकथा आहे. हा विलक्षण साक्षेपी होता. त्यानें विंध्य पर्वताच्या परिसरांत प्रवास आणि वास्तव्य करून लोकांत प्रचलित असलेल्या हजारों कथा एकत्र केल्या. उदयन आणि नरवाहनदत्त या दोन प्रजापालक राजांच्या मोठ्या कथांचें सूत्र घेऊन त्यानें त्या सर्व कथा त्या सूत्रांत गुंफून टाकल्या. जागतिक कथावाङ्मयांत गुणाढ्याच्या ग्रंथाला मोठ्या मानाचें स्थान आहे. चंद्रहासाची कथा, कृपण वैश्याची कथा, इत्यादि कांहीं गोष्टी गुणाढ्याच्या ग्रंथांतून जगाच्या अन्य भागांतहि पसरल्या आहेत. गुणाढ्याच्या कथांत अद्भुतता तर आहेच; पण त्याचबरोबर त्यांत इतिहासहि सांठवलेला आहे. सातवाहनकालीन महाराष्ट्राचा विस्तार केवढा होता, त्या काळची समृद्धि आणि समाजव्यवस्था कशी होती, विद्या-कला कोणत्या होत्या, इत्यादि गोष्टींचा गुणाढ्याच्या कथांवरून सुगावा लागतो. डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनीं कुरुयुद्धापासून तों शकारंभापर्यंतचा 'प्राचीन महाराष्ट्र' हा प्रचंड ग्रंथ गुणाढ्यकथांच्या आधारेंच मुख्यतः लिहिला आहे. पैशाची भाषेंतली मूळ बृहत्कथा आज उपलब्ध नाहीं. पण त्या ग्रंथावरून सोमदेवानें 'कथासरित्सागर' आणि क्षेमेंद्रानें 'बृहत्कथामंजरी' लिहिली, ते दोन ग्रंथ उपलब्ध आहेत. 'सिंहासनबत्तिशी', 'वेताळपंचविशी' इत्यादि पुस्तकांतल्या मनोरंजक कथा मूळ बृहत्कथेमधूनच आल्या आहेत.

* * *

'असतील बाळ तर फिटतील काळ' अशी एक म्हण आहे. पुत्र जन्माला आले तर ते आईबापांचे पांग फेडतात, असा तिचा अर्थ आहे.

मात्र ते पुत्र हे सुपुत्र असले तरच ही गोष्ट शक्य आहे. गोविंददत्त आणि अग्निदत्त या दांपत्याला एकाहून एक पांच पुत्र होते; पण ते बेटे सगळेच मूर्ख निपजले. आईबापांचा भार हलका करण्याऐवजीं ते त्यांना पोसायला जड झाले. जिथें तिथें त्यांना लाज आणूं लागले. त्यांचीं मूर्खपणाचीं कृत्यें निस्तरतां निस्तरतां आईबापांच्या नाकीं नव येऊं लागले.

एके दिवशीं वैश्वानर नांवाचा एक अग्नीसारखा ब्राह्मण त्यांच्या घरीं अतिथि म्हणून आला. गोविंददत्त त्या वेळीं कुठें तरी बाहेर गेला होता. या पांच ठोंब्यांनीं त्याला 'या बसा,' तरी म्हणावें कीं नाहीं? पण तसें कांहीं न करतां अन् त्याच्याविषयीं यत्किंचित्‌हि आदर न दाखवतां ते नुसते एकमेकांकडे पाहून खोखो हसूं लागले. ब्राह्मणाला खेद झाला आणि रागहि आला. हें घर पुण्यवंताचें नसून पातक्याचें आहे असें समजून तो तिथून निघाला.

एवढ्यांत गोविंददत्त बाहेरून आला. दारीं आलेला अतिथि शाप घालीत निघून जात आहे असें त्यानें पाहिलें. त्या ब्राह्मणाला हात जोडून तो म्हणाला,

"महाराज, मी जरा बाहेर गेलों होतों म्हणून आपल्याला त्रास झाला. तुम्ही घरांत चला. दुपारच्या वेळीं मीठ-भाकरी काय असेल ती खाऊन मग आपल्या मार्गानें जा."

"नाहीं, मी येणार नाहीं. हें घर पतिताचं आहे. मी इथें अन्नग्रहण करीन तर मला प्रायश्चित्त घ्यावं लागेल." ब्राह्मण रागानें बोलला.

"असं म्हणूं नका. मुलांचा अपराध मला लावूं नका. माझ्या मुलांना कांहीं कळत नाहीं."

"हसायचं कळतं का? तूं आजपासून या एरंडासारख्या वाढलेल्या मुलांचा संपर्क सोडणार असशील तरच मी तुझ्या ओसरीवर पाय ठेवीन.

गोविंददत्तानें तें मान्य केलें. ब्राह्मण घरांत आला, जेवला आणि आशीर्वाद देऊन निघून गेला. गोविंददत्त मुलांना म्हणाला कीं, ‘आतां तुम्हीहि तुमचा मार्ग सुधारा. तुमच्यासारखे मुलगे जन्माला येण्यापेक्षां निसंतान झालेलं परवडलं!’ मुलांनीं बापाचा राग ऐकला. बाकीच्यांना काय वाटलें कोणास ठाऊक! पण त्यांतल्या सोमदत्त नांवाच्या दुसऱ्या मुलाला मात्र बराच पश्चात्ताप झाला. त्याला आपल्या मूर्खपणाची लाज वाटली. त्यानें ठरवलें कीं आतां या घरांत रहायचें नाहीं.

सोमदत्त घरून निघाला तो सरळ हिमालयांत गेला. तिथें एका टेकडीवर बसून त्यानें शंकराची आराधना सुरू केली. तो शिवाची पूजा करी, त्यांत एक वैशिष्ट्य होतें. तो सकाळीं उठे आणि दरींखोरीं पालथीं घाली. त्याला फुलें जमविण्याचा विलक्षण हव्यास होता. तो नाना जातींचीं, नाना रंगांचीं सुंदर सुवासिक फुलें गोळा करी, आणि त्यांनीं शिवलिंगाला सर्व बाजूंनीं सजवी. हा त्याचा नित्यक्रमच ठरला. असा कांहीं काल लोटला. पुढें शिव त्याच्या पुष्पपूजेनें प्रसन्न झाला. इतका फुलांचा शोकीन भक्त आजवर त्याला कोणी लाभला नव्हता. त्यानें सोमदत्ताला साक्षात् दर्शन दिलें. तो सोमदत्ताच्या मस्तकीं वरदहस्त ठेवून म्हणाला,

“भक्ता, तूं मोठा रसिक आहेस. मला रोज फुलं आणून देणारा माल्यवान नांवाचा माझा गण आहे. मी त्या गणांत तुला दाखल करतों. मात्र त्या आधीं तूं पुन्हा जन्म घे. विद्वान् हो. इहलोकींचीं सुखदु:खं भोग आणि त्यानंतर कैलासावर माझ्या सेवेसाठीं ये.”

सोमदत्ताचा हेतु सफळ झाला. त्यानें लगेच देहत्याग केला आणि त्याचा आत्मा अंतरांतून फिरत फिरत आला तो श्रुतार्था नांवाच्या एका स्त्रीच्या उदरीं.

ही श्रुतार्था प्रतिष्ठान नगरींतल्या सोमशर्मा नांवाच्या ब्राह्मणाची कन्या. तिला वत्स आणि गुल्म असे दोन भाऊ होते. त्या घरांत एकूण हीं तीन

भावंडें. भाऊ मोठे आणि बहीण लहान. हीं मोठीं होण्याच्या आंतच त्यांचे आईबाप निवर्तले. तिन्ही मुलें अनाथ झालीं. पण परिस्थिति माणसाला शहाणपण शिकविते. हीं मुलेंहि जगाचे धक्के चपेटे खातां खातां शहाणीं झालीं. मोठ्या भावांनीं आपल्या बहिणीचें प्रेमानें संगोपन केलें. ती दोघांच्या छायेंत वाढली. बालिका होती ती तरुणी झाली.

श्रुतार्था मोठी देखणी होती. सर्वांगीं सुंदर होती. तिचें बोलणें-चालणें लाघवी होतें. वासुकि नागाचा पुतण्या कीर्तिसेन यानें एक दिवस तिला पाहिलें. पाहतांक्षणींच त्याचें तिच्यावर मन जडलें. त्यानें संधि साधून तिचा परिचय करून घेतला. त्या परिचयांत तिलाहि तो आवडला. दोघांचें प्रेम जडलें खरें; पण लग्न जमायला मात्र मोठीच आडकाठी होती. तो होता नाग जातीचा आणि ती होती ब्राह्मणकन्या. त्याच्याशीं लग्न करतें असें ती आपल्या भावांना सांगू शकत नव्हती. त्यांना तें रुचलें नसतें.

श्रुतार्थेला मोठा पेंच पडला. भावांना तोडवेना आणि कीर्तिसेनाला सोडवेना. तीं दोघे एकमेकांना अनेक वेळां भेटत होतीं आणि प्रत्येक वेळीं लग्नाचा विषय निघत होता. सरतेशेवटीं श्रुतार्थेनें एक दिवस धीर केला. ती लग्नाला कबूल झाली. गांधर्वविधीनें त्या उभयतांचें लग्न झालें. दोघेंहि धर्मबंधनानें एकमेकांचीं झालीं.

पण लग्न होऊन श्रुतार्था सासरीं गेली नाहीं. ती आपल्या भावांकडेच राहिली. तिच्या लग्नाचा भावांना पत्ताहि लागला नाहीं. त्यामुळें श्रुतार्था जेव्हां गर्भवती झाली, तेव्हां ते दोघे आश्चर्यांत पडले. त्यांच्यावर जणूं गहजब गुदरला. त्यांनीं तिला समोर बोलावून खरा प्रकार विचारला. तिनें आपल्या गांधर्वविवाहाची हकीकत भावांना सांगितली. पण त्यांचा विश्वास बसेना. त्यांना वाटलें कीं बहीण खोटें बोलते.

पण तिनें त्यांच्या सगळ्या शंकाकुशंका थोड्याच अवधींत फेडल्या. आपला नवरा कीर्तिसेन याला बोलावून आणून तिनें त्याला भावांपुढें उभें

केलें. कीर्तिसेन म्हणाला कीं, 'मीं तुमच्या लाडक्या बहिणीचं पाणिग्रहण केलं आहे. मी जातीनें नाग असलों तरी सत्कुळांतला आहें. तुम्ही दोघे भाऊ आणि ही तुमची बहीण, अशीं तिघेहि शापभ्रष्ट आहां. हिच्या उदरीं जो पुत्र जन्माला येईल तो तुम्हां तिघांनाहि शापमुक्त करील.'

कीर्तिसेन एवढें बोलून निघून गेला. त्यामुळें भावांच्या शंका फिटल्या. श्रुतार्था त्यांच्याच घरीं प्रसूत झाली आणि तिनें एका पुत्राला जन्म दिला. मामांनीं त्याचें नांव गुणाढ्य ठेवलें. पूर्वजन्मींचा सोमदत्त तोच या जन्मींचा गुणाढ्य झाला.

थोड्याच कालांत त्याचे मामा मरण पावले आणि आईहि स्वर्गवासी झाली. शापमुक्त झाल्यानंतर त्यांना या जगांत फार काळ राहण्याचें कांहीं कारण नव्हतें. त्यामुळें गुणाढ्य अगदींच वाऱ्यावर पडला. कोणीं अडपता-दडपता नाहीं कीं कोणी मायेनें जवळ करणारा नाहीं. तो कुठें तरी बसून दुःखें गाळी, कोणीं घातलें तर खाई आणि कुठें तरी शरीराची गुटली करून पडून राही. त्याचें तोंड बावलें आणि शरीरहि घटलें.

पण त्याचबरोबर त्याला शहाणपणहि लवकरच आलें. खेळण्याचें वय असूनहि त्याचा आपोआप विद्येकडे ओढा वळला. वाऱ्यावर तरंगणाऱ्या पतंगाचा दोरा खेचून घ्यावा, तद्वत् सरस्वतीनें त्याला आपल्याकडे आकृष्ट केलें. तो समजला, कीं विद्येवांचून आपला तरणोपाय नाहीं.

गुणाढ्य प्रतिष्ठानांतून उठला आणि दक्षिणेला निघाला. त्याला लवकरच एक गुरुहि भेटला. त्यानें त्याला आपल्याजवळ ठेवून घेतलें. गुणाढ्य काव्य, व्याकरण, साहित्य आणि इतिहासहि शिकला. जें जें त्याच्या निर्मळ बुद्धींत प्रविष्ट होई, तें तें रत्नासारखें चमकूं लागे. स्वतः गुरूनेंच त्याची प्रशंसा केली. विद्या पूर्ण झाल्यावर गुरु त्याला आपल्या बरोबरीचा म्हणून मान देऊं लागला. तिथें येणाऱ्या नव्या शिष्यांना आतां

गुणाढ्यच पढवूं लागला. त्याची धवल कीर्ति दक्षिणापथांत सर्वत्र पसरली. ज्या प्रदेशांत त्यानें विद्येचें दान घेतलें, त्याच प्रदेशांत त्यानें तें परत दिलें. बरींच वर्षें तो तिकडे मानमान्यतेनें राहिला.

पण दिवसेंदिवस त्याला मातृभूमीची आठवण तीव्रतेनें होऊं लागली. बालपणीं पाहिलेलें प्रतिष्ठानगर त्याच्या डोळ्यांपुढें येऊं लागलें. त्याला आपलें घर आठवलें. नगरांतले वाडे आठवले. विशिष्ट माणसेंहि आठवलीं. जें जें कांहीं बालपणीं मनावर बिंबलें होतें, तें तें स्मृतीच्या द्वारें पुनरपि जिवंत झालें.

एक दिवस तो सरळ उठून पैठणच्या मार्गाला लागला. सूर्याला ग्रह, तसे त्याच्याभोंवतीं किती तरी शिष्य असत. गुरु निघाला तसे तेहि निघाले. शास्त्रार्थाची चर्चा करीत करीत ते गुरु-शिष्य मजला मारूं लागले. वाटेंत सर्वत्र त्यांचें स्वागतच झालें. कांहीं दिवसांनीं ही मंडळी पैठणला पोंचलीं. गुणाढ्य लहानपणीं ज्या गोदावरीच्या पात्रांत खेळत होता, डुंबत होता, त्या गोदावरीचें दर्शन होतांच त्याला आपली आई भेटल्यासारखें वाटलें. त्यानें गोदामाईला नमस्कार करून तिच्या पाण्यांत पाय बुडवले. गुणाढ्याच्या मधुर अन् कोमल भावना त्या क्षणीं उचंबळून आल्या.

नदीच्या पैलतीराला पैठणनगर बसलें होतें. त्याच्या दृष्टीला तें निराळेंच दिसलें. त्याच्या गैरहजेरींत पैठणचें वैभव वाढलें होतें, दिमाखहि वाढला होता.

पण त्याला खरें आश्चर्य वाटलें तें गोदावरीच्या तीरावरचें तें प्रफुल्ल आणि प्रशस्त उद्यान पाहून. तो स्वतःशींच म्हणाला, ‘अरे ! हें पूर्वी नव्हतं. हें नवं आहे आणि चांगलंहि आहे.’ मग तो गांवांत न शिरतां त्या उद्यानांतच शिरला. तिथला उद्यानपालक त्याला सामोरा येतांच गुणाढ्यानें त्याला विचारलें,

“ या उद्यानाचं नांव काय ? ”

" देवीकृति. " उद्यानपाल उत्तरला.

" हें इथल्या राजानं निर्माण केलं काय ? "

" नाहीं महाराज. एका मौनी ब्राह्मणानं याची निर्मिति केली. "

" कुठला हा ब्राह्मण ? "

" तो होता भरुकच्छचा. दरिद्री आणि आळशी असल्यामुळें त्याला कोणी गांवांत भिक्षा घालीना. पुढें तो देशपर्यटनाला निघाला. प्रवासांतहि त्याला खूप कष्ट झाले. फिरत फिरत तो विंध्यवासिनीच्या दर्शनाला गेला. हालताप भोगून तो आपल्या जिवाला कंटाळला होता. त्यामुळें देवीच्या पुढें त्यानें स्वतःचा शिरच्छेद करून घेण्याचें ठरवलें. खड्ग उपसून आपल्या मानेवर घाव घालण्याच्या आंत देवी त्याच्यावर प्रसन्न झाली. तिच्या वरानें त्याची क्षुधा-तृषा कायमची शमली. देवीनें त्याला एक बीज दिलं आणि गोदाकांठीं एक सुंदर उद्यान निर्माण करण्याची आज्ञा केली. तो इथें आला. त्यानं ही बाग वसवली अन् फुलवली. नंतर तो कुठें गेला त्याचा मात्र पत्ता लागला नाहीं. "

गुणाढ्यानें ती हकीकत ऐकली आणि त्या उद्यानांतच आपला मुक्काम ठेवला. त्याच्या आज्ञेवरून गुणदेव आणि नंदिदेव हे त्याचे दोन शिष्य तिथल्या सातवाहन राजाकडे गेले. आपल्या राजधानींत एक मोठा पंडित प्राप्त झाला आहे असें त्यांनीं सातवाहनाला सांगितलें. त्यानें लगेच राजपुरोहिताला पाठवून गुणाढ्याला शिष्यांसहवर्तमान राजवाड्यांत आणलें. प्रथम आगतस्वागत झालें. पुढें दरबारांत पंडितांशीं ओळखदेख झाली. नंतर शास्त्रचर्चा झाली. त्या चर्चेंतल्या विद्वत्तापूर्ण वक्तृत्वानें राजाला गुणाढ्याविषयीं आदर निर्माण झाला. शर्ववर्मा हा त्याच्या दरबारांतला मुख्य पंडित होता. त्याच्या जोडीनें गुणाढ्यालाहि राजानें बहुमान दिला. त्यामुळें पैठण नगरांत गुणाढ्य इतमामानें राहूं लागला. अध्ययन, अध्यापन आणि वादविवाद यांत त्याची उत्तम प्रकारें काल-क्रमणा होऊं लागली.

पण त्याचा हा मानसन्मान दैवाला फार दिवस पाहावला नाहीं. एक अद्भुत प्रसंग त्या राजवाड्यांत निर्माण झाला आणि त्यापायीं गुणाढ्याच्या आयुष्यानें एकदम निराळेंच वळण घेतलें. त्या प्रसंगाचें स्वरूप होतें तें असें :

प्रतिष्ठाननगरींत सालाबादप्रमाणें वसंतोत्सव सुरू झाला. त्या निमित्तानें सातवाहन राजा देवीकृति उद्यानांत जलक्रीडेसाठीं प्राप्त झाला. त्याला कित्येक राण्या होत्या. आपले दागिने तळ्याच्या कांठावर काढून ठेवून त्याहि राजाबरोबर पाण्यांत उतरल्या. पोहणें, कांठाला लागणें, पुन्हा बुड्या मारणें, शर्यत लावणें, मधेंच मागें वळणें, असे जलक्रीडेचे विविध प्रकार त्यांनीं सुरू केले. क्रीडेला थोड्याच वेळांत रंग भरला. राजाच्या उत्साहाला उधाण आलें. तो तलावाच्या मधोमध उभा राहून आपल्या पंजानें चौफेर पाणी उडवूं लागला. तो पाण्याचा सपका तोंडावर बसतांच त्या राजस्त्रियांच्या नाकातोंडांत पाणी गेलें आणि त्यांचा जीव घाबरा झाला. या पाणी उडविण्याच्या सपाट्यांत त्याची एक राणी चांगलीच गुदमरून गेली. ती सुकुमार होती. त्यामुळें तडातड आदळणारे पाण्याचे फवारे तिला मुळींच सोसले नाहींत. तिनें राजाला हात जोडून संस्कृत भाषेंत विनविलें,

'मोदकैः परिताडय माम् !'

राजाला त्याचा अर्थ समजला तो अगदींच विरुद्ध. त्याला वाटलें कीं, आपली नाजुकनार राणी दमली आहे, तिला भूक लागली आहे आणि ती मोदक मागते आहे. माझ्या अंगावर पाणी फेंकूं नको, मोदक फेंक, असें म्हणत आहे. ताबडतोब त्यानें नोकराला हुकूम केला,

"वाड्यांत जा अन् हाराभर मोदक घेऊन ये."

त्या राणीला तें ऐकून फार दुःख झालें. तिला राजाच्या अज्ञानाची कींव आली. ती चतुर होती. व्युत्पन्न होती. तिनें व्याकरणशास्त्राचें अध्ययन

केलें होतें. प्राकृत भाषेप्रमाणेंच ती संस्कृतहि सराईतपणें बोलत असे. पण तिला नवरा मिळाला होता तो हा असा विद्याहीन ! राजाच्या मूढपणाबद्दल नेहमींच ती मनोमन पश्चात्ताप करी. बोलत नसे; पण आंतून खेद करीत असे. पण या वेळीं मात्र तिला राहवलें नाहीं. ती म्हणाली,



" मोदकैः परिताडय माम् "

" महाराज ! पाण्यांत खेळत असतांना मोदक काय करायचे आहेत ? मी तुम्हांला म्हणालें कीं माझ्यावर पाणी शिंपडूं नका. ' मा उदकैः ' या दोन शब्दांचा संधि होऊन ' मोदकैः ' असा शब्द बनला. एवढंसुद्धां आपल्याला कळूं नये ना ! स्वतःच्या अज्ञानाची आपल्याला खंत होत नसली, तरी ती मला होते आहे........."

त्या राणीनें राजाचें मूर्खपण असें उघडकीस आणलेलें पाहून इतर राण्यांनीं तोंडाला पदर लावले. आजूबाजूच्या नोकरवर्गानेंहि आपलीं तोंडें वळवलीं. राजानें हें पाहिलें. त्याला लाज वाटली आणि दुःखहि झालें.

तावडतोब तो तलावांतून बाहेर आला आणि कोणाचीहि वाट न बघतां राजवाड्याकडे चालता झाला. त्याच क्षणीं नगरांतला वसंतोत्सव बंद पडला. त्या सर्व नगराचा देखावाच एकदम बदलला.

आपल्या महालांत येऊन सातवाहन राजानें शय्येवर अंग टाकलें. त्याची भूक मेली आणि झोंपहि उडाली. मुखावरचें हास्य लोपलें आणि कांतिहि निमाली. तो कोणाशीं बोलेना, कोणाला जवळ करीना. सगळें अंतःपूर भयानें चूर झालें. दास-दासी, भालदार-चोपदार, अधिकारी-मानकरी सगळेच घाबरले. काय करावें तें कोणालाच कळेना.

गुणाढ्याला ही राजाची शोचनीय अवस्था कळली. पुढें काय करायचें याचा विचार करण्यासाठीं तो शर्ववर्म्याकडे गेला. दोघेहि मिळून राजवाड्यांत प्रविष्ट झाले. राजाची भेट घ्यावयाची म्हणून ते निघाले होते; पण द्वाररक्षकानें आज त्यांनाहि अडवलें.

"कोणाला आंत सोडायचा हुकूम नाहीं." तो द्वारपाल ताठ उभा राहून बोलला.

दोघेहि पंडित मग बाहेरच बसून राहिले. शर्ववर्म्यानें गुणाढ्याच्या कानांत कुजबुजून राजाची अशी अवस्था कां झाली आहे, याचें निदान त्याला सांगितलें. सातवाहन अधूनमधून आपल्या अज्ञानाविषयीं खेद व्यक्त करतो, हें शर्ववर्म्यानें पाहिले होतें. म्हणून मग त्या दोघांनीं कसली तरी मसलत केली. मग त्यांनीं पुन्हा राजाला वर्दी दिली. बऱ्याच वेळानें राजाकडून त्यांना बोलावणें आलें. दार उघडलें. द्वाररक्षक बाजूला झाला. गुणाढ्य आणि शर्ववर्मा थेट राजाच्या शयनगृहांत दाखल झाले. चंद्राला ग्रहण लागावें, तशी सातवाहनाची अवस्था त्यांनीं पाहिली. गुणाढ्यानें त्याला चिंतेचें कारण विचारलें. पण राजानें उत्तर दिलें, तें मौनाच्या भाषेंत. त्यावर शर्ववर्मा आपण होऊन बोलूं लागला,

"महाराज, आपण मला मागें एकदां बोललां होतां कीं, कसंहि करून

मला विद्वान् बनवा. मीं काल रात्रीं एक कुवेडं केलं. त्याचं उत्तर म्हणून मला एक स्वप्न पडलं तें सांगतों—निळ्या निळ्या आकाशांतून एक शुभ्र कमळ खालीं पडलं. एक दिव्य कुमार लगेच तिथें अवतरला. त्यानं फुंकर घालून तें कमळ फुलवलं. त्यांतून एक सतेज अन् शुभ्र वस्त्र नेसलेली स्त्री बाहेर निघाली. आणि काय सांगावं महाराज! ती सरळ तुमच्या मुखांत शिरली....एवढं पाहिलं अन् मी जागा झालों. महाराज, ती स्त्री कोण होती सांगूं? साक्षात् सरस्वती! तीच तुमच्या मुखांत प्रविष्ट झाली."

शर्ववर्म्याची मात्रा लागू पडली. राजाचा मुखचंद्र काळ्या ढगांच्या आवरणांतून बाहेर आला. त्यानें उत्सुकतेनें विचारलें,

"पंडितराज, खरं सांगतां?....मला विद्या येईल?"

"अवश्य! व्याकरण हें सर्व विद्यांचं मुख आहे. तें एकदां अवगत झालं कीं हां हां म्हणतां सर्व विद्या येतील."

"व्याकरण शिकायला किती वर्षं लागतात?"

"बारा वर्षं लागतात. पण मी तें तुम्हांला सहा वर्षांत शिकवीन." गुणाढ्य म्हणाला.

"गुणाढ्य पंडित, सुखांत वाढलेल्या महाराजांना इतकीं वर्षं पढण्या-घोकण्याचे श्रम कसे झेपतील?" शर्ववर्म्यानें आक्षेप घेतला.

"हो, खरं आहे." राजा म्हणाला.

"महाराज, मी तुम्हांला अवघ्या सहा महिन्यांत व्याकरण पढवतों." शर्ववर्मा ईर्षेनें बोलला.

गुणाढ्याला त्याच्या वढाईचा राग आला बारा वर्षांची विद्या हा सहा महिन्यांत शिकवणार म्हणजे काय जादू आहे का चेटूक आहे? उगाच आपली उचलली जीभ, लावली टाळ्याला! गुणाढ्यानें तितक्याच खणखणीतपणें म्हटलें,

" शर्ववर्मन् ! तुमची ही वल्गना निरर्थक आहे. सहा महिन्यांत व्याकरण येणं शक्य नाहीं. "

" शक्य नाहीं ? तसं झालं तर बारा वर्षं तुझ्या पादुका मी डोक्यावर वाहीन. " शर्ववर्मा बेदरकारपणें बोलला.

" तूं जर राजाला सहा महिन्यांत व्याकरणपंडित केलंस, तर मी संस्कृत, प्राकृत आणि देशी अशा तिन्ही भाषांचा त्याग करीन. " गुणाढ्यानें प्रत्येक शब्दावर जोर देत घनघोर प्रतिज्ञा उच्चारली.

शर्ववर्मा सहा महिन्यांत व्याकरण शिकवतों अशी प्रतिज्ञा करून गेला खरा; पण थोडा विचार केल्यानंतर आपली प्रतिज्ञा दुर्घट आहे, हें त्यालाच कळून आलें. त्यामुळें त्याचा नूर उतरला. आपली चिंता त्यानें आपल्या पत्नीला सांगितली. ती बाई मोठी हुषार होती. प्रसंगाचें गांभीर्य तिला कळलें. तिनें नवऱ्याला सांगितलें कीं, ' या संकटसमयीं कार्तिकस्वामीवांचून तुम्हांला दुसरा कोणी त्राता नाहीं. तुम्ही त्यालाच मनोभावें शरण जा. '

शर्ववर्म्याला तें पटलें. तो घरून निघून कार्तिकस्वामीच्या मंदिरांत गेला. मौन आणि उपवास धारण करून त्यानें कार्तिकस्वामीला सांकडें घातलें. थोडेच दिवस; पण उग्र तप केलें. कार्तिकस्वामी त्याच्यावर प्रसन्न झाला. त्यानें ' तूं यशस्वी होशील ' असा त्याला वर दिला. त्या वरानें शर्ववर्म्याला सिद्धि मिळाली. तो मंदिरांतून परत आला. त्यानें व्याकरणासह सर्व विद्या सहा महिन्यांच्या मुदतींत सातवाहनाच्या हृदयांत घातल्या. सातवाहन मूढ होता, तो सुविद्य झाला. जलक्रीडेच्या वेळीं ज्या राणीनें त्याचा तिरस्कार केला होता, तिनें आतां राजावरून आपला जीव ओंवाळून टाकला.

या प्रकरणांत गुणाढ्याचा पुरता पराभव झाला. स्वतः केलेल्या प्रतिज्ञेप्रमाणें संस्कृत, प्राकृत आणि देशी अशा तिन्ही भाषांचा त्याग करणें त्याला भाग पडलें. गुणाढ्य वाणी असून मुका झाला. झालेल्या पराभवानें

काळाठिक्कर पडला. राजदरबारांत शर्ववर्म्याची सरशी झाली. त्याचबरोबर गुणाढ्याची उपेक्षाहि सुरू झाली. राजा त्याच्याविषयीं उदासीन झाला. गुणाढ्यानें हा सर्व प्रकार पाहिला, अनुभवला. त्याला पैठणांत राहणें असह्य झालें. जिथें मोतीं विकलीं, तिथें शेणी विकण्याची त्याच्यावर पाळी आली. त्या मानधन पंडिताला तें सहन झालें नाहीं. तो एक दिवस पैठणमधून उठला आणि राज्य सोडून विंध्य पर्वताच्या दिशेनें चालता झाला. तो गेल्याचीहि कोणीं दखल घेतली नाहीं. राजाच्या विद्याप्राप्तीबद्दल पैठणांत महोत्सव मांडला होता. लोक आमोदप्रमोदांत दंग होते. राजवाड्यांत आनंदाचें महापर्व उगवलें होतें. अशा स्थितींत गुणाढ्य गेला काय आणि राहिला काय! कोण त्याची चौकशी करणार!

गुणाढ्य वाट फुटेल तिकडे चालला होता. वाटेंत त्याला अनेक माणसें भेटत. त्याला वाटे कीं, कोणालातरी गांव विचारावें, वस्ती विचारावी. पण कोणत्या भाषेंत विचारणार? त्यानें तर तिन्ही भाषा सोडल्या होत्या. जीभ लवलवत होती; पण ओंठ मिटलेले होते. शब्द जिभेच्या टोंकापर्यंत धावून येत होते; पण तिथें ठेंचाळत होते. आणि हें मौन आतां त्याच्या जन्माला लागलें होतें. तो आतां कोणालाहि कांहींहि सांगू शकणार नव्हता आणि विचारूंहि शकणार नव्हता. गुणाढ्याला ही महाभयंकर शिक्षा झाली होती आणि त्यानें स्वतःच ती आपल्यावर ओढवून घेतली होती.

या मुकेपणामुळें प्रवासांत त्याला सर्वस्वीं गैरसोय सोसावी लागली. त्याला माणसें भेटत, खेडीं-पाडीं लागत, पण पोटाला हात लावून ग्रासभर मिळवण्यापलीकडे त्याला त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. तशाच स्थितींत त्याचा प्रवास चालला होता. त्याला अमुकच एका ठिकाणीं जायचें होतें असें नव्हे. थांबायचें नाहीं म्हणून चालत रहायचें. अशी त्याची चमत्कारिक आणि शोचनीय अवस्था झाली होती.

होतां होतां तो विंध्य पर्वताच्या परिसरांत आला. तिथे त्याला कांहीं

लोक भेटले. ‘ कुठले पाहुणे ’ म्हणून त्यांनीं गुणाढ्याला विचारलें. गुणाढ्य एकदम चकित झाला. ती भाषा संस्कृत नव्हती. ती होती पैशाची भाषा. गुणाढ्याला एकदम कैवल्य मिळाल्यासारखें झालें. त्याच्या सांकळलेल्या, गोठलेल्या साऱ्या प्रवृत्ती शतपत्र कमळ फुलावें तशा उमलून आल्या. ‘ या भाषेंत आपल्याला बोलतां येईल. मिळाली ! मिळाली ! ! मला भाषा मिळाली ! ! ! ’ त्याचा आत्मा शब्दावांचून ओरडला. चवथ्या भाषेंत बोलणार नाहीं, अशी कांहीं त्याची प्रतिज्ञा नव्हती.

तो त्याच गांवांत राहिला. कान देऊन त्या पिशाचांचें संभाषण ऐकूं लागला. त्यांतल्या शब्दांचे अर्थ समजावून घेऊं लागला. त्या भाषेची जडण-घडण अजमावूं लागला. हळूहळू एकेक शब्द, एकेक वाक्यहि उच्चारूं लागला. त्यामुळें त्याच्या तोंडाचा चिकटा निघाला. शब्दांचा व्यवहार करण्यासाठीं आसुसलेली त्याची जीभ हळूहळू सैल सुटूं लागली. गुणाढ्य विद्वान् होता, भाषेचा मर्मज्ञ होता. त्यामुळें पैशाची भाषेवर प्रभुत्व मिळवायला त्याला उशीर लागला नाहीं. ती भाषाच नव्हे; तर त्या लोकांचे आचार, विचार, संकेत या सर्व गोष्टी त्यानें अभ्यासून थोड्याच काळांत आत्मसात् केल्या.

त्यांच्यांत मिसळत असता, वावरत असतां त्याला कळलें कीं, या लोकांच्याकडे गोष्टींचा भरणा फार मोठा आहे. रात्रीच्या वेळीं शेकोटी पेटवून ते पिशाच स्त्री-पुरुष कोंडाळें करून बसले कीं यक्ष-गंधर्वांच्या, तालवेतालांच्या, व्यापाऱ्यांच्या, सावकारांच्या, राजपुत्रांच्या गोष्टी सांगून एकमेकांना रिझवीत. त्यांच्या बायकाहि गोष्टीवेल्हाळ होत्या. गुणाढ्यासारख्या रसिक पंडिताचें मन त्या कथांनीं वेधलें असल्यास नवल नाहीं. त्यानें त्यांचा संग्रह करायचें ठरवलें. तो मग त्याच कामगिरीवर निघाला. विंध्य परिसरांतल्या खेड्यापाड्यांतून आणि लहानमोठ्या वस्तींतून तो हिंडूं लागला. गोष्टीवेल्हाळ अशा म्हाताऱ्या-कोताऱ्यांना

जवळ करावें, त्यांना जरा खुलवावें आणि त्यांच्याकडून गोष्टी मिळवाव्या, हा त्याला छंदच लागला.



पिशाचांचें कथाकथन

सात वर्षे त्यानें या कार्यांत घालवलीं. फार मोठा कथासंग्रह त्याच्याकडे जमा झाला. मग त्या गोष्टी त्यानें श्लोकबद्ध केल्या. या कामीं भाषा वापरली ती संस्कृत नव्हे, प्राकृत नव्हे, तर पैशाचीच. मुख्य कथासूत्र उदयन आणि नरवाहनदत्त या राजांचें घेतलें आणि मिळवलेल्या सर्व कथा त्या सूत्रांत कलापूर्ण रीतीनें गुंफून टाकल्या. एकूण सात लक्ष ग्रंथसंख्या झाली. हें सगळें वाङ्मय त्यानें रक्ताच्या शाईनें भूर्जपत्रांवर लिहिलें.

एवढ्या अवधींत गुणदेव आणि नंदिदेव हे त्याचे जुने शिष्य गुरूचा शोध घेत घेत त्याच्याकडे पोंचले. त्यांनीं आपल्या गुरूची ग्रंथ-रचना पाहिली आणि त्या कामीं त्याला साहाय्यहि केलें. गुरूच्या अतिदीर्घ परिश्रमांतून निर्माण झालेली ती ग्रंथसंपदा पाहून शिष्यांना अपार हर्ष झाला. गुणाढ्याच्या अंतरांतहि कृतार्थतेचा भाव दाटून आला. आपण पैठणहून अपमानित होऊन देशोधडीला लागलों; पण सरस्वतीच्या कृपेनें आपल्या हातून भरीव असें कांहींतरी कार्य घडलें, असें गुणाढ्याला वाटलें.

एवढा सात लक्ष ग्रंथ निर्माण झाला खरा; पण तो प्रकाशांत यायचा कसा ? तो रसिकांच्या आणि पंडितांच्या नजरेस पडायचा कसा ? या कामीं एखाद्या उदार राजाचें साहाय्य हवें होतें. त्या गोष्टीचा विचार करीत असतां गुणाढ्याच्या शिष्यांना पुनश्च पैठणच्या सातवाहन राजाचीच आठवण झाली. ते आपल्या गुरूला म्हणाले,

“ गुरुजी, आपण हा ग्रंथ घेऊन पैठणला जाऊं. सातवाहनालाच हा अर्पण करूं.”

“ सातवाहनाला ? नको रे बाबा. तो काय माझी संभावना करील तें इथूनच मला कळतं आहे.”

“ असंच कांहीं समजण्याचं कारण नाहीं. सातवाहन आतां विद्वान् झाला आहे. विद्येची योग्यता तो आतां जाणतो.”

“ पण विद्येच्या जोडीनं रसिकता आली आहे का ? त्याशिवाय फुकट आहे सगळं. अंहं ! मीं नाहीं येणार त्याच्या दरबारांत.”

“ गुरुजी, आपण पैठणपर्यंत आमच्याबरोबर चला. नगराबाहेरच्या रानांतच आपला मुक्काम ठेवा. हा ग्रंथ घेऊन आम्ही दोघे दरबारांत जातों. जें काय सांगायचं तें राजाला सांगतों. पुढं काय होईल तें [redacted]

गुणाढ्याला ही गोष्ट मान्य झाली. गुरु आणि शिष्य पैठणच्या दिशेनें मार्गस्थ झाले. ग्रंथाचें ओझें शिष्यांनीं आपल्या मस्तकीं वाहिलें. मजल दरमजल करीत ही मंडळी पैठणच्या जवळ पोंचली. ठरल्या-प्रमाणें गुणाढ्य बाहेरच्या रानांतच राहिला आणि गुणदेव अन् नंदिदेव नगरांत शिरून राजवाड्याच्या रस्त्यानें पुढें चालूं लागले.



गुणाढ्याचे शिष्य राजाकडे जात आहेत

गुणाढ्य एकटाच तिथें बसून राहिला. तो जरी संकोच करीत असला, तरी त्यालाहि आपल्या ग्रंथाची प्रसिद्धि हवी होती. ती झाल्यानेंच त्याच्या श्रमांचें चीज होणार होतें. तो कविराज म्हणून जगांत गाजणार होता. त्याला स्वतःला राजाश्रय नको होता. त्याच्या ग्रंथाला तो मिळाल्यानेंच त्याचे सर्व मनोरथ पुरणार होते. त्यामुळें ग्रंथ घेऊन राजदरबारांत गेलेल्या शिष्यांच्या मागून त्याचें मनहि धावलें होतें. शिष्यांची वाट पाहतांना त्याच्या क्षणांच्या घटका अन् घटकांचे प्रहर होत होते. गुणाढ्य दिसायला स्वस्थ बसला होता; पण आंतून त्याची चांगलीच उचंबळ झाली होती.

गुणदेव आणि नंदिदेव राजदरबारांत पोंचले तो क्षण अगदीं योग्य होता. दरबार भरला होता...

येऊन बसले होते. सातवाहन राजाहि आपल्या महालांतून दरबारांत यायला निघाला होता. दुंदुभि वाजूं लागल्या होत्या. बंदी-भाट ललकारी देत होते. मागें-पुढें जयजयकार उठत होते. गुणदेव आणि नंदिदेव राजद्वाराच्या बाजूला उभे राहून ते जयशब्द ऐकत होते आणि तें राजवैभव पाहात होते. 'या महान् वैभवाच्या कोंदणांत आपल्या गुरूची बृहत्कथा शोभूं दे' असें मनोमन चिंतीत होते.

सातवाहन दरबारांत येऊन आपल्या सिंहासनावर विराजमान झाला. एवढा वेळ रिकामें आणि ओकें दिसणारें तें सिंहासन आतां सनाथ अन् शोभिवंत झालें. लगेच दोहों बाजूंनीं दोन दासी आल्या आणि राजाला चवऱ्या वारूं लागल्या. दंडधारी द्वारपालासारखे पुढच्या बाजूला ताठ उभे राहिले. सभेनें राजाला उत्थापन आणि अभिवादन दिलें. सातवाहनानें सर्व राजसभेवर एक कृपादृष्टि फेंकली. दरबार शांत झाला आणि पुढच्या कार्यक्रमासाठीं उत्सुकहि झाला.

न्यायनिवाडे तुंबून राहिले होते खरे; पण राजाची आज न्यायदानाची लहर नव्हती. आज तो मन रिझवायला, चैन करायला दरबारांत आला होता. दरबारांत आधींच तशी व्यवस्था झाली होती. त्याच्या एका नेत्रसंकेतासरशीं समोरच्या रिकाम्या वर्तुळांत चित्रिणी, हस्तिनी, पद्मिनी अशा नृत्यांगना दाखल झाल्या. त्यांना पाहून आकाशांतून विद्युल्लताच खालीं उतरल्या, असें पाहणाऱ्या लोकांना वाटलें. नृत्यांगनांनीं पायांत घुंगुर बांधले. साजिंद्यांनीं मृदंग, वीणा, इत्यादि वाद्यें जुळवलीं. एकीचें पाऊल गिरकी घेऊन सभेवर पडलें. पाठोपाठ–दुसरी–तिसरी–

विविध मुद्रांनीं आणि विविध अंगविक्षेपांनीं नृत्याला रंग चढूं लागला. राजा बेहोष झाला. सारा दरबार सुखाच्या सागरांत बुडून गेला.

बिचारे गुणदेव आणि नंदिदेव! ते सिंहद्वारांत पोटाशीं ग्रंथ संभाळून उभे होते. ते सर्वांच्याकडे पाहात होते; पण त्यांच्याकडे मात्र कुणीच पाहात नव्हतें. सर्वांची तंद्री लागली होती त्या नृत्यांगनांकडे.

नृत्य केव्हां थांबतें त्या क्षणाची ते वाट पाहात राहिले होते. कांहीं कालानें नृत्य विराम पावलें. नर्तिका आपल्या साजिंद्यांसह राजद्वारांतून बाहेर पडल्या आणि त्याच क्षणीं हे दोघे शिष्य आंत प्रविष्ट झाले. आपल्या खांद्यावरचा ग्रंथभार खालीं ठेवून त्यांनीं राजाला नमस्कार केला. त्या ग्रंथाच्या ओझ्यामुळें सर्व दरबारचें लक्ष एकदम त्यांच्याकडे वेधलें.

" कोण तुम्ही ? " राजानें मान उडवून रुबाबांत विचारलें.

" मी नंदिदेव—हा गुणदेव ! आम्ही दोघे गुणाढ्य कविराजांचे शिष्य......."

" गुणाढ्य ?......... म्हणजे कांहीं वर्षांपूर्वी आमच्या दरबारांत होता तो ? "

" होय महाराज ! "

" तो कविराज केव्हांपासून झाला ? "

" हा ग्रंथ निर्माण केला तेव्हांपासून." नंदिदेवानें समोरच्या ग्रंथराशीकडे बोट दाखवून म्हटलें.

" हा ग्रंथ आहे ? मला वाटलं, तुमच्या दर्भसमिधांचं गांठोडं असेल." राजा खिदळून हंसला.

राजाच्या हास्याचा प्रतिध्वनि सर्व दरबारांतून उठला. पण तरीहि नंदिदेवानें धीर सोडला नाहीं. तो म्हणाला,

" हें गाठोडं नाहीं महाराज. हा ग्रंथच आहे. अनुज्ञा असेल तर पुढें आणून उलगडून दाखवतों. "

" पंडित शर्ववर्मा, बघा बरं या माणसांनीं काय आणलं आहे तें. " राजाज्ञा झाली.

शर्ववर्मा उठला. शिष्यांनीं तो ग्रंथाचा भारा आणखी थोडा पुढें नेला अन् त्यावरचें वेष्टण उलगडून दूर केलें. शर्ववर्म्यानें त्या ग्रंथसंभारांतून एक पान वर उचललें. डोळे बारीक करून तें जवळ अन् दूर धरून पाहिलें. पण त्याला त्याचा कांहीं पत्ताच लागेना. जिथें अक्षरेंच कळलीं नाहींत

शब्दच उमगले नाहींत, तिथें अर्थ कुठला? एखाद्या पोटभरू ज्योतिष्यानें पत्रिकेकडे टक लावून पाहात बसावें; पण भविष्य काय सांगायचें त्याचा मात्र निर्णय होऊं नये, तशी शर्ववर्म्याची अवस्था झाली. बरें. कळत नाहीं म्हणावें, तर भरल्या दरबारांत अब्रू जायची. राजा फटकन् कांहींतरी बोलून जायचा. आपली प्रतिष्ठा अन् दरबारांतलें आसनहि डळमळायचें. एखाद्याला सुळावर द्यायला काढावें, तशी शर्ववर्म्याची अवस्था झाली.

पण तो धूर्त होता. आपलें अज्ञान कसें लपवावें किंवा तें कसें दुसऱ्याच्या माथीं मारून मोकळें व्हावें, याचाच तो एवढा वेळ विचार करीत होता. ती युक्ति त्याला सुचली. दरबारांत दोघे गृहस्थ राजकवि म्हणून तनखा खात होते. शर्ववर्म्यानें त्यांनाच पुढें बोलावलें.

“अहो साधुशील! अहो सुवचन! या, तुम्ही पुढं या. हा तुमचा विषय आहे.”

त्या दोघां कविराजांची छाती फुगली. ते मनांत म्हणाले, ‘बरा गेला होता पांडित्य दाखवायला पुढें. याला काय कळतं काव्यांतलं? यानं नुसती घटपटादि खटपट करावी.’

ते दोघेहि कवि पुढें गेले. एकानें एक पान उचललें, दुसऱ्यानें दुसरें उचललें. लागले डोळे फाडून बघायला. लोकांना वाटलें कीं, हे आतां ग्रंथाचा उलगडा करणार. काव्य काय आहे अन् कसें आहे, तें राजाला विशद करून सांगणार. पण कसचं काय? त्यांना आंतल्या आंत घाम फुटला.

“अहो, बघत काय राहिलांत? बोला कीं काय तें! काव्य कोणाचं? नायक कोण? नायिका कोण?...” राजा म्हणाला.

“अऽऽअऽऽअऽऽ...” एका कवीचें तोंड उघडलें तें हें असें.

“तुम्हांला काय भूतबाधा झाली कीं काय? लवकर बोला काय तें.

“मऽमऽऽम—मला कळत नाहीं.”

"कळत नसलं, तर नुसतं वाचा. आम्हांला कळेल." राजानें तीव्र शब्दांत फर्मावलें.

"वाचतां येत नाहीं."

"वाचतां येत नाहीं ? तुम्हांला त्यांतलीं अक्षरं कळत नाहींत ?"

"नऽनऽनऽ नाहीं महाराज...!"

"काय हो कविशिष्य ! तुमच्या गुरूच काव्य आमच्या पंडितांना आणि कविवर्यांना वाचतांहि येऊं नये, इतकं गचाळ लिहिलं आहे का ? उचला तो गबाळग्रंथ. शुद्ध अन् सुवाच्य लिहून आणा. मोत्याच्या दाण्यासारखं अक्षर पाहिजे, समजलं ? चला, उचला."

आतां गुणदेवानें हात जोडले. तो म्हणाला,

"महाराज ! ही प्रत शुद्ध अन् सुवाच्य आहे. पण आपल्या पंडित-कवींना तिचा उलगडा होत नाहीं, याचं कारण निराळंच आहे."

"कोणतं कारण ?"

"हा ग्रंथ संस्कृत भाषेंत लिहिलेला नसून पैशाची भाषेंत लिहिलेला आहे.

"पैशाची भाषेंत ?...पैशाची म्हणजे पिशाचांची भाषा...... ओंगळवाणी....अभद्र...ग्राम्य..........."

सातवाहन राजा एकदम सातमजली हसला. त्यासरशीं सारा दरबार अट्टहास्यानें खदखदला. हसूं आलें नाहीं तें फक्त गुणदेव आणि नंदिदेव यांना. हास्याचा पूर ओसरल्यावर सातवाहन राजानें पुन्हा त्यांना म्हटलें,

"आम्ही माणसं आहोंत. पिशाचं नाहीं आहोंत. पिशाचांचं काव्य रचणारा तुमचा गुरु मूर्ख आहे. तें बाड इथें घेऊन येणारे तुम्हीं शतमूर्ख आहां. तुमचा हा पिशाचग्रंथ गुंडाळा अन् आपली वाट धरा........... चले जाव !"

बिचारे गुणाढ्याचे शिष्य ! अपमानानें त्यांचे चेहरे काळवंडले. त्यांच्यावर जणूं वज्रपात झाला. ग्रंथ उचलून घेऊन ते जड पावलांनीं

मागें फिरले. मोठ्या कष्टानें गुणाढ्याकडे परत आले. ते कसली संभावना घेऊन आले, तें गुणाढ्याला त्यांच्या मुद्रेवरूनच कळलें. गुणाढ्याच्या आशेवर पाणी पडलें. इतकें खपून, रात्रीचा दिवस करून, महान् परिश्रमानें निर्माण केलेला तो सात लाखांचा ग्रंथ! पण राजानें त्याची केराइतकी किंमत केली. साक्षात् सरस्वतीला लाथाडलें.

गुणाढ्य केविलवाण्या मुद्रेनें त्या हस्तलिखित बाडाकडें पाहूं लागला. पाहतां पाहतां त्याच्या डोळ्यांतून टिपें गळूं लागलीं. वाऱ्यावादळानें एखादा कडा कोसळावा तसें त्याचें धीरगंभीर हृदय कोसळलें, खचलें. राजानें झिडकारलेली ही सरस्वती. हिला आतां मी कोणाच्या हवालीं करूं? कोण हिचा प्रेमानें आणि आदरानें स्वीकार करील?......आणि त्याला सुचलें.

" अग्निनारायण ! "

होय, हें काव्य अग्निनारायणालाच समर्पण करायचें! निर्धार पक्का झाला. त्यासरशीं तो उठला. आजूबाजूला जाऊन त्यानें पाला-पाचोळा आणि वाळकीं लांकडें गोळा केलीं. तीं एका ठिकाणीं आणून त्यांचा थर रचला. सभोंवतीं पालापाचोळा टाकला. जवळच्या चकमकीनें विस्तवाची ठिणगी पाडली. पाल्या-पाचोळ्यानें पेट घेतला. तांबूस पिवळ्या अग्निज्वाळा भडकून वर उठल्या.


त्यानंतर गुणाढ्यानें आपला काव्यग्रंथ समोर घेऊन पद्मासन घातलें. पहिलेंच पान उचलून तो आपलें तें काव्य वाचूं लागला. त्यानें मंद्रसप्तकात सुरुवात केली. त्याचा आवाज प्रथम कांपरा अन् घोगरा येत होता. अंतरांत दाटलेलें दुःख त्या आवाजांत कालवलें होतें. पण थोड्याच वेळांत तो मोकळा सुटला. स्वच्छ अन् खणखणीत येऊं लागला.

आपल्या गुरूचा काय बेत आहे हें शिष्यांना कांहीं उमगेना. ते नुसते जडमूढासारखे बघत राहिले. नुसते ऐकत राहिले. एक प्रकरण संपलें.

गुणाढ्याचा आवाज एकदम खालीं आला. त्याच्यांत व्यथा आणि दुःख दाटून आलें. तो आपल्या सरस्वतीला उद्देशून बोलूं लागला :

" माझ्या लडिवाळ बाळे ! मीं तुला जन्माला घातली. सातवाहन राजा तुझं कोडकौतुक करील म्हणून तुला त्याच्याकडे पाठविली. पण त्याला तुझी योग्यता कळली नाहीं. आतां मी तुला अग्निदेवतेच्या स्वाधीन करीत आहें. गाईनं वांसराला नेऊन वाघाच्या गुहेंत बांधावं तशी माझी ही निर्दय करणी आहे. पण वेल्हाळे, माझ्यावर रागावूं नकोस. "

असें म्हणून भूर्जपत्रांचा तो एक गठ्ठा त्यानें जळत्या आगींत टाकून दिला. एका क्षणांत त्याला अग्निज्वालांनीं लपेटलें अन् खाऊन टाकलें. त्यासरशीं शिष्यांनीं आकांत केला.



**गुणाढ्य ग्रंथ अग्नीला अर्पण करतो**

" गुरुजी, गुरुजी ! असं करूं नका. तुमचं काव्य जाळूं नका. आम्ही त्याचा अभ्यास करूं. आम्ही तें जगांत पसरवूं. गुरुजी, थांबवा, थांबवा हा स्वाहाकार ! "

पण गुणाढ्य आतां कोणाचें कांहींहि ऐकण्याच्या मनःस्थितींत नव्हता. त्याला आतां जगाचें, शिष्यांचें, कोणाचेंहि भान नव्हतें. एक प्रकरण जळलेलें पाहून त्यानें दुसरें प्रकरण वाचायला प्रारंभ केला. भावपूर्ण आवाजांत, कवितेंतल्या रसाला अनुकूल अशा स्वरांत, गुणाढ्याचें वाचन चालूं झालें. तिथें अदृश्य रूपानें वावरणाऱ्या वनदेवता त्या काव्यवाचनानें आकृष्ट झाल्या. ऐकतां ऐकतां त्यांच्या डोळ्यांतून दुःखाश्रू गळूं लागले. रानांतलीं पांखरें किलबिलाट थांबवून आजूबाजूच्या वृक्षांवर गोळा झालीं. नादलुब्ध हरिणें आणि इतरहि वन्य पशु त्या नादानें त्या ठिकाणीं ओढले गेले. गुणाढ्याची रसवंती ऐकतांना, कानांच्या वाटे तिचें प्राशन करतांना त्यांचाहि आत्मा आनंद उपभोगूं लागला. सारीं पांखरें आणि वनचरें तहान-भूक विसरलीं. भुकेनें त्यांचीं पोटें चोपलीं, तरीसुद्धां तीं तिथून हालेनात.

दिवसांमागून दिवस गेले. कवि गुणाढ्याचा काव्यहोम सतत चालू राहिला. तो काव्यग्रंथ नुसताच उचलून 'अग्नये स्वाहा' करायचा तर त्याला एका क्षणाचाच अवधि पुरला असता. पण गुणाढ्य तें मुक्तकंठानें वाचीत होता. त्यांतली ओळन् ओळ, शब्दन् शब्द अखेरचा एकदां उच्चारून घेत होता. त्यामुळें हें काव्यहवनाचें यज्ञकर्म किती तरी दिवस चाललें होतें. तें ऐकतांना झाडापेडांनाहि जणूं तन्मयता आली होती. वनदेवता ऐकत होत्या अन् अश्रू ढाळीत होत्या. पशुपक्षीहि आपापली जागा सोडून हालत नव्हते. राजाचे शिकारी-पारधी आले आणि त्यांनीं त्यांतल्या कांहीं सशांना अन् हरणांना मारून नेलें तरी इतर पशूंना त्याचा पत्ताहि लागला नव्हता.

सातवाहन राजा दुपारीं जेवायला बसला; पण पानांत वाढलेलें मांस नीरस, चिवट अन् बेचव. त्यानें पारध्याला बोलावून आणून विचारलें,

"काय रे पारध्या? मरून सुकलेले, विटलेले पशु ओढून आणलेस कीं काय? आजचं पाकशाळेंतलं मांस असं रसहीन कां?"

पारध्यानं हात जोडले अन् तो सांगूं लागला :

"महाराज, मांस चांगलं चविष्ट असायला तो प्राणी मुळांत पुष्ट असायला नको का ? आपल्या रानची सगळीच शिकार आजमितीला रोडावली आहे."

"रोडावली आहे ? ती कां ?"

"महाराज, काय सांगूं आश्चर्य ! पलीकडच्या रानांत डोंगराच्या पायथ्याशीं एक कवीश्वर बसला आहे. त्यानं यज्ञकुंड पेटवलं आहे. तो कसली तरी पोथी वाचतो आणि तीं भूर्जपत्रं आगींत फेकून देतो. त्याच्या गायनानं जंगल स्तब्ध झालं आहे. झाडं डोलत नाहींत. वारा वाहत नाहीं. कळ्या उमलत नाहींत. उमललेलीं फुलं बावत नाहींत. पशुपक्ष्यांचा थवा जमला आहे तिथें. सारे त्या गायनांत तन्मय झाले आहेत. त्यांनीं अन्नपाणी वर्ज्य केलं आहे. त्यांचे देह नुसते पांजरे झाले आहेत. त्यांत मांसच उरलं नाहीं. अशा स्थितींत मी काय करूं ? अपराधाची क्षमा असावी महाराज !"

"कोण ? कोण हा गाणारा प्राणी ? नांव काय त्याचं ?"

"तें मला अडाण्याला काय माहीत ? महाराजांनीं आपल्या बातमी-दाराला विचारावं."

लगेच वार्ताहराला बोलावणें गेलें. तो येऊन राजासमोर उभा राहिला. राजानें विचारलें,

"रानांत काव्य कोण वाचतो आहे ?"

"महाराज ! एका काळीं आपल्या पदरीं होता तो गुणाढ्य पंडित. तोच काव्य वाचतो आहे. तोच काव्य जाळतो आहे. महाराजांच्या दरबारांत त्याच्या काव्याचा अपमान झाला, म्हणून त्यानं काव्याचा अन् जीवनाचाहि उबग येऊन हें दहन मांडलं आहे. अधिक आगळ्या शब्दाची क्षमा असावी महराज ! पण त्याचं काव्य इतकं प्रभावी आहे,

इतकं नवरसांनीं ओथंबलेलं आहे, कीं मोनजातीलाहि त्यानं वेड लागावं. मी त्या बाजूला जाऊन आलों आणि माझीहि अवस्था तीच झाली. महाराज, पैठण नगरांत नुसती धांदल अन् गडबड उडून गेली आहे आजमितीस. इतके दिवस पशुपक्ष्यांनीं ऐकलं. आतां माणसांची तिकडे रीघ लागली आहे. जो तो म्हणतो—

"चला, गुणाढ्याच्या काव्यगंगेंत न्हाऊन येऊं या."

राजाला तें ऐकून चमत्कार वाटला. गुणाढ्याचें काव्य आपण अपमानित केलें हें आपल्या हातून वाईट घडलें का, असा क्षणभर पश्चात्तापहि त्याला चाटून गेला. अधिक माहितीसाठीं त्यानें मग प्रधानांना बोलावणें धाडलें. त्यांनींहि येऊन तीच हकीकत सांगितली. आतां पुढें काय करायचें, असा प्रश्न निर्माण झाला. पैठणची सारी प्रजा गुणाढ्याच्या नांवाचा आज जयजयकार करीत आहे आणि राजा मात्र त्या बाबतींत उदासीन आहे असें होऊं नये, असा सल्ला प्रधानांनीं सातवाहनाला दिला. त्यावर सातवाहन म्हणाला,

"तुम्ही जा आणि त्या गुणाढ्याला दरबारांत बोलावून आणा."

"महाराज! ती वेळ निघून गेली. गुणाढ्य आतां दरबार अन् नांवलौकिक यांच्या पलीकडे गेला आहे. तो दरबारांत येणार नाहीं."

"मग काय करायचं?"

"इच्छा असेल तर आपणच तिथें जायचं."

राजा त्या गोष्टीला तयार झाला. प्रधानमंडळीसह त्यानें अरण्याचा रस्ता धरला. थोड्याच वेळांत तो गुणाढ्याच्या जागीं पोंचला. गुणाढ्याचें गायन रंगांत आलें होतें. वातावरण भारून गेलें होतें. तिथल्या आधिव्याधि काव्यरसांत बुडून गेल्या होत्या. तिथें खेळत होता, लोळत होता, तो एकमेव आनंद! राजा तें ऐकत राहिला. ऐकतां ऐकतां त्याचेंहि चित्त द्रवलें. त्याच्याहि सात्त्विक भावनांना फुलोरा आला. त्याच्या भावना

इतक्या उचंबळल्या कीं, पुढची भूर्जपत्रांची चळथ अग्नींत पडायच्या पूर्वीं त्यानें धावत जाऊन गुणाढ्याचे हात पकडले.

" थांबा गुणाढ्य ! ही अमृतमधुर रसवंती अशी अग्नये स्वाहा करून मानवजातीची हानि करूं नका. "

गुणाढ्य भानावर आला. आपले हात कोणीं धरले म्हणून पाहतो, तर साक्षात् सातवाहन राजा ! त्याला वाईट वाटलें. दुःखाचा उमाळा आला. तो राजाला म्हणाला,

" महाराज, फार उशीर केलांत. सहा लक्ष काव्याची ही पाहा राख समोर दिसते आहे. ते श्लोक, ते शब्द, ते अर्थ, ते आशय, या सगळ्या सगळ्याचं भस्म झालं. आतां फक्त एक लाखच काव्य शिल्लक उरलं आहे. हत्ती गेला, शेपूट तेवढं राहिलं आहे. नका मला अडवूं. बाकीच्याबरोबर हेंहि जळूं द्या. सगळ्याची राख झाली कीं तीच मी अंगाला फांशीन आणि उन्मत्त पिशाचासारखा प्राणांतापर्यंत जगभर भटकत राहीन. "


गुणाढ्याचें हें भाषण राजाच्या जिव्हारीं झोंबलें. जणूं तें त्याचें हृदय चिरीतच गेलें. आपला प्रमाद केवढा प्रचंड होता आणि आपण त्या दिवशीं दरबारांत खदखदां हसलों तें किती आचरटपणाचें होतें, तें त्याला त्या वेळीं कळलें. गुणाढ्य आगीजवळ बसला होता. त्याचा चेहरा लालबुंद झाला होता. कपाळावरून, गळ्यावरून घामाच्या धारा निथळत होत्या. असें वाटत होतें कीं, त्या घामाच्या द्वारें त्याच्या जीवनांतला रसच हळूहळू नाहींसा होत आहे. राजानें त्याला कळवळून म्हटलें,

" कविश्रेष्ठ गुणाढ्य, मी अपराधी आहें. मला पदरांत घ्या. मीं चंदनाला कण्हेर मानलं. हिऱ्याला गारगोटीच्या मानानं तोललं. तुम्हीं मला नवरसांची मंदाकिनी शिष्यांच्या हातीं पाठवली होती; पण मी क्षुद्र कवींच्या डबक्यांत डुंबत राहिलों. पंडितराज, ग्रंथ जळाला तो अग्नीला

अर्पण झाला. शिल्लक आहे तेवढा तरी माझ्या हातीं द्या. राहिली आहे तेवढीच कविता पोळलेलीं हृदयं शांतवील आणि जीवनांतलं सौंदर्य वाढवील......"

• गुणाढ्य त्यावर कांहीं बोलला नाहीं. ती उरलेली एक लक्ष कविता त्यानें राजाच्या स्वाधीन केली. राजानें परब्रह्म मिळाल्याचा आनंद मानला. पैठणच्या साऱ्या जनतेनें त्या कवितेचा जयजयकार केला. गुढ्या-तोरणें उभारून आणि नगर शृंगारून राजानें त्या गुणाढ्य-रसवंतीचा महोत्सव केला. तिच्यावर फुलें उधळलीं. तिचीं स्तोत्रें गाइलीं. तिच्यापुढें मंगलारत्या पाजळल्या. साऱ्या नगरांत तो शारदोत्सव नगाऱ्या-चौघड्यांनीं दुमदुमला.

काव्याची संभावना झाली. पण कवीचें काय? त्या प्रसंगीं 'गुणाढ्य त्या प्रतिष्ठानगरींत उपस्थित होता काय? नव्हता. तो कुठें गेला अन् त्याचें पुढें काय झालें, तें कोणालाहि कळलें नाहीं.



# मातृगुप्त

कल्हण नांवाच्या एका काश्मिरी कवीनें 'राजतरंगिणी' नांवाचें एक काव्य लिहिलें आहे. त्यांत बाराव्या शतकापर्यंत काश्मीरमध्यें झालेल्या राजांचीं चरित्रें क्रमवार ग्रथित केलेलीं आहेत. मातृगुप्ताचें चरित्र याच ग्रंथांतलें आहे. तो 'औटघटकेचा राजा' असें म्हटलें तरी चालेल. इ. स. ५२८ च्या सुमारास त्याचा काल येतो. उज्जयिनीच्या हर्ष-विक्रमादित्यांचा हा कांहीं काल आश्रित होता. मातृगुप्त हाच कालिदास असा कांहीं विद्वानांचा दावा आहे; पण तो इतिहासाच्या कसोटीला उतरत नाहीं. याची कांहीं स्फुट कविता प्रसिद्ध आहे. पण मित्रप्रेमाला जागणारा एक सज्जन पुरुष म्हणूनच त्याचा गौरव केला पाहिजे.

* * *

उन्हाळ्याचे दिवस होते. सूर्याचा एकचक्र रथ हळूहळू मध्यान्हाला चढत होता. झाडांची कोवळी पालवी मलूल झाली होती. पांखरें दाट झाडीचा आसरा घेऊं पाहात होतीं. मैदानांतून मृगजळाचे लोट उठत होते. रस्त्यावरची धूळ क्षणाक्षणाला तापत चालली होती. आणि अशा या प्रखर वातावरणांत एक तरुण उज्जयिनीचा मार्ग आक्रमीत होता.

त्या तरुणाचें नांव होतें मातृगुप्त. तो विद्वान् होता आणि कविहि होता पण बिचाऱ्याच्या पायांत वहाणा नव्हत्या अन् डोक्यावर छत्रीहि नव्हती. मस्तकाला उन्हाच्या झळा लागूं नयेत, म्हणून त्यानें आपल्या उपरण्याचा शेव डोक्यावर टाकला होता. पायांना धुळीचे चटके बसत होते, त्याला मात्र त्याचा इलाज नव्हता. रस्त्याच्या कडेला मधेंच एखादें झाड दिसलें कीं तो त्याच्या छायेंत उभा राही, तापलेले तळवे निववून घेई अन् पुनश्च रस्त्याला लागे. आतां उज्जयिनी अवघी एक कोस उरली

होती; पण तेंच अंतर त्याला योजनाप्रमाणें वाटत होतें. त्याचें सर्वांग घामानें निथळलें होतें. गोरें तोंड जास्वंदासारखें लालगुंज झालें होतें. त्याच्या काखेंत तो लिहीत असलेल्या ग्रंथाची पोथी होती; तेवढेंच काय तें त्याचें भांडवल !

त्या भांडवलावरच त्याचें हें देशपर्यटन चाललें होतें. त्याच्याजवळ विद्या होती, पण धन नव्हतें. घरांत दुपारची भ्रांत होती. म्हणून तो आपल्या विद्येला राजाश्रय मिळवण्यासाठीं धडपडत होता. कोणाच्या तरी पदरीं राहून योग-क्षेमाची चिंता दूर करावी आणि निर्वेधपणें शारदेच्या उपासनेंत आयुष्य सार्थकीं लावावें, एवढीच त्याची आकांक्षा होती.



मातृगुप्त झाडाखालीं विसावतो

या उद्देशानें तो अनेक देश हिंडला होता. अनेक राजांच्या महाद्वारांत उभा राहिला होता. माझी परीक्षा घ्या, माझें काव्य ऐका अन् मला राजाश्रय द्या, अशी त्याची मागणी होती. अनेक तोंडपुजे, धूर्त आणि नट, विट, विदूषक राजाला खुष करून स्वतःची चैन चालवतात, तिथें आपल्यासारख्याला राजाश्रय मिळायला अडचण पडूं नये, असें त्याला प्रामाणिकपणें वाटत होतें.

एका दरबारांत त्याला आश्रय मिळाला होता; .पण थोड्याच दिवसांत त्या राजाची लहर फिरली होती. दुसऱ्या ठिकाणीं राजा त्याला खुषमस्कऱ्याच समजूं लागला होता. तो आपल्या प्रत्येक कृतीवर त्याच्या-कडे काव्य मागे. बिचारा मातृगुप्त ! प्रशंसेचीं खोटीं काव्यनाणीं पाडून पाडून अखेर वैतागला होता; आणि एक दिवस त्या भूपतीला रामराम

करून चालता झाला होता. तिसऱ्या ठिकाणीं वर्णी लागली होती; पण ती अपमान आणि उपेक्षा यांच्या जोडीनें. चवथ्या ठिकाणीं राजाच्या प्रभावळींतल्या दुर्जनांनीं त्याला जीव नकोसा केला होता. एवंच, गुणांची पारख करून कोणींहि त्याच्या अंगावर शालजोडी टाकली नव्हती. त्यामुळें त्याला कुठेंच स्थिर होतां आलें नव्हतें. या राज्यांतून त्या राज्यांत, असें त्याचें सारखें भटकणें चालू राहिलें होतें. शेवटीं शेवटीं तो जिवालाहि उबगला होता. आणि त्याच वेळीं उज्जयिनीच्या हर्षराजाची कीर्ति त्याच्या कानांवर आली होती. एका शहाण्या, अनुभवी माणसानें मातृगुप्ताला उज्जयिनीला जाण्याबद्दल आवर्जून सांगितलें होतें. तो म्हणाला होता,

“ हर्षराजा मोठा पुण्यात्मा आहे. गुणिजनांचा चाहताहि आहे. धन आणि मान मिळविण्यासाठीं विद्वानांना त्याच्यापुढें हात जोडून उभें रहावें लागत नाहीं. आपल्या प्रतिभेला कुलवधूप्रमाणें व्यर्थ शिणवावें लागत नाहीं. त्याच्याकडे विद्वान् आणि मूर्ख एका मापानें मोजले जात नाहींत. तो विवेकी आहे अन् चतुरहि आहे. त्याचे मंत्री कलहप्रिय नाहींत. त्याचे सेवक उद्दाम नाहींत. त्याला मूर्खांची बडबड मुळींच खपत नाहीं. त्याची सेवा करतांना आपले कष्ट म्हणजे हिमालयांत बर्फ वाहून नेण्यासारखे आहेत, असें कोणालाहि वाटत नाहीं. ”

मातृगुप्त जेव्हां हर्षाच्या दरबारांत आला आणि जेव्हां त्याचें राजाशीं परिचयाचें संभाषण झालें, तेव्हां या पहिल्या भेटींतच त्याच्या मनावर राजाचा प्रभाव पडला. ज्या गृहस्थानें या राजाचें आपल्याकडे गुणगान केलें, त्यानें तिळाएवढीहि अतिशयोक्ति केली नाहीं, अशी त्याची खात्री पटली. अनेक देश हिंडल्यामुळें आणि अनेक भल्याबुऱ्या व्यक्तींशीं संबंध आल्यामुळें, मातृगुप्त आतां माणसाची पारख करण्यांत तरबेज झाला होता. त्यानें मग मनाशीं निर्धार केला. ‘ यापुढें वणवण करणें नाहीं. आतां याच राजाची एकनिष्ठपणें सेवा करून इथेंच आपला उद्देश साधून घ्यायचा. आपलें नशीब उघडायचें असेल तर तें इथेंच उघडेल; अन्यत्र नाहीं. ’

हर्षानेंहि मातृगुप्ताची योग्यता थोड्याच काळांत ओळखली. त्याच्या प्रतिमेची चुणूक अनेक वेळां राजाला दिसून आली. विशेषतः त्याला पटली ती मातृगुप्ताची भक्ति आणि राजनिष्ठा ! हा पुरुष मनापासून आपला गौरव गातो हें त्यानें जाणलें. असलें हें झळकतें कविरत्न आपल्या दरबारीं असावें, असें राजाच्या मनानें घेतलें. मग एक दिवस भरल्या दरबारांत विद्वज्जन आणि सामंत-सरदार यांच्या समक्ष मातृगुप्ताची त्यानें राजकवि म्हणून नेमणूक केली. मातृगुप्ताला परमानंद झाला. आपल्या ध्येयमार्गांतला एक टप्पा त्यानें गांठला होता. त्याच्या कपाळीं राजमान्यतेचा टिळा लागला होता. आतां फक्त 'राजश्रियाविराजित' होणें एवढेंच शिल्लक राहिलें होतें.

मातृगुप्त दरबारांत योग्य वेळीं मोजकेंच बोले. त्यानें आपल्या जिव्हेला मिथ्यास्तुतीचा विटाळ होऊं दिला नाहीं. त्यामुळें थोड्याच काळांत त्याच्या शब्दाला मोल चढलें. तो अनेक विषयांवर कविता करी आणि त्या हर्षराजाला ऐकवी. आपल्या बुद्धिसामर्थ्यानें अनेक कूट समस्याहि सोडवून दाखवी. त्यामुळें राजाच्या रसिकवृत्तीचें चांगलेंच पोषण होऊं लागलें. मातृगुप्ताची बुद्धिमत्ता एकांगी नव्हती. राजकारणहि त्याला चांगलें कळे. राजनीतींतलीं गूढ कोडीं उलगडण्यांत तो राजाला चांगलीच मदत करूं लागला. मानवी स्वभावाचें सूक्ष्म ज्ञान आपल्यापेक्षांहि या कवीला अधिक आहे, हें राजाला दिसून आलें.

अशा अनेक कारणांनीं लवकरच तो राजाच्या गळ्यांतला ताईत बनला. हा थोर मनाचा कवि आपल्या संगतींत नेहमीं असावा असें त्याला वाटूं लागलें. मातृगुप्त राजापासून फारसा दूर रहात नसे. पण तो जरा दृष्टिआड राहिला तरी राजा त्याची लगेच चौकशी करी. जवळ असावें, पण पुढें पुढें करूं नये, अशी मातृगुप्ताची रीत होती. तो आपल्याशीं वागतांना संकोच धरीत आहे असें पाहून एक दिवस राजानें त्याला प्रसन्न मनानें सांगितलें,

"कविराज, तुम्ही माझे सेवक नसून मित्र आहांत. मोकळेपणानें वागा."

पण राजानें मित्र म्हटलें तरी मातृगुप्तानें सेव्य-सेवकभावाची मर्यादा कधींच ओलांडली नाहीं. राजे लोक लहर लागली कीं डोक्यावर चढवतात अन् ती फिरली कीं कोपऱ्यांतल्या केरसुणीचीहि किंमत देत नाहींत, हें ज्ञान त्यानें अनुभवानें मिळविलें होतें. त्यामुळें विशेष लाभ झाला नाहीं तरी चालेल; पण मान टिकून राहिला पाहिजे या धोरणानें त्यानें आपली वागणूक ठेवली होती.

अशा रीतीनें त्यानें सहा महिने राजसेवेंत घालवले. पण तेवढ्या अवधींत एकदाहि राजानें त्याचा हात ओला केला नाहीं. मानसन्मान भरपूर; पण बिदागीचें नांव नाहीं. राजा मातृगुप्ताच्या काव्यानें आपल्या रसिकतेची भूक शमवी. पण मातृगुप्तानें आपल्या टीचभर पोटाची भूक कशानें शमवावी ? मातृगुप्ताचे कपडे स्वच्छ असले तरी ते जीर्ण अन् फाटकेच असत; पण राजाचें त्याच्याकडे कधीं लक्ष गेलें नाहीं. तो दरबारांत आला आहे तो भरल्यापोटीं आला आहे, का उपाशी आला आहे, याची त्यानें कधीं चौकशी केली नाहीं. तो कुठें राहतो, कशा स्थितींत राहतो, याबद्दलहि अवाक्षरानें कधीं त्याला विचारलें नाहीं. एवढा सुज्ञ अन् चतुरस्र राजा; पण तो मातृगुप्ताच्या बाबतींत आंधळा होता का जाणूनबुजून डोळ्यांवर कातडें ओढीत होता, तें त्याचें त्यालाच माहीत !

पण मातृगुप्तहि बहाद्दर खरा. त्यानें कधींहि 'दे' म्हटलें नाहीं कीं हात पसरला नाहीं. राजाला काव्यरसाची मेजवानी देत असतांना कित्येकदा त्याच्या पोटांत भुकेची आग उठलेली असे. पण तो ती गोष्ट एका शब्दानें-सुद्धां राजाला कळूं देत नसे. त्याचा चेहरा काय सांगेल तेवढेंच !

तो दिवसाचा ठरलेला वेळ राजसेवेंत घालवून ठरलेल्या वेळांत कोणाचें कांहीं कामधाम करी आणि पोटापुरतें द्रव्य मिळवी. त्यानें रहायला जागासुद्धां नगराच्या बाहेरच्या भागांत एका भिकार वस्तींत घेतली होती. कित्येक वेळां त्याला आपल्या जीवनाचा उबग येई. चाकरी एकाची करायची अन् भाकरी दुसरीकडून मिळवायची, हें त्याला अगदीं विसंगत

वाटे. हें असें किती दिवस चालायचें असें तो आपल्या मनाला विचारी. कित्येकदा त्याच्या मनांत अगदीं निकराचे विचार येत.

"हें एवढें वैभवशाली राज्य! पण आपल्या वांट्याला हें ओसाड, रानच नाहीं का? कशाला रहायचें इथें? काबाडकष्ट करून दुपारचा चरु मिळवायचा तर तो कुग्रामांतहि मिळूं शकेल. मग त्यासाठीं राज-सेवेचें एवढें बंधन कशाला पत्करायचें? ज्या झाडाला पान नाहीं, फळ नाहीं, त्याच्या सांवलींत कशाला रहायचें?"

पण हे विचार-विकार तो मनांतून लगेच काढून टाकी. दरिद्री का होईना, पण तो राजकवि होता. त्याच्यासाठीं दरबारांत मानाची जागा होती. त्याच्या प्रत्येक शब्दाची तिथें तोखणाई होत होती. प्रधान आणि सरदार त्याला नमस्कार करतांना आपला माथा नमवीत होते. राजानें, कधीं त्याचा अपमान केला नव्हताच; आणि इतर कोणालाहि करूं दिला नव्हता. मातृगुप्ताला वाटे कीं, 'एवढें तरी कुठल्या राजानें आजवर आपल्याला दिलें होतें? कवि म्हणजे खुषमस्कऱ्या अशाच भावनेनें ते आपल्याशीं वागले नाहींत का?'

मातृगुप्त अंतःकरणाचा कवि होता; म्हणजेच भावनाप्रधान होता. तो भणंगाचें जीवन जगत होता हें खरें; पण तरीहि त्याला हर्षराजाला सोडून जावें असें वाटत नव्हतें. कारण त्यानें मातृगुप्ताला मित्र म्हटलें होतें आणि मातृगुप्तानेंहि मित्रभावनेनेंच राजाचा आश्रय पत्करला होता. तेव्हां राजाला सोडून जायचें म्हणजे मित्राला सोडून जायचें असें त्याला वाटत होतें. शिवाय हर्षराजा त्याला जिवाआगळा आवडत होता. त्याच्या संगतींत असतांना आपण सत्संगतीचा अनुभव घेत आहों, आपल्या मनाची एकेक पाकळी नकळत उमलत आहे अशी त्याला प्रचीति येई. घटका अन् प्रहर केव्हां संपले तें कळत नसे. राजा समोर असला कीं त्याला आपल्या दैन्याचा, दारिद्र्याचा, सगळ्याचा विसर पडत असे. आणि म्हणूनच त्यानें ठरवून टाकलें होतें कीं, 'आपलें काय वाटेल तें होवो, राजानें

जा म्हणेपर्यंत आपण त्याला सोडायचें नाहीं. मैत्रीला बट्टा लावायचा नाहीं.'

आणि म्हणूनच आपलें काम संपलें कीं तो राजवाड्यांतच जाऊन बसत असे. राजसेवा ही सेवा म्हणून नव्हे; तर मैत्रीचा धर्म म्हणून त्यानें अंगीकारली होती. राजपरिवारांतल्या कांहीं पोटभरू लुडबुड्यांनीं त्याला म्हणून पाहिलें, 'कशाला एवढा देह झिजवतोस? इथें कांहीं डाळ शिजायची नाहीं तुझी.' पण त्यानें त्या लोकांचा हितोपदेश हसण्यावारी घालवला होता.

हर्षराजा अधुनमधून नगरांत सर्वत्र फेरफटका करी. असाच एकदां सायंकाळीं फिरायला गेला असतां मातृगुप्त रहात असलेल्या भागांत तो पोंचला. मातृगुप्त असल्या भिकारी वस्तींत रहात असेल अशी त्याला कल्पनासुद्धां नव्हती. त्यामुळें एका झोंपडीपुढें मातृगुप्त कांहींतरी लिहिण्यांत गढून गेला आहे आणि जवळून तीन दगडांच्या चुलीवर मातीच्या भांड्यांत कांहींतरी शिजत आहे, हें पाहून तो एकदम स्तिमित झाला. मातृगुप्ताच्या झोंपडींत दुरूनच त्यानें नजर टाकली. तिथें बसायला पाट नव्हता आणि झोंपायला खाटहि नव्हती. तिथें भरून राहिला होता तो सगळा अभाव. सगळें अठराविश्वे दैन्य!

तें पाहून राजाला खेद वाटला. तो मनाशीं म्हणाला, 'काय विलक्षण माणूस आहे हा! याच्या जीवनांत रस नसूनहि याच्या कविता मात्र रसानें ओथंबलेल्या असतात. शंकरानें एकदांच विष प्राशन केलें; पण हा रोजच्या रोज चिंताविषाचे पेले पीत आहे. अन् तरीहि याच्या बोलण्या-चालण्यांत कुठेंहि कटुता नाहीं. कमाल आहे याच्या सहनशीलतेची!'

मातृगुप्ताला आपली चाहूल लागूं न देतां राजा परत फिरला आणि तडक राजवाड्यात आला. त्याचें मन एकाएकीं सुन्न झालें. कोणत्याहि राजोपचारांनीं तें प्रसन्न होईना. त्यानें मातृगुप्ताच्या बाबतींत जाणूनबुजून

दुर्लक्ष केलें होतें. त्याला त्याच्या निष्ठेची परीक्षा पाहायची होती. तो खरा मित्र आहे का मैत्रीच्याखालीं स्वार्थ लपवून बसला आहे, हें त्याला पारखायचें होतें. आणि आज त्यानें पाहिलें होतें कीं, मातृगुप्त त्याच्या कल्पनेच्या पलीकडे त्या परीक्षेंत उतरला आहे. पण त्या खात्रीमुळें राजाला समाधान होण्याच्या ऐवजीं दुःखच झालें.

तो स्वतःचाच धिक्कार करूं लागला. ' बिचारा परदेशी मातृगुप्त ! माझ्या आश्रयाला आला अन् होता त्यापेक्षांहि अधिक हालातापांत पडला. थंडी, वारा आणि ऊन यांनीं झोडपलेल्या वृक्षाला वसंत पुन्हा शोभा देतो; पण मीं या हतभागी कवीला काय दिलें ? मी सत्तेच्या धुंदींत राहिलों. त्याचे कष्ट कोण दूर करणार ! त्याचा थकवा कोण घालवणार ! त्यानें तन-मन झिजवून जी माझी सेवा केली, जें मला सुख दिलें, त्याच्या मोबदल्यांत मी कोणता चिंतामणि त्याच्या गळ्यांत बांधणार आहें ! कोणता अमृतकुंभ त्याच्या हातीं देणार आहें ! त्याच्या ऋणांतून मी कसा उतराई होऊं ! कोणती वस्तु त्याला देऊं, म्हणजे मीं त्याच्या सेवेचा योग्य तो मोबदला दिला असें होईल ! छे: ! आज तरी असें मजपाशीं कांहीं नाहीं ....'

राजानें कांहीं दिवस अशा विवंचनेंत घालविले; पण तरीहि त्याच्या मनाचा निर्णय होईना. मातृगुप्ताचे उपकार कसे फेडावे तें त्याला कळेना. पुढें आले थंडीचे दिवस. हातपाय काकडवणाऱ्या अन् दांतखिळी वाजवणाऱ्या त्या थंडींत राजा एका रात्रीं उबदार पांघरुणें घेऊन शयनगृहांत झोंपला होता. त्याच्या उशागतीं एकच समई तेवत होती. केव्हां तरी तिच्यांतलें तेल कमी झालें, वात बारीक झाली आणि बाहेरून आंत घुसलेल्या वाऱ्याच्या झुळुकेनें दिव्याला झडपलें. राजा जागा होतो, तर महालांत सगळा काळोख. पुनश्च दिवा लावून घेण्यासाठीं त्यानें हांक मारली,

" कोण आहे रे बाहेर ? "

" मी आहें. " बाहेरून खणखणीत उत्तर आलें.

तें उत्तर मातृगुप्ताचें होतें. दारावरचा पहारेकरी हातापायांची जुडी करून बसला होता आणि तिथेंच झोंपीं गेला होता. मातृगुप्ताला मात्र पांघरुणाच्या अभावीं झोंप येत नव्हती. तो बाहेरच्या शेकोटीजवळ बसून आपल्या काकडलेल्या अवयवांना ऊब आणीत होता. म्हणून राजाची हांक त्यानेंच ऐकली आणि तोच पुढें झाला. राजा म्हणाला, 'दिवा लाव.' मातृगुप्तानें लगेच दिवा लावला. राजाला वाटलें होतें कीं कोणीतरी पहारेकरीच असेल. पण दिव्याच्या प्रकाशांत पाहतो, तर समोर मातृगुप्त उभा. राजा आश्चर्यानें एकदम उठून बसला. त्यानें म्हटलें, 'कविराज, तुम्ही ?'



मातृगुप्त आणि हर्षराजा

"होय महाराज, मीच !"

"रात्र किती उरली आहे ?"

"दीड प्रहर."

"तुम्हांला कसं कळलं ? तुम्ही अजून जागेच आहां काय ? तुम्हांला झोंप नाहीं येत ?"

" माझी झोंप ! मी थंडीनें कुडकुडतों आणि चिंतासागरांत बुडतों, असं पाहून निद्रा माझ्यावर रुसली अन् दूर कुठें तरी पळून गेली."

अभावितपणें अशा अर्थाचा एक श्लोक त्याच्या मुखांतून बाहेर पडला. पण तो श्लोक नसून शोक होता. नकळत त्याच्या तोंडून तो भोगीत असलेलें दैन्य बाहेर पडलें होतें. जें त्यानें आजवर प्रयत्नपूर्वक लपवलें होतें, तें त्या अपरात्रीच्या निःस्तब्ध शांततेंत हळूच ओठाबाहेर निसटलें होतें. मातृगुप्ताला वाटलें कीं असें व्हायला नको होतें. इतका कसा मी हळुवार अन् भावनाविवश झालों !

मातृगुप्त बाहेर आला आणि आपल्याशींच म्हणाला. 'बरं झालं ! जें मनांत डांचत होतं तें एकदां बाहेर पडून राजाच्या कानांवर गेलं. राजा त्यावर कांहींच बोलला नाहीं, यावरून तो मला कांहीं देईल ही आशाहि व्यर्थ ठरली. सर्व संशय फिटले........छेः ! पण मी राजाला कशाला दोष देऊं ? त्यानें आपल्या कृपेंतल्या कितीतरी लोकांचं कोटकल्याण केलं आहे. तो थोर आहे. उदार आहे. मला कांहीं लाभलं नाहीं, हा माझ्या करंट्या नशिबाचा दोष........'

पण मातृगुप्त अंधारांतून आपल्या झोपडीकडे निघाला असतांना इकडे शयनागारांत राजाचीहि अवस्था मोठी चमत्कारिक झाली. मऊ गादी, उबदार पांघरूण आणि पहांटेची वेळ इतक्या गोष्टी अनुकूल असूनहि राजाची झोंप पार उडाली. मातृगुप्ताविषयींच्या विचारांनीं त्याला पुरतं पछाडलं. 'मातृगुप्त माझा निःस्वार्थी मित्र आहे. त्यानें माझी सेवा चोख बजावली. मीं मात्र अजून त्याची योग्य ती संभावना केली नाहीं. आतां त्याला कांहीं तरी दिलं पाहिजे. खूप खूप दिलं पाहिजे. जन्मभर स्मरणांत राहील, असं दिलं पाहिजे. पण काय देऊं ? असं काय आहे माझ्याकडे ?.......'

आणि एकदम त्याच्या अंतरांत प्रकाश पडला. मातृगुप्ताला काय द्यायचें तें एकाएकीं त्याला सुचलें. त्यानें टाळी वाजवली. काश्मीर

मंडलाची राजगादी रिकामी होती. प्रवरसेन तिचा मालक; पण तो कुठें तरी परागंदा झाला होता. तिथल्या सिंहासनावर कोणाला आणून बसवायचें तो अधिकार हर्षराजाकडे होता. अनेक राजांनीं काश्मीरमंडल आपल्याला मिळावें म्हणून हर्षाकडे मागणी चालवली होती. हर्षराजा त्या विचारांतच होता. पण त्या सुप्रभातीं त्याला स्फुरलें कीं, काश्मीरच्या सिंहासनावर बसायला सर्वस्वीं लायक पुरुष कोण असेल तर तो मातृगुप्तच. तें सिंहासन मातृगुप्ताला देऊन मी त्याला माझ्या बरोबरीचा करीन. बस्स ! ठरलं !

लगेच उठून त्यानें काश्मीरच्या प्रधानाला आज्ञापत्र लिहिलें— "मातृगुप्त नांवाचा एक विद्वान् कवि माझें आज्ञापत्र घेऊन तुमच्याकडे येईल. त्याला तुम्ही निःशंकपणें राज्याभिषेक करा आणि त्याच्या सत्तेखालीं कारभार चालवा."

राजानें तें पत्र मोहोरबंद केलें आणि खास दूताकरवीं काश्मीरला धाडून दिलें. आपल्या या कृत्यानें तो विलक्षण खुष झाला. त्या खुषींतच दुसऱ्या दिवशीं त्यानें मातृगुप्ताला पाचारण केलें. तो त्याच्याशीं पुष्कळ बोलला. अनेक विषयांवर त्या दोघांचें संभाषण झालें. मातृगुप्तहि रात्रीचे निराशाजनक विचार विसरून गेला. थोड्या वेळानें तो जाण्यासाठीं उठतांच राजानें त्याला एकांतीं नेऊन विचारलें,

"कविराज, तुम्हांला काश्मीर देशाची माहिती आहे का ?"

"नाहीं महाराज. मी तिकडे कधीं गेलों नाहीं."

"वाट विचारीत जाऊं शकाल का ?"

"महाराजांची आज्ञा असली तर जाईन."

"मग अवश्य जा. हा मोहोरबंद खलिता नेऊन तिथल्या प्रधानाच्या हातीं द्या. मधेंच उघडून आंतला मजकूर वाचूं नका. वाचाल तर तुम्हांला माझ्या देहाची शपथ आहे."

"नाहीं महाराज ! असलं पापकर्म माझ्या हातून होणार नाहीं."

" ठीक आहे. मग आजच निघा. ' शुभास्ते पंथानः '.... "

मातृगुप्त राजाज्ञेप्रमाणें त्याच दिवशीं काश्मीरच्या मार्गाला लागला. तो मार्ग आक्रमीत असतांना त्याला आपल्या भावी भाग्योदयाची मुळींच कल्पना नव्हती. वाटेंत त्याला अनेक शुभशकुन झाले. पण त्याचा अर्थ काय हें त्याला कळेना. त्याचा प्रवास मात्र सुखाचा झाला. वाटेंत ज्या ज्या वसतिगृहांत तो उतरला, तिथें तिथें त्याचें उत्तम स्वागत झालें. पुढें तो हिमालयाच्या प्रांतांत शिरला. त्या नगाधिराजानें हिमाचे तुषार आणि देवदार वृक्षाच्या फुलांचा सुगंध यांचा नजराणा देऊन आपल्या भावी अधिपतीचें स्वागत केलें. पुढें तो क्रमवर्त देशांतल्या कांबुव नांवाच्या घाटीवरील चौकीवर पोंचला. तिथें त्याला कळलें कीं, काश्मीरचें मंत्रिमंडळ कांहीं कामासाठीं त्या ठिकाणीं आलेलें आहे. मातृगुप्ताला वाटलें कीं, राजाचा खलिता इथेंच मुख्य प्रधानाच्या स्वाधीन करावा आणि माघारीं फिरावें.

मातृगुप्त दारांत येऊन उभा राहतांच द्वारपालांनीं आंत वर्दी दिली कीं, उज्जयिनीहून हर्षराजाकडून एक दूत आलेला आहे. मुख्य प्रधानाला त्याची कल्पना होतीच. तो एकदम चपापला. इतर मंत्र्यांसह लगबगीनें बाहेर आला. मातृगुप्ताच्या हातून त्यानें खलिता घेतला. लगेच फोडून आंतला मजकूर वाचला. ' हें परिचयपत्र घेऊन येत आहे, तोच तुमचा राजा, ' असा त्यांत मजकूर होता. मुख्य प्रधानानें आपल्या सहकाऱ्यांनाहि तो खलिता दाखविला. सगळेच जण आश्चर्यानें स्तिमित झाले. सर्वांच्या नजरा मातृगुप्तावर खिळल्या.

कसा होता मातृगुप्त ! सुदाम्याचा अवतार. अंगावर फाटके कपडे. अन् तेहि मोजके दोनच. एक धोतर आणि दुसरें उत्तरीय. पायांत जोडा नाहीं. डोक्याला पागोटें नाहीं. चालून चालून थकलेला. हिमालयाच्या घाट्या चढून घामाघूम झालेला. ' दारिद्र्यानें गांजलेला एक भिक्षुक ब्राह्मण ' एवढेंच त्याच्याबद्दल म्हणतां आलें असतें.

पण तोच आज काश्मीरमंडलाचा राजा होऊन आला होता. पण प्रधानाला खात्री वाटेना, म्हणून त्यानें प्रश्न केला,

"मातृगुप्त कवि म्हणतात ते आपणच का?"

"होय, मीच तो. हर्षराजाचा सेवक. महाराजांचा खलिता तुमच्या हातीं दिला. माझं काम झालं. आतां मला परत जायची परवानगी आहे काय?"

"छे छे महाराज! आतां आपण कसचे परत जातां? हर्षराजानं काश्मीरमंडलाचे भूपति म्हणून आपली नेमणूक केली आहे."

"काय?...माझी नेमणूक? मी अन् राजा?....तुम्ही माझी थट्टा करीत आहां काय?" मातृगुप्तानें अविश्वास दर्शवून विचारलें.

"महाराज, हें काय भलतंच बोलणं! आपली थट्टा करणारा माणूस महान् अपराधी गणला जाईल अन् कठोर देहदंडाला पात्र होईल."

आणि मग लगेच मुख्य प्रधान पुढच्या स्वागतसमारंभाच्या सिद्धतेला लागला. त्यानें राजधानीकडे ताबडतोब दूत रवाना केले. तो स्वतः मातृगुप्ताला पालखींत बसवून राजधानीकडे निघाला. वेशीवर येतांच नगारे, कर्णे वाजूं लागले. काश्मीरचीं दरींखोरीं त्या वाद्यध्वनीनें दुमदुमलीं. राजधानींत एकच धांदल उडाली. हजारों माणसें नव्या राजाच्या दर्शनासाठीं वेशीच्या दरवाजाकडे धावलीं. नवा राजा अशा फाटक्यातुटक्या वेषांत आलेला पाहून सर्वांना नवल वाटलें. मग प्रधानानें लगेच मातृगुप्ताला राजवस्त्रें अर्पण केलीं. त्यानंतर नगरपुरंध्रींनीं त्याच्या भाळीं कुंकुमतिलक लावून त्याला पंचारती ओंवाळल्या. मातृगुप्ताच्या मुद्रेवर विद्येचें तेज आधींच होतें. आतां तो राजतेजानेंहि झळकूं लागला. शृंगारलेल्या रथांतून त्याची मिरवणूक सुरू झाली. प्रजेच्या आनंदाला पारावार उरला नाहीं. तोरणें आणि कमानी यांच्याखालून मातृगुप्ताचा रथ मंदगतीनें जात होता. मागें आणि पुढें नागरिकांची घनदाट गर्दी चालत होती. सर्वांच्या मुखांतून एकच घोष उठत होता.—'मातृगुप्त महाराजकी जय!'

रथांत बसल्या जागीं मातृगुप्ताच्या कानांवर तो जयनाद आदळत होता. त्याला या प्रकाराचा कांहीं अर्थच कळेना. तो पुरता भांबावून गेला होता. आपण सत्यसृष्टींत वावरतों, का स्वप्न-भूमींत विहार करतों ह्याच त्याला भ्रम पडला. पण विचारांतीं त्याची खात्री झाली कीं, 'हें स्वप्न नाहीं. आपण खरोखरच काश्मीरचे राजे झालों आहों. हर्षराजाची आपण सेवा केली, ती किती अल्प, किती क्षुल्लक! आणि त्या उदारधी राजानें मला तिचं केवढं मोठं बक्षीस दिलं! श्रीहरीनें सुदाम्याला दुसरी द्वारकापुरी निर्मून द्यावी त्या जातीचं, त्या तोलाचं हें बक्षीस आहे. आपल्या सेवेची कदर करीत नाहीं, म्हणून मनोमन कां होईना, पण मी हर्षराजाला दोष देत होतों. किती कोती बुद्धि माझी! त्यानं मला मित्र म्हटलं आणि योग्य वेळीं तो त्या मैत्रीला जागला. मला त्यानं सेवक ठेवलं नाहीं. आश्रित ठेवलं नाहीं. एका समृद्ध प्रदेशाचं राज्य बहाल करून त्यानं मला आपल्या तोडीचा बनवलं. एखाद्याला चकित करायचं तर तें असं करावं. धन्य हर्षराजा!'



मातृगुप्तावर राजछत्र

दुसऱ्या दिवशीं मातृगुप्ताला राज्याभिषेक झाला. त्या प्रसंगीं त्यानें राज्याभिषेकाला उचित अशीं मोठमोठीं दानें दिलीं. त्याचबरोबर

हर्षराजालाहि कांहीं तरी पाठवावें असें त्याच्या मनांत आलें. पण आपण आपल्या पूर्वींच्या धन्याशीं बरोबरी तर करीत नाहींना, या जाणीवेनें तो संकोचला. मग त्यानें एक श्लोक लिहून तो दूताकरवीं हर्षराजाकडे पाठवला. त्याचबरोबर काश्मिरांतलीं उत्तमोत्तम फळें आणि फुलें त्याला भेट म्हणून धाडलीं. त्या श्लोकाचा अर्थ असा होता—

"हे राजा, तूं यत्किंचितहि आपल्या औदार्याचा सुगावा लागूं न देतां एखाद्या वृक्षाप्रमाणें अवचित उत्तम फळ देतोस. तुझ्या देणगीवरूनच तुझी कृपा व्यक्त होते. महामेघ मुळींसुद्धा गडगडाट न करतां विपुल जलवृष्टि करतात, तसाच हा तुझा थोरपणा होय."

मातृगुप्तानें काश्मीरमंडलावर एकूण चार वर्षें नऊ महिने आणि एक दिवस राज्य केलें. त्यानें एखाद्या पिढीजाद राजाप्रमाणें प्रजेचें परिपालन केलें. शौर्य आणि औदार्य या दोन्ही गुणांत तो कधींच उणा पडला नाहीं. त्यानें विद्वानांना आणि कवींना बहुमोल आश्रय दिला. त्याच्या शुद्ध आणि विवेकपूर्ण वर्तनानें तो सर्व प्रजेला आदरणीय झाला.

काश्मीरमंडलाचा परागंदा झालेला आणि तीर्थयात्रा करीत असलेला प्रवरसेन याला इतक्या वर्षांनंतर एक दिवस बातमी समजली कीं, मातृगुप्त काश्मीरमंडलाचा राजा झाला आहे. त्याला या गोष्टीचा क्रोध आला. एके दिवशीं तो राज्यांत दाखल झाला. त्याच्याविषयीं प्रेम धरणारे कांहीं अमात्य त्याला येऊन भेटले. त्यांनीं प्रवरसेनाला मातृगुप्ताविरुद्ध उठाव करण्याचा मंत्र दिला. तेव्हां प्रवरसेन त्यांना रागें भरून म्हणाला,

"बिचारा मातृगुप्त! त्याला काय म्हणून शासन करायचं? काश्मीरची राजगादी त्याला देणाऱ्या हर्षराजाचं मी पारिपत्य करणार आहें. तो माझा खरा पराक्रम ठरेल."

नंतर त्यानें सैन्याची जमवाजमव केली आणि रणशिंग फुंकलें. त्यानें प्रथम त्रिगर्ताचें राज्य जिंकलें. तिथून तो पुढें निघाला. उज्जयिनी हें

आतां त्याचें लक्ष्य होतें. पण वाटेंतच त्याला हर्षराजा निवर्तल्याची बातमी कळली. ती ऐकून तो उद्विग्न आणि उदास झाला. कारण त्याच्या शत्रुत्वाचें आतां मूळच खुंटलें होतें. त्याच दिवशीं त्याला दुसरीहि बातमी कळली कीं, मातृगुप्त राजा काश्मीरचें राज्य सोडून निघाला आहे आणि जवळच मुक्कामाला आला आहे. त्याहि गोष्टीचें प्रवरसेनाला वाईट वाटलें. मातृगुप्ताविषयीं प्रवरसेनाच्या मनांत द्वेष नव्हता. तो कांहीं निवडक मंडळीनिशीं त्याच्या भेटीस गेला. मातृगुप्तानें त्याचें यथायोग्य स्वागत करून त्याला आसनावर बसविलें. क्षेमकुशलाचीं बोलणीं झाल्यावर प्रवरसेनानें त्याला नम्रपणें विचारलें,

" महाराज, तुम्ही काश्मीरमंडलाचं राज्य कां सोडलंत ? "

मातृगुप्तानें एक दीर्घ उसासा सोडून त्याला म्हटलें,

" प्रवरसेन, ज्यानं मला राजा केलं, तो पुण्यात्मा आज दिवंगत झाला. त्याच्या प्रकाशानें मी प्रकाशत होतों. आता मी सूर्यकांत राहिलों नाहीं; तर निस्तेज दगड बनलों आहें. माझं राजैश्वर्य हर्षाच्या मृत्यूबरोबरच संपलं ! "

" असं उद्वेगाचं बोलणं कां बोलतां ? तुम्हांला कोणीं त्रास दिला का ? "

" आतां मला कोणीहि त्रास देऊं शकणार नाहीं. मग तो कितीहि बलवान् असो. मीं स्वखुषीनें राज्य सोडलं आहे. मला राज्याचा लोभ नव्हता आणि नाहीं. हर्षराजाची आज्ञा म्हणून मीं आजवर राजदंड हातीं धरला होता. हर्षराजा भूतलाचा मणिदीप होता. तो नष्ट झाल्यामुळें साऱ्या पृथ्वीवर अंधार पसरला आहे, असं मला वाटतं. इतउप्पर माझा धर्म संन्यास आणि माझं स्थान मोक्षदायिनी वाराणशी ! "

तेवढ्याच बोलण्यावरून प्रवरसेनाला मातृगुप्ताची थोरवी पटली. त्याच्या आत्मप्रकाशापुढें आपले गुण काजव्यासारखे आहेत, असें त्याला वाटलें. त्यानें राज्य न सोडण्याबद्दल मातृगुप्ताला खूप विनवलें. आपण

जिंकलेलें त्रिगर्तांचें राज्यहि तुम्हांलाच देतों, असें त्याला सांगितलें. शेवटीं ‘ तुम्ही काश्मीरमंडलाला आणि त्याबरोबरच मलाहि सनाथ करा ’ असें प्रवरसेन गहिंवरून बोलला. पण मातृगुप्ताचा निश्चय बदलला नाहीं. त्यानें राजलक्ष्मीचा त्याग केला तो कायमचाच !

मातृगुप्त प्रवरसेनाला आशीर्वाद देऊन आपल्या पूर्वींच्या जीर्ण वस्त्रानिशीं काशीक्षेत्रांत आला. तिथें त्यानें संन्यास घेऊन मोक्षमार्गाची साधना सुरू केली आणि आपलें उर्वरित आयुष्य गंगेच्या तीरावर आणि विश्वेश्वराच्या चरणांशीं निजानंदांत घालवलें.



# नाम्बि अंदर नाम्बि

हा महापुरुष इ. सनाच्या १० व्या शतकाच्या सुमारास तमिळनाड-मध्यें जन्मला. तमिळ 'शैव पुराणांचा व्यास' अशी त्याला गौरवपूर्ण उपाधि आहे. 'तेवारम्' हें त्या पुराणांचें नांव. अप्पर, सुंदरर आणि ज्ञानसंबंदर या तीन सुप्रसिद्ध शैव आचार्यांनीं हीं पुराणें रचलीं होतीं. दहा श्लोकांचें एक खंड अशीं एक लक्ष खंडें भरतील, एवढा प्रचंड असा तो वाङ्मयनिधि होता.

पल्लव राजांच्या कारकीर्दीत या 'तेवारम्' चा खूप प्रसार झाला. समाजाच्या सगळ्या थरांत तीं पसरलीं. त्यांच्या प्रचारानें दक्षिणेंत शिवमहिमा गाजूं लागला. पण पुढें कालचक्र फिरलें. तमिळनाडवर परचक्र कोसळलें. समाजाचे सगळे थर ढवळून निघाले. प्रजा जणूं वादळांत सांपडली. त्या उत्पातांत हीं पुराणेंहि नष्ट झालीं. त्यांचें अध्ययन-अध्यापन संपलें. केवळ भाट-चारणांच्या पाठांतरांत होता तेवढाच काय तो फुटकळ भाग शिल्लक उरला. हीं पुराणें पुनश्च समग्र आपल्या हातीं लागावीं, अशी तमिळनाडच्या रसिकांना आणि भक्तजनांना असोशी लागून राहिली होती. कालांतरानें नाम्बि अन्दर नाम्बि हा पुरुषश्रेष्ठ जन्माला आला आणि त्यानें तमिळ जनतेची ती इच्छा पूर्ण केली. ज्ञानेश्वरांच्यानंतर तीनशें वर्षांनीं ज्ञानेश्वरीची शुद्ध प्रत तयार करणाऱ्या एकनाथमहाराजांचें महाराष्ट्रांत जें स्थान, तेंच तमिळनाडमध्यें नाम्बि अन्दर नाम्बीचें आहे.

* * *

तिरुनारय्युर नांवाचें तें एक लहानसें खेडें होतें. कोलिदम् नदीच्या तीरावर वसलेलें असल्यामुळें त्याला बारामास पाण्याचा आसरा लाभला होता. नारळीचीं झाडें, ताडमाड इत्यादि वृक्षांनीं त्या गांवाला शोभा आणि छाया दोन्ही दिलीं होतीं. गांवाच्या आसपास शेती होती. बांधांवर आणि

माळावर ग्रामदेवतांचे दगड होते. गांवांतले लोक शेती करून पोटापुरेसें पिकवीत आणि संकटकाळीं तिथल्या ग्रामदेवतांना भजत.

याशिवाय आणखी दोन मोठीं देवळें त्या गांवांत होतीं. एक शिवाचें आणि दुसरें विद्याधीश गणराजाचें. या दोन्ही देवळांतून नित्यपूजा आणि आरत्या-मंत्रपुष्पें होत. पूजेच्या वेळीं चौघडे आणि पालखीच्या वेळीं शिंगें वाजत. हीं देवळें म्हणजे गांवांतल्या लोकांचीं पूजास्थानें तशींच विश्रांतिस्थानेंहि होतीं. भक्त आणि आर्त लोक त्या देवद्वारीं जाऊन भक्तीचा उल्हास आणि मनाचें समाधान अनुभवीत असत.

गणपतीची पूजा ज्या ब्राह्मणाकडे होती, तो मोठा सात्त्विक आणि संतोषी होता. मनोभावें देवाची सेवा करायची आणि मिळेल त्यांत आनंद मानायचा, अशा वृत्तीनें तो आपला गृहस्थाश्रम चालवी. सुदैवानें त्याला पत्नीहि समाधानी वृत्तीची लाभली होती. पतीच्या संसारांत आणि सुख-दुःखांत तिनेंहि आपला वांटा योग्य प्रकारें उचलला होता.

त्यांच्या घरांत एकच पुत्र जन्माला आला. नाम्बिआंदन् असें त्यांनीं त्याचें नांव ठेवलें. आईबापांच्या कृपाछत्राखालीं तो वाढूं लागला. मुलगा एकुलता एक खरा; पण तरीहि आईबापांनीं त्याला लाडावून ठेवलें नाहीं. तो विद्वान् व्हावा, सद्वर्तनी व्हावा, कुलदीपक व्हावा, म्हणून तीं त्याची योग्य प्रकारें काळजी घेत होतीं. योग्य वेळीं त्यांनीं त्याचें उपनयन केलें आणि गांवांतल्या पाठशाळेंत त्याची रवानगी केली. नाम्बि तिथल्या विद्यार्थ्यांत मिसळला. हळूहळू अध्ययनहि करूं लागला.

ब्राह्मण बहुधा आपली वृत्ति सोडून कुठें जात नसे. पण एक दिवस कामच तसें निकडीचें आलें आणि त्याला परगांवीं जाणें भाग पडलें. त्याला चिंता होती ती गणपतीच्या पूजेची. म्हणून त्यानें जातांना आपल्या पत्नीला बजावलें,

"मला कदाचित् चार-आठ दिवस लागतील. नाम्बि आतां पूजा करण्याजोगा झाला आहे. त्याच्याकडून पूजा, आरती, नैवेद्य सगळं

यथास्थित करून घे. तूं जवळ उभी राहून दाखव म्हणजे तो नीट करील. हेळसांड करूं नको हं!"

ब्राह्मणाच्या पत्नीनें 'बरें' म्हटलें. ब्राह्मण गांवाला निघून गेला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं नाम्बि पाठशाळेंतून मधल्या सुट्टींत जेव्हां घरीं आला तेव्हां आई त्याला म्हणाली,

"हें पूजासाहित्य आणि हा महानैवेद्य घेऊन देवळांत जा. आज गणपतीची पूजा तुझ्यावर आहे. नेहमीं घरीं पूजा कशी करतात तें तूं पाहिलं आहेस. त्याप्रमाणें सगळ नीट कर."

नाम्बि न्याहारीसाठीं म्हणून घरीं आला होता. त्याची बाळभूक चांगलीच तापली होती. पण आईनें त्याला खायला द्यायच्या ऐवजीं काम मात्र सांगितलें. नाकारावें तर आई रागें भरणार होती. सांगितलेलें ऐकलें नाहीं, तर खायलाहि मिळणार नव्हतें. वर आणखी बोलूनहि घ्यावें लागणार होतें.



नाम्बि देवळाकडे निघत आहे

बिचारा नाम्बि. त्यानें एका हातांत पूजासाहित्य आणि दुसऱ्या हातीं महानैवेद्याची ताटली घेऊन धुसफुसत देवळाचा रस्ता धरला. मंदिरांत जाऊन त्यानें भराभरा देवावरचा निर्माल्य ओरबाडला. शेजारच्या तळ्याचें तांब्याभर पाणी आणून तें देवाच्या मस्तकावर ओतलें. कोड्या वस्त्रानें देवाचें अंग उगीच टिपल्यासारखें केलें. कपाळीं दुबोटी गंधाचा नाम ओढला. देवाच्या चारी भुजा आणि हृदय यांवरहि गंधाचे फराटे दिले. तबकांतलीं फुलें बचक्यानेंच वाहिलीं. धुपाटण्यांत धूप घालून भरपूर धूर

केला. नंदादीपावर धरून निरांजन पाजळलें. घण् घण् घंटा वाजवीत तें गणपतीच्या मुखाभोंवतीं ओवाळलें. एवढें झाल्यावर मग देवापुढें मंडल करून त्यावर महानैवेद्याची ताटली ठेवली.

त्या पूजेला मंत्र नव्हता. कारण तो त्याला अजून येतच नव्हता. होतें तें तंत्र. आणि तेंहि घाईचें. कशीबशी पूजेची वेठ वारून तो घरीं पळणार होता आणि हातातोंडाची गांठ घालणार होता. एवढें सगळें करून त्याला वेळेवर शाळेला जायला हवें होतें. बरोबरीचीं मुलें संथा सुरू करतील आणि तेवढें आपल्याला चुकेल, याचें त्याला भय नव्हतें. भय होतें तें गुरुजींच्या चौदाव्या रत्नाचें.

म्हणून आपल्या बाजूनें त्यानें सगळें झटपट उरकलें. पण पुढची गोष्ट त्याच्या हातची नसून ती देवाच्या हातची होती. त्यासाठीं पुढें ठेवलेला नैवेद्य देवानें सत्वर ग्रहण करायला हवा होता. ताट रिकामें झाल्याशिवाय आणि देवाच्या हातावर पाणी घालून त्याला विडा दिल्याशिवाय नाम्बीला पूजा समाप्त करतां येणार नव्हती. त्या दहा वर्षांच्या किशोराची अशीच समजूत होती कीं, देव रोज नैवेद्य खातो तेव्हां आजहि तो तसाच त्यानें खाल्ला पाहिजे. आपण भरलें ताट परत घरीं घेऊन गेलों तर देवाला उपाशीं ठेवलंस, त्याच्यापुढचं ताट ओढून आणलंस, म्हणून आई आपल्यावर घसरेल आणि दशमीच्याऐवजीं चापटपोळ्या मात्र चारील, ही धास्ती त्याच्या उरांत वावरत होती.

" जेव ना रे देवा. उगाच ओढून कां धरतोस ? मला भूक लागली आहे, हें तुला माहीत नाहीं का ?" नाम्बि गणराजाच्या मूर्तीला विनवूं लागला. त्याला वाटलें कीं, देव मुलखाचा अरसिक आहे. आपल्या आईनें पदार्थ किती गोड अन् खमंग केले आहेत ! वास कसा छान सुटला आहे !

पण तरीहि देव स्तब्धच. सोंड उचलीत नाहीं कीं हातहि हालवीत नाहीं. नको म्हणून ताट घेऊन परत जायला सांगावें, तर तसेंहि करीत नाहीं. नुसता मुका अन् स्तब्ध. देवाला कसें विनवावें हेंच नाम्बीला

BVBK-0400035


कळेना. [illegible] च्या हातचा नैवेद्य खातो आणि आज मात्र त्यानें आपली अडवणूक चालवली आहे, असें त्याला वाटलें.

तो विचार करूं लागला कीं, आपलें कांहीं चुकलें का! पण त्याच्या बालबुद्धीला उत्तर मिळेना. तो रडला, पायां पडला आणि शेवटीं काकुळतीहि आला. पण तरीहि देव पाषाणाची खोळ टाकीना. नाम्बीला तो आपला अपमान वाटला. त्याला वाटलें कीं, देवाची आपल्या वडिलांच्यावर तेवढी कृपा आहे अन् आपल्यावर मात्र नाहीं. आणि देवाची कृपा नाहीं म्हणजे सगळेंच फुकट. आई म्हणेल, तूं देवाला आवडत नाहींस. गांवांतले लोक म्हणतील कीं, नाम्बीशीं देवानें गट्टी फू केली. अशा स्थितींत जगून तरी काय करायचें! गांवांत सगळ्या लोकांचा उपहास सोसण्यापेक्षां मरून गेलेलें बरें. अन् मरायलासुद्धां दूर जायचें कारण नाहीं.देवाच्या पायांशीं डोकें आपटून घ्यावें कीं काम खलास!

आणि नाम्बि त्या बलिदानासाठीं सिद्ध झाला. 'तूं रागावलास ना माझ्यावर? मग घे माझा प्राण!' म्हणून तो गुडघ्यावर बसला. खालच्या दगडी वेदीवर मस्तक आदळण्यासाठीं त्यानें मानेला झटका दिला. त्यासरशीं 'थांब, नाम्बि थांब' असे शब्द त्याच्या कानीं पडले. एक दिव्य प्रकाश त्याच्या डोळ्यांसमोर पसरला. सगळा गाभारा झळाळून निघाला. त्या प्रकाशानें नाम्बीचे डोळे दिपले आणि मिटले. कांहीं क्षणांनंतर त्यानें ते उघडले आणि त्या प्रकाशांत कांहीं दिसतें का, म्हणून तो पाहूं लागला. आणि काय नवल सांगावें!

गणराज आपल्या आसनावरून खालीं उतरला होता आणि आपल्या हिमधवल हातांनीं ताटलींतला वरणभात कालवून त्याचे घास स्वतःच्या मुखांत घालीत होता. त्याच्या मुद्रेवर प्रसाद ओसंडत होता. दोहीं डोळ्यांत कृपा उचंबळत होती. खालींवर होणारी त्याची सोंड नाम्बीला जणुं 'स्वस्ति स्वस्ति' म्हणत होती.

इथें आपल्याला छोट्या नामदेवांचें स्मरण होणें अपरिहार्य आहे. नाम्बीनंतर तीनशें वर्षांनीं तो जन्मला होता आणि त्यानेंहि नैवेद्य खाण्याबद्दल विठूरायाला असेंच सांकडें घातलें होतें. त्याच्याहि निकराच्या निर्धारानें देव असाच सजीव आणि सदय झाला होता.

‘ पाषाणाची मूर्त कांपे थरथरां
जेवी भराभरां नाम्यासंगें ।’

या काव्यपंक्तींतून नामदेवाचा तो देवाहूनहि मोठा असा भोळा भाव मराठी लोकवाङ्मयांत दुमदुमतो आहे.

गजाननानें सगुण होऊन नाम्बिआंदन्‌चा महानैवेद्य संपूर्ण सेवन केला. भोजनपात्र निःशेष निपटून घेतलें आणि मग दहा वर्षांच्या त्या बालभक्ताला प्रसन्न मनानें विचारलें,

“ आतां झालं तुझं समाधान ? ”

नाम्बीचें एका परीनें समाधान झालें होतें. पण दुसऱ्या परीनें त्याचा जीव धास्तावला होता आणि म्हणून डोळयांत पाणी आणून तो देवाला म्हणाला,

“ गणराजा ! तूं जेवलास हें बरं झालं. मला आनंद वाटला पण एवढ्या साध्या गोष्टीला किती उशीर लावलास ? माझी शाळेंत जायची वेळ टळून गेली. आतां गुरुजी माझ्यावर रागावतील अन् डोळे तांबडे करून सपासप माझ्या हातावर छड्या ओढतील.”

“ तसं कांहीं होणार नाहीं. माझं अभय आहे तुला.”

पण तरीहि नाम्बि तिथून हालेना. त्याच्या मनांत एक निराळाच विचार घोळूं लागला. बोलावें कां न बोलावें, या संदेहांत तो थोडा वेळ घुटमळला. पण अखेर धीर करून त्यानें विचारलेंच,

“ गजानना, तूं विद्यादानी देव आहेस असं माझे बाबा सांगतात. मग तूंच कां नाहीं मला विद्या शिकवीत ? तूं घरचा गुरु असतांना मी त्या फुटक्या गुरूकडे कां म्हणून जायचं ! तें कांहीं नाहीं. मी आतां

तुझ्याकडेच शिकणार. मी तुझी पूजा-आरती करीन. तूं मला संथा दे. दोघांचंहि काम होईल."

देवाला त्याच्या या निर्व्याज, निष्कपट बालवृत्तीचें कौतुक वाटलें. त्यानें नाम्बीचें म्हणणें मान्य केलें. 'तूं आतां घरीं जा अन् उद्यां सकाळीं ये.' असें म्हणून गणपतीनें त्याला घरीं पाठवून दिलें. देव पुनश्च आपलें पाषाण रूप घेऊन जाग्यावर बसला. तो दिवस नाम्बीला अत्यंत हर्षाचा गेला. त्यानें आपलें गुपित कोणालाच कळूं दिलें नाहीं. आईनें एकदां त्याला विचारलें,

"काय रे, आज विशेष खुषींत दिसतोयस ?"

"आम्ही नाहीं सांगणार." नाम्बीनें ऐटींत उत्तर दिलें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं आईनें पाहिलें कीं, मुलगा शाळेंत जाण्याच्या ऐवजीं देवळाकडे वळला आहे. तिला वाटलें कीं, शाळेला बुट्टी देऊन पोराचा कुठें तरी उनाडण्याचा बेत दिसतो आहे. आपल्या हातांतलें काम पुरें करून ती त्याच्या मागून देवळाकडे आली. देवळाचा गाभारा बंद होता. पण दाराला अष्टदळाकृति झरोका होता, त्यांतून तिनें आंत पाहिलें. आणि काय सांगावें ! तिचा आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसेना.

गणराज सजीव, सस्मित होऊन आपल्या आसनावर बसला आहे. डाव्या मांडीवर उजवा पाय ठेवून तो डाव्या हातानें कुरवाळतो आहे. तो कसल्यातरी सुखानें डोलत आहे. त्याच्या बारीक डोळ्यांत तेज कसें पुंजाळत आहे. नाम्बि त्याच्यासमोर अगदीं जवळच बसला आहे. त्यानें आपल्या छोट्या गोंडस हातांचा संपुट जोडला आहे. त्याचाहि हर्ष त्याच्या अंतरांत मावत नाहीं. गणपति शिकवतो आहे आणि नाम्बि म्हणतो आहे. गुरूच्या मुखांतून ज्ञानगंगेचा प्रवाह शिष्याच्या हृदयाकडे जणूं धावत जात आहे. नाम्बीला अन्य कशाचेंहि भान नाहीं. गुरूची कृपा आणि शिष्याची भक्ति यांचा एक अपूर्व संगम तिथें उल्हासतो आहे.